ARTS & COMMERCE COLLEGE
PHONDAGHAT, TAL. KANKAVLI

लोकमत
मंगळवार १४.०४.२०२३

फोंडाघाट येथील कला, वाणिज्य महाविद्यालयामध्ये भित्तिपत्रिकेचे अनावरण

# इंग्रजी लेखन कौशल्याचा विकास करा : संदेश सावंत-पटेल

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनात मराठी, हिंदी बरोबरच इंग्रजी भाषेचासुद्धा अभ्यास केला पाहिजे. आज स्पर्धात्मक युगामध्ये तिन्ही भाषांवर प्रभुत्व असणे आवश्यक आहे. वाचनामुळेच लेखक घडतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी भरपूर सकस वैचारिक वाचन करावे. तसेच इंग्रजी लेखन कौशल्याचा विकास करावा, असे आवाहन फोंडाघाट एज्युकेशन सोसायटीचे संचालक व जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती संदेश सावंत-पटेल यांनी केले.

फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये इंग्रजी विभागाच्यावतीने 'रेनबो' या इंग्रजी साहित्यावर आधारित भित्तिपत्रिकेचे अनावरण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.



फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये इंग्रजी विभागाच्यावतीने रेनबो या भित्तिपत्रिकेचे अनावरण करण्यात आले. यावेळी संदेश सावंत-पटेल उपस्थित होते.

महाविद्यालय विकास समितीचे सदस्य केदार रेवडेकर यांनीही विद्यार्थ्यांच्या विविध लेखांची वाहवा केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू फुलझेले यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना भविष्यात चांगले लेखक होण्यासाठी प्रेरणा दिली.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या इंग्रजी लेखन कौशल्याचा विकास करण्यासाठी दरवर्षी 'रेनबो' हे इंग्रजीमधून भित्तिपत्रिका प्रकाशित केली जाते. विद्यार्थ्यांच्या मनातील इंग्रजीची भीती काढून त्या भाषेतील लेखन कौशल्यास पाठबळ मिळावे, यासाठी ही भित्तिपत्रिका तयार केली जाते. महाविद्यालयातील विद्यार्थी इंग्रजी भाषेतून विविध कथा, लेख, निबंध, कविता व काही सुविचार इंग्रजी भाषेतून लिहितात. इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. संतोष आखाडे यांनी प्रास्ताविक केले व विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या विविध लेखनाचा आढावा घेतला. तर प्रा. विनोदसिंह पाटील यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

लोकमत
गुरुवार ३०.०३.२०२३

# सकारात्मक विचार ध्येयप्राप्ती करून देतात

## रंजन नेरुरकर : फोंडाघाट महाविद्यालयात कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : आयुष्यात जो संकटांना घाबरतो तो कधीच शिकू शकत नाही. आपले राहणीमानही सकारात्मक असले पाहिजे. सकारात्मक विचार माणसाला ध्येयप्राप्ती करून देतात. परमेश्वराने आयुष्य दिले आहे ते आनंदाने जगण्यासाठी आहे, असे मत रंजन नेरुरकर यांनी व्यक्त केले.

फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष कला व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांचा शुभेच्छा समारंभ झाला. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमाची सुरुवात श्री .सरस्वती देवीला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या कार्यक्रमाच्यावेळी रंजन नेरुरकर बोलत होते.

### आमचा विद्यार्थी हे अभिमानाने सांगतो

प्राचार्य डॉ. विष्णू फुलेप्रेते म्हणाले, फक्त गुणपत्रक हे सर्वस्वी आयुष्य नाही. त्या पलीकडे जाऊन जे महाविद्यालयात शिक्षण मिळते त्याचा उपयोग जीवनात होत असतो. आम्ही विद्यार्थ्यांना निरोप देतो त्या वृत्ता आणि शुभेच्छा असतात. भावी आयुष्यात विद्यार्थी विविध क्षेत्रांत मोठ्या पदावर विराजमान झाले की आम्हीही मोठे होतो. आमचा विद्यार्थी हे आम्ही अभिमानाने सांगतो.

या कार्यक्रमात प्रेरणा हीरे, शिवा ठोली, दीपाली जाधव, शुभम लाड, सेलेना म्हापसेकर, कृतिका नलावडे व दीप्ती मासये यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य केदार रेवडेकर उपस्थित होते. विभागप्रमुख प्रा. विनोद पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रा. जगदीश राणे यांनी आभार मानले.

ARTS & COMMERCE COLLEGE [illegible] ESTD. 1995 [illegible]

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

लोकमत
सोमवार २०.०३.२०२३

# फोंडाघाट महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दिली संस्थांना भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : मुंबई विद्यापीठाच्या बीए अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात विविध संस्थांविषयी शिकविले जाते. अशा संस्थांना प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांच्याविषयीची अधिक माहिती विद्यार्थ्यांना घेता यावी, या उद्देशाने फोंडाघाट महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागामार्फत फोंडाघाट विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी व फोंडाघाट तलाठी कार्यालयास क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

प्राचार्य डॉ. विष्णू फुलझेले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या क्षेत्रभेटीच्या वेळी फोंडाघाट विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीचे सचिव प्रसाद देसाई यांनी सोसायटीचा उद्देश, सभासद होण्यासाठीचे निकष, सभासदत्व रद्द कसे होते, नियमनुकीबाबतची माहिती, सभासदांसाठी अल्पमुदती व दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा कोणकोणत्या कारणासाठी व किती केला जातो? तसेच त्यासाठी तारण काय घेतले जाते, शून्य टक्के व्याजदराचा लाभ कसा मिळतो, घर बांधणीसाठीचे कर्ज याबाबतची माहिती दिली.

सिंधुदुर्ग, मंगळवार, दि. २१ मार्च २०२३

लोकमत

# संघर्ष करण्याची तयारी ठेवा : बेळेकर

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : शारीरिक सौंदर्य खुलविण्यापेक्षा बौद्धिक व्यक्तिमत्त्व फुलवा. ब्यूटीपार्लरमधला वेळ व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी खर्च करा. त्यामुळेच दुसरे आपला आदर्श घेतील. स्वतःचे संरक्षण करण्याची धमक तुमच्यात ठेवा. त्यासाठी संघर्ष करण्याची आवश्यकता असते. ती तयारी आपण ठेवली पाहिजे असे मत प्रा. राजश्री बेळेकर यांनी व्यक्त केले.

फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या प्रा. राजश्री बेळेकर यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी प्राचार्य डॉ. विष्णू फुलझेले म्हणाले, समाजात वावरताना निडरपणे वागले पाहिजे. मोरन किंवा मौन या तत्त्वाने वागले पाहिजे. स्त्रीमुक्तीच्या चळवळीत खूप बदल होत गेले. क्रांतिज्योती महात्मा फुले यांनी १७ वर्षांच्या सावित्रीबाईंच्या मदतीने स्त्रियांसाठी शाळा सुरू केली. धर्माच्या नावाखाली मतांत करणाऱ्या धर्मांधांना ती मोठी चपराक होती. जगातल्या पुढारलेल्या देशातही महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता. समान काम समान वेतन हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची देणगी आहे, असेही ते म्हणाले. विभाग प्रमुख डॉ. शिवा मोदी यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रा. नम्रता मेस्त्रीकर यांनी आभार मानले.

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

सकाळ
सिंधुदुर्ग, बुधवार, २२ मार्च २०२३

# वाचन संस्कृतीमध्येच संस्कार

## प्रा. जगदीश राणे; करूळ येथील मधु मंगेश कर्णिक ग्रंथालयाला भेट



फोंडाघाट : करूळ येथील ग्रंथालयाला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी भेट दिली.

फोंडाघाट, ता. २१ : मधुभाई लेखक हे कोकणी भूमीला समर्पित आहे. त्यांच्या लेखनात कल्पनेचा परीस स्पर्श होता. त्याचबरोबर मुंबई आणि कोकण हे त्यांचे पट्टू होते. येथील जाती व्यवस्था, संस्कृती, कला, माणसं, माणसांच्या वृत्ती प्रवृत्ती, निसर्ग, प्राणी यांचे यथार्थ चित्रण दिसते. भूमीशी असणारे नाते अधोरेखित होते, असे प्रतिपादन प्रा. जगदीश राणे यांनी केले.

येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाट मधील मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांनी करूळ येथील मधु मंगेश कर्णिक ग्रंथालयाला भेट दिली. यावेळी प्रा. राणे बोलत होते. प्रारंभी तेथील ग्रंथपाल श्री. शेटये तसेच ग्रंथालय कमिटीच्या सदस्या सौ. गोसावी यांनी विभाग प्रमुख डॉ. सतीश कामत, प्रा. जगदीश राणे व विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

आपल्या मनोगतात बोलताना सौ. गोसावी म्हणाल्या की, "देशात चालतेली वाचन संस्कृती जपण्याचा हा प्रयत्न स्तुत्य आहे. मुलं वाचनालयाकडे येण्याचा ओढा कमी झाला. किंबहुना तो झपाट्याने कमी होत आहे. पुन्हा मुलांना ग्रंथालयाकडे वळवणे आव्हानात्मक आहे. पालक व शिक्षकांनी हे आव्हान स्वीकारले पाहिजे." दरम्यान, ग्रंथपालांनी विद्यार्थ्यांना पुस्तकांची ओळख करून दिली. अनेक प्रकारची पुस्तके मुलांनी हाताळली. ग्रंथालय व्यवहाराची ओळखही करून दिली. या

### विद्यार्थ्यांनो, वाचन करा

■ डॉ. सतीश कामत म्हणाले की "विद्यार्थ्यांनी वाचलेच पाहिजे. ग्रंथालयातील पुस्तके कपाटात पडून राहतात, त्याच्यातली गूढ वाचकांसाठी तळीच राहते हे चित्र चांगले नाही. मधुभाईंनी करूळसारख्या गावात वाचनालय सुरू केले हे संस्कारक्षम समाजासाठी पोषक आहे. त्यांच्या लेखनात हे संस्कार दिसतात. कोकणी प्रामुख्याने मालवणी माणसाचे यथार्थ चित्रण दिसते. त्यामुळे मालवणी माणूस लोकप्रिय झाला झाला झाला."

उपक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू फुलझेले यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

गुरुवार, ९ मार्च २०२३/२

**सकाळ**

# हक्कासाठी संघर्षाचीही तयारी ठेवा

## प्रा. राजश्री बेळेकर; फोंडाघाट येथे जागतिक महिला दिन



फोंडाघाट : येथील महाविद्यालयाने प्रा. राजश्री बेळेकर यांचे स्वागत केले.

फोंडाघाट, ता. ८ : 'शारीरिक सौंदर्य खुलविण्यापेक्षा बौद्धिक व्यक्तिमत्त्व फुलवा. पार्लरमध्ये वेळ व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी खर्च करा. त्यामुळेच दुसरे आपला आदर्श घेतील. स्वतःचे संरक्षण करण्याची धमक बाळगा/ठेवा. त्यासाठी संघर्ष करण्याची आवश्यकता असते. ती तयारी आपण ठेवली पाहिजे. तरच महिला दिन साजरा करण्याचा आपल्याला अधिकार आहे,' असे परखड मत प्रा. राजश्री बेळेकर यांनी व्यक्त केले.

येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालय, फोंडाघाट येथे आयोजित जागतिक महिला दिन कार्यक्रमात प्रा. बेळेकर बोलत होत्या. त्या म्हणाल्या, 'एकोणिसाव्या शतकापर्यंत मतदानाचा अधिकार नव्हता. अमेरिकेत आंदोलनातून स्थापन करण्यात आली; परंतु ती फसवी होती. भारताचा विचार केला तर आजच्या काळातही स्त्री सुरक्षित नाही. कोणतेही एक दिवस साजरा करण्यापेक्षा त्या दिवसाचे विचार आत्मसात करावेत. जिजाऊंच्या मुली या सावित्रीच्या बाण्याच्या असल्या पाहिजेत.' प्राचार्य डॉ. विष्णू कुलकर्णी म्हणाले, की समाजात वावरताना निडरपणे वागले पाहिजे. स्त्री मुक्तीच्या चळवळीत खूप बदल होत गेले. वयाच्या २१ व्या वर्षी महात्मा फुले यांनी १७ वर्षांच्या सावित्रीबाईंच्या मदतीने मुलींसाठी शाळा सुरू केली. धर्मपीठांना ही मोठी चपराक होती. जगातल्या पुढारलेल्या देशांतही महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता. 'समान काम- समान वेतन' ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची देणगी आहे. त्यामुळे स्त्रियांच्या समानतेत फार फरक पडला. विभागप्रमुख डॉ. विद्या मोदी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. [illegible] यांनी आभार मानले.

ARTS & COMMERCE COLLEGE
Estd. 1995
PHONDAGHAT

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

लोकमत
गुरुवार ०२.०२.२०२३

# एनसीसी कॅडेट्सची करूळमधील स्मारकास भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना विभागाच्या वतीने हुतात्मा दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू फुलझेले यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट्स, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी हजर होते.

त्यानंतर महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट्सनी करूळ येथील हुतात्मा स्मारकास भेट देऊन शहिदांना मानवंदना दिली. या कार्यक्रमास दें. नाथ पै ज्ञानप्रबोधिनी हायस्कूलचे एनसीसी कॅडेट्स सुद्धा उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक लक्ष्मण नारकर यांनी हुतात्मा दिनाचे महत्त्व सांगून हुतात्मा भास्कर कर्णिक, हुतात्मा गणेश आठले, हुतात्मा अनंत कान्हेरे या क्रांतिकारकांच्या कार्याच्या इतिहासाला उजाळा दिला तर लेफ्टनंट राज ताडेराव यांनी भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे योगदान सांगून क्रांतिकारकांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाची विद्यार्थ्यांना माहिती दिली.

या कार्यक्रमाप्रसंगी के. ई. शंकरदास, आर. डी. गोसावी, एस. एल. खटावकर, हेमंत कदम, नीलेश फोंडेकर, सिनियर कॅडेट स्वप्नील शिरवलकर, सार्जंट हर्षाली कारेकर व बहुसंख्य विद्यार्थी व एनसीसी कॅडेट्स उपस्थित होते.



फोंडाघाट महाविद्यालयाच्या एनसीसी कॅडेट्सनी करूळ येथील हुतात्मा स्मारकास भेट दिली.

लोकमत
शनिवार ११.०२.२०२३

# फोंडाघाट महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

## विविध कार्यक्रमांचे केले आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाटमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा झाला. मराठी भाषेची प्रौढी व वृद्धीसाठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. महाविद्यालयात साजरा करण्यात आलेल्या या पंधरवड्यात विविध कार्यक्रमांचे आयोजित करण्यात आले होते.

पंधरवड्याच्या निमित्ताने भित्तिपत्रिकेचे अनावरण करण्यात आले. यात मराठी भाषेतील प्रतीत यश प्राप्त लेखकांच्या रेखाचित्रांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. तसेच विद्यार्थ्यांच्या सर्जनशील लेखनाचे प्रकाशनही संस्थेचे अध्यक्ष सुभाष सावंत यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी सुभाष सावंत म्हणाले, आजच्या काळात साहित्यापासून दुरावत चाललेली पिढी वाढत आहे. त्यामुळे लेखक कोण हे ही ओळखणे कठीण आहे. या रेखाकृतीमुळे सत्य लेखकांची ओळखणीची उजळणी झाली. त्याचबरोबर इतर साहित्य दर्जेदार आहे. सुषिता कदम हिने लिहिलेल्या स्वानुभव मनाला स्पर्शून गेला, असे प्रतिपादन केले. या उद्घाटन कार्यक्रमाला महाविद्यालय विकास समितीचे सदस्य केदार रेवडेकर उपस्थित होते.


उपक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू फुलझेले यांच्या मार्गदर्शनाखाली विभाग प्रमुख डॉ. सतीश कामत व सहाय्यक प्राध्यापक जगदीश राणे यांनी यांचे सहकार्य लाभले.

### मालवणी वाक्प्रचारांचे केले संकलन

या पंधरवड्याच्या निमित्ताने मालवणी वाक्प्रचारांचे संकलन करण्यात आले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सुमारे दोनशे मालवणी वाक्प्रचारांचे संकलन केले. तसेच विनोद सांगण्याची स्पर्धा घेण्यात आली. महाविद्यालयातील मुलांनी मराठी मधून विनोद सांगण्याच्या स्पर्धेत सहभाग घेतला. त्याचबरोबर दैनंदिन जीवनात जास्तीत जास्त मराठी भाषा वापरण्याचा संकल्पही केला.

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudu

लोकमत
रविवार १५.०२.२०२३




फोंडाघाट महाविद्यालयात ध्यानाबाबत डॉ. सयाजीराव गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी सतीश कामत आदी उपस्थित होते.

# सुधारित राजयोगाची प्रक्रिया म्हणजे ध्यान

**सयाजीराव गायकवाड : राष्ट्रीय सेवा योजनेचा कार्यक्रम**

लोकमत न्यूज नेटवर्क

**कणकवली :** सध्याच्या धावपळीच्या युगात मानसिक स्वास्थ्य हरवत चालले आहे. त्यामुळे विविध आजारही होत आहेत. त्यामुळे मानसिक स्वास्थ्य चांगले राहण्यासाठी ध्यानाचा उपयोग होतो. सुधारित राजयोगाची प्रक्रिया म्हणजे ध्यान आहे, असे मत डॉ. सयाजीराव गायकवाड यांनी व्यक्त केले.

फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालय व हार्ट फुलनेस एज्युकेशन ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने हृदयोत्सव उपक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सतीश कामत यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

डॉ. कामत हे प्रास्ताविक करताना म्हणाले, धकाधकीच्या काळात स्वतःचे शारीरिक व मानसिक आरोग्य टिकवून ठेवणे आव्हानाचे ठरले आहे. त्यामुळे तरुण पिढी ही हृदयविकाराने त्रस्त होत आहे. यातून मुक्त होण्यासाठी या ट्रस्टमार्फत काम केले जाते. त्याचे साक्षीदार आपण झालो, हे भाग्य आहे.

संदेश सावंत- पटेल म्हणाले, तरुणांना ध्यान आवश्यक आहे. तणतणावाच्या काळात त्याची आवश्यकता आहे. आपले करिअर करताना मेंदू शांत असणे आवश्यक आहे.

प्रशिक्षक डॉ. गोपाळ म्हणाले, आनंद, आरोग्य आणि अभ्यास यांची योग्य सांगड घालण्यासाठी हे प्रशिक्षण आवश्यक आहे. तुमचे गुण आणि तुमच्या अपेक्षा यातील अंतर म्हणजे तणाव. थोडा तणाव आवश्यक असला, तरी तणावग्रस्त होता कामा नये. हे प्रशिक्षण तणाव येऊ नये यासाठी नसून, आलेल्या तणावाला कसं सहन करावं, यासाठी आहे.

जीवनाचे ध्येय आनंद मिळविणे हे असते. आनंद मिळवण्यासाठी मन शांत असणे आवश्यक आहे. त्यामुळे चिंतन आणि ध्यान आवश्यक आहे. हृदय हे भावनांचे केंद्र आहे, प्रेरणांचे केंद्र आहे.

त्यानंतर सयाजीराव गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना ध्यानसाधना कशी करावी, याचे प्रशिक्षण दिले. पहिल्यादिवशी ध्यान, दुसऱ्यादिवशी सिंचन, तिसऱ्यादिवशी प्रार्थना हे सूत्र शिकवले. हार्टफुलनेसचा हा उपक्रम मामी माजगावकर यांच्यावतीने पुरस्कृत करण्यात आला होता.

ARTS & COMMERCE COLLEGE
PHONDAGHAT, TAL. KANKAVLI
ESTD. 1995

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

**लोकमत**

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातील संस्काराची शिदोरी जपून ठेवा : लिंग्रस

## फोंडाघाट महाविद्यालयाचे निवासी श्रमसंस्कार शिबिर उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा निवासी शिबिरांची आवश्यकता आहे. अशा शिबिरात विद्यार्थी घडतात तसेच स्वयंशिस्त पाळतात. स्वतःचे छोटे छोटे निर्णय घ्यायला ते शिकत असतात. त्यामुळे राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातील संस्काराची शिदोरी विद्यार्थ्यांनी जपून ठेवावी, असे प्रतिपादन प्रकाश लिंग्रस यांनी केले.



फोंडाघाट महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या सांगता समारंभाच्या वेळी प्रकाश लिंग्रस यांनी मार्गदर्शन केले.

फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयाचे सन २०२२-२३चे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष निवासी शिबिर फोंडाघाट, गांगोवाडी येथे झाले. त्याच्या सांगता समारोपासाठी प्रकाश लिंग्रस हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. त्यावेळी ते बोलत होते. प्रकाश लिंग्रस म्हणाले, विद्यार्थी शिबिरामध्ये एकमेकांना सहकार्य करायला शिकतात. मित्र-मैत्रिणींची काळजी घ्यायला शिकतात. श्रमाची किंमत त्यांना कळते. एकंदरीतच सर्व समावेशक विकास या विद्यार्थ्यांमध्ये घडत असतो. या सात दिवसांत मी निरीक्षण करत होतो. विद्यार्थी गुणी आहेत. शिकलेले संस्कार घडवून घेणारे आहेत. त्यांच्यामध्ये समाजाप्रती आत्मीयता आहे. संस्कारीत समाज यातूनच घडणार आहे. यासाठी हे विद्यार्थी पात्र आहेत.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. बालाजी सुरवसे यांनी शिबिराची तसेच ज्यांनी शिबिरासाठी मदत केली त्यांचे आभार मानले. अगदी शिबिराला आलेल्या दिवसापासून सांगता होईपर्यंत वाडीतील प्रत्येक घटकाने केलेली मदत फार मोलाची आहे. असे सांगून गांगोवाडीतील प्रत्येक व्यक्तीप्रति कृतज्ञता व्यक्त केली. शिबिराच्या कार्यकाळात रस्ते सफाई, मंदिर सफाई, वनराई बंधारे, प्राथमिक शाळा स्वच्छता, दुपारच्या सत्रातील बौद्धिक चर्चा तसेच सायंकाळी मनोरंजनाचे कार्यक्रम सादर करण्यात आले.

शिबिराच्या ठिकाणी वेळोवेळी संस्थेचे पदाधिकारी, संचालक, महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी भेट देऊन मार्गदर्शन केले.

सांगता समारंभाला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. जगदीश राणे, रूपेश चव्हाण, संदेश लाड, धनावडे, प्रा. रवींद्र आचरेकर, प्रा. संतोष आखाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

प्रहार
सिंधुदुर्ग
रविवार ८ जानेवारी, २०२३

# फोंडाघाट महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी

कणकवली ( वार्ताहर ):

फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाट येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सुंदर पारकर बोलताना म्हणाले की, सावित्रीबाईंनी समाजाच्या उन्नतीसाठी केलेले काम फार महान होते.

स्त्री शिक्षणाचा वसा त्यांनी घेतला. स्त्री समानता, स्वातंत्र्य यासाठी त्यांनी सनातन समाजाविरुद्ध लढा दिला. अध्यक्ष स्थानावरून बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णु फुलझेले म्हणाले की सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या कामाचे आजच्या काळात परिणाम दिसतात.

शिक्षणामुळे अनेक क्षेत्रात स्त्रियांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विभाग प्रमुख डॉ. विद्या मोदी यांनी केले तर आभार प्रा. ममता मंचेकर यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे सर्व कर्मचारी वर्ग व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.




PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

लोकमत
रविवार १६.०४.२०२३



फोंडाघाट महाविद्यालयात प्रा. कीर्ती पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

# कविता ही मानवी जीवनातील स्पंदने टिपते : कीर्ती पाटील

## फोंडाघाट महाविद्यालयात हिंदी काव्यवाचन स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : काव्य हे अनुभवातून साकारत व फुलत जात असते. सततच्या लिखाणाने तेच काव्य प्रगल्भ होते. विद्यार्थ्यांनी आतापासूनच लिखाणाची सवय लावून घेतली पाहिजे. कालांतराने भावीतील विद्यार्थी प्रतिभावंत कवी बनतील. कविता ही जीवनातील स्पंदने टिपते, असे मत प्रा. कीर्ती पाटील यांनी व्यक्त केले.

फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये हिंदी काव्यवाचन स्पर्धा झाली. यावेळी प्रमुख वक्त्या म्हणून प्रा. कीर्ती पाटील बोलत होत्या. त्या पुढे म्हणाल्या, कविताही समाजभान टिकवणारी संस्था आहे. माणसाच्या जीवनपरिवाचे दर्शन घडवते. अवतीभोवतीच्या प्रत्येक घटकात काव्य भरलेले आहे. शब्दांचा आणि भावनांचा योग्य मिलाफ झाला की उत्कृष्ट काव्य तयार होते. माझे काव्य लेखन कमी आहे, परंतु आज मला काव्य स्पर्धेच्या निमित्ताने प्रमुख वक्त्या म्हणून मान मिळाला, तो मान माझा नसून कवितेचा आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू फुलझेले म्हणाले, कविताही समाज घडवण्याचे प्रबोधनात्मक तत्त्व आहे. कवितेमुळे जगात माणुसकी टिकून आहे. कविता माणसाला माणूस म्हणून जगण्याचे, वागण्याचे कौशल्य प्रदान करते.

प्रा. विनोदसिंह पाटील म्हणाले, जगाच्या सर्वच लढ्यात कवितेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. कवितेतून माणसाशी नाते घट्ट होते. त्याचबरोबर स्वातंत्र्य लढ्यात, सामाजिक चळवळ, समाज सुधारणेत, अंधश्रद्धा या विषयातील चळवळींना कवितेने बळकटी दिली. या काव्यवाचन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. तसेच प्राध्यापकांनी सुद्धा कवितेचे वाचन केले. कार्यक्रमाचे डॉ. संतोष रायबोले यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. राज ताडेराव यांनी आभार मानले. स्पर्धेचे परीक्षण डॉ. सतीश कामत यांनी केले. तसेच त्यांनी शंतनू कांबळे यांच्या कवितेचे वाचन केले.

ARTS & COMMERCE COLLEGE ... ESTD. 1995 PHONDAGHAT, TAL. KANKAVLI

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

पुढारी

सिंधुदुर्ग, गुरुवार, ७ एप्रिल २०२२

# फोंडाघाट महाविद्यालयाच्या एन. एस. एस. शिबिराची सांगता

**फोंडाघाट : पुढारी वृत्तसेवा**

फोंडाघाट महाविद्यालयाच्या एन.एस.एस. विभागाच्या निवासी शिबिराची सांगता झाली. या कार्यक्रम प्रसंगी केदार रेडेकर तसेच उद्योजक रमेश नारकर उपस्थित होते. समाज विकासाची प्रक्रिया ही माणसे एकत्र येऊन होते. एन.एस.एस. हे एकत्र येऊन समाजाभिमुख काम करण्याचे उत्तम माध्यम आहे. समाजाला पुढे नेण्याचे काम युवक करत असतो. त्याच्या शक्तीचा उपयोग सकारात्मक झाला तर समाज निश्चितच विकसित होतो, असे प्रतिपादन त्यांनी केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कामत म्हणाले, सात दिवसात आमच्या विद्यार्थ्यांनी घेतलेली काळजी ही वाखाणण्यासारखी आहे. शिबिरातून झालेला आंतरिक बदल हा महत्त्वाचा असतो.

शिबिरामध्ये मंदिर स्वच्छता, रस्ता स्वच्छता, रस्ता दुरुस्ती, प्रबोधन, आरोग्य शिबिर, विविध शासकीय योजनांची माहिती, जलसाक्षरता प्रबोधन असे अनेक कार्यक्रम पार पडले. विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. शिबिराचा रायगड गट - आदर्शगट, सतीश वाळवे - आदर्श स्वयंसेवक, दीपाली जाधव - आदर्श स्वयंसेविका यांचा सत्कार करण्यात आला.

शिबिर यशस्वी पार पाडण्यासाठी रमेश चव्हाण, संदेश लाड, सुहास लाड, प्रा. संतोष जोईल, प्रमोद लाड, बाळा खंबाळेकर यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन वैभव पवार यांनी तर प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. बालाजी सुरवसे यांनी केले. आभार प्रा. संतोष आखाडे यांनी मानले.



फोंडाघाट : एन. एस. एस. विभागाच्या निवासी शिबिराच्या सांगताप्रसंगी उपस्थित विद्यार्थी व शिक्षक.

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal.kankavli, Dist.Sindhudurg

लोकमत
मंगळवार १९.०४.२०२२

# फोंडाघाट महाविद्यालयात समता कार्यक्रमाला प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : फोंडाघाट कला आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

त्यानिमित्ताने महाविद्यालयात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विद्यार्थीविषयक विचार' या विषयावर निबंध स्पर्धा तर 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक सामाजिक चळवळ' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली.

## स्पर्धेतील विजेते

यानिमित्त घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत रसिका संजय पांचाळ प्रथम, ऐश्वर्या विनोद गुरव द्वितीय, तर दिपाली मंगेश जाधव यांनी तृतीय क्रमांक तसेच वक्तृत्व स्पर्धेत अमिशा अनिल पवार प्रथम, साक्षी संजय राणे द्वितीय, पूर्वा अंकुश राणे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील कर्मचारी वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

वक्तृत्व स्पर्धेच्या प्रारंभी डॉ. संतोष रायबोले यांनी महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवान महावीर यांच्या प्रतिमेस अभिवादन केले.

डॉ. डी. बी. ताडेराव यांनी या महामानवांच्या संयुक्त जयंती कार्यक्रमाचे कौतुक करून त्यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेतला. ते म्हणाले, अशा अलौकिक महात्म्यांच्या विचार व कर्तृत्वामुळेच आपला भारत विविधतेने नटलेला दिसतो आहे. तो चिरंतन एकसंध राहू शकतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मानवी मूल्ये जगाला दिली. जगाच्या शांतीसाठी माणुसकीचा धर्म स्वीकारण्याचे आवाहन त्यांनी केले.

भारतातील सामाजिक न्यायाचा लढा ते यशस्वीपणे लढले. आणि भारतीय संविधानासारखे मौल्यवान विचार आपल्या हाती त्यांनी दिले.

पुढारी ११ सोमवार, ९ मे २०२२

# फोंडाघाट महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन

फोंडाघाट : पुढारी वृत्तसेवा

कला व वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाट येथे सांस्कृतिक विभागाच्या वतीने राजर्षी शाहू महाराज यांच्या शंभराव्या स्मृतिदिनानिमित्त शंभर सेकंद स्तब्ध उभे राहून अभिवादन करण्यात आले.

राजर्षी शाहू महाराज यांनी सर्वांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण कायदा केला. सर्व समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी म्हणून प्रत्येक समाजासाठी स्वतंत्र वसतिगृहांची निर्मिती केली. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी राजाराम महाविद्यालयाची स्थापना केली. त्याचबरोबर मागासवर्गीयांच्या उद्धारासाठी त्यांना शिक्षणामध्ये व नोकरीमध्ये ५० टक्के आरक्षणाचा कायदा केला. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी राधानगरी येथे मोठे धरण बांधून नद्यांवर छोटी-छोटी बंधारे बांधण्यास प्रोत्साहन दिले. त्यांच्या या आधुनिक विचार व परिवर्तनशील कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी शंभर सेकंद स्तब्धता पाळून अभिवादन केले.

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal.Kankavli, Dist.Sindhudurg

लोकमत
शनिवार ०७.०५.२०२२



फोंडाघाट कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये सांस्कृतिक विभागाच्या वतीने राजर्षी शाहू महाराज यांच्या शंभराव्या स्मृतिदिनानिमित्त शंभर सेकंद स्तब्ध उभे राहून अभिवादन करण्यात आले.

# फोंडाघाटात राजर्षी शाहू महाराज स्मृतिशतक दिनानिमित्त अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : अस्पृश्यता निवारण, सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी भरीव असे योगदान दिले आहे. त्यांच्या या आधुनिक विचार व परिवर्तनशील कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी फोंडाघाट महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व प्राचार्य यांनी शंभर सेकंद स्तब्धता पाळून त्यांना शुक्रवारी अभिवादन केले.

राजर्षी शाहू महाराज यांनी सर्वांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्यासाठी कायदा केला. सर्व समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी म्हणून प्रत्येक समाजासाठी स्वतंत्र वसतिगृहांची निर्मिती केली. विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण मिळावे यासाठी राजाराम महाविद्यालयाची स्थापना केली. त्याचबरोबर मागासवर्गीयांच्या उद्धारासाठी त्यांना शिक्षणामध्ये व नोकरीमध्ये ५० टक्के आरक्षणाचा कायदा केला.

कृषी क्षेत्राच्या विकासासाठी राधानगरी येथे मोठे धरण बांधून नद्यांवर छोटी-छोटी बंधारे बांधण्यास प्रोत्साहन दिले. शेती मालाला योग्य बाजारपेठ मिळावी यासाठी जयसिंगपूर बाजारपेठेची निर्मिती केली. तसेच कोल्हापूरमध्ये शाहूपुरी, लक्ष्मीपुरी, राजारामपुरी अशा व्यापारी पेठांची निर्मिती केली. तसेच उद्योगधंद्यांच्या विकासासाठी शिवाजी उद्यमनगरची स्थापना केली व अनेक उद्योगधंद्यांना चालना दिली. त्यांनी कोल्हापूर शहर रेल्वेद्वारे संपूर्ण भारताशी जोडले. त्यामुळे शेतीमालाची व औद्योगिक उत्पादित मालाचे दळणवळण सोपे झाले.

शाहू महाराजांचे कार्य थोर होते. त्यामुळे त्यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांना अभिवादन केले.

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal.Kankavli, Dist.Sindhudurg

लोकमत
शनिवार ११.०६.२०२२

# फोंडाघाट महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी विष्णू फुलझेले यांची नियुक्ती

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालय येथे डॉ. विष्णू फुलझेले यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मुंबई विद्यापीठातील उच्चशिक्षित तज्ञ प्रतिनिधी, शासनाचे प्रतिनिधी व महाविद्यालयाच्या व्यवस्थापन मंडळाचे पदाधिकारी असे विविध सदस्य असलेल्या तज्ञ समितीकडून डॉ.विष्णू फुलझेले यांची निवड करण्यात आली व त्यानुसार त्यांची नियुक्ती करण्यात आली.



फोंडाघाट एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सुभाष सावंत यांनी प्राचार्य डॉ.विष्णू फुलझेले यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी चंद्रशेखर लिंग्रस, आनंद मर्वे तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. विष्णू फुलझेले यांची शैक्षणिक क्षेत्रातील ३४ वर्षांची प्रदीर्घ कारकीर्द असून यामध्ये त्यांनी पालघर जिल्ह्यातील डहाणू येथील कर्णाटकर महाविद्यालय येथे वाणिज्य विभागात सहयोगी प्राध्यापक म्हणून अठ्ठावीस वर्षे तर सोनुभाऊ बसवंत महाविद्यालय, शहापूर, जिल्हा ठाणे येथे प्राचार्य म्हणून पाच वर्षे काम केलेले आहे. त्यांनी एम.कॉम, एम.बी.ए, एल.एल.बी, जी.डी.सी. आणि ए., एम. ए., एम. फिल. व पीएच.डी. अशी शैक्षणिक अर्हता प्राप्त केली आहे. गुणवत्ता व्यवस्थापनातील ठाणे जिल्ह्यातील आय.एस.ओ. १००० च्या विशेष संदर्भाने "लघुउद्योगांचा अभ्यास" असा त्यांच्या संशोधनाचा विषय आहे. डॉ.विष्णू फुलझेले यांनी आतापर्यंत ५१ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधनिबंध प्रसिद्ध केले असून वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी मराठी आणि इंग्रजी भाषेमध्ये चार पुस्तकांचे लेखनसुद्धा केलेले आहे. त्यांनी ८० पेक्षा जास्त राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदा व चर्चासत्रांमध्ये सहभाग घेतलेला असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली ११ आंतरराष्ट्रीय आणि २० राष्ट्रीय परिषदा व चर्चासत्रांचे आयोजन झाले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली वाणिज्य शाखेमधील तीन विद्यार्थ्यांनी पीएच.डी ही पदवी प्राप्त केली आहे शिवाय पाच विद्यार्थी पीएच.डी. करत आहेत. फोंडाघाट एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सुभाष सावंत, सचिव चंद्रशेखर लिंग्रस, खजिनदार आनंद मर्वे तसेच संचालक मंडळ व महाविद्यालय विकास समितीचे सदस्यांनी त्यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.

प्रहार
सिंधुदुर्ग
शनिवार ११ जून, २०२२

# फोंडाघाट महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. विष्णू फुलझेले यांची नेमणूक

फोंडाघाट (वार्ताहर) :

येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. विष्णू फुलझेले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबई विद्यापीठातील उच्चशिक्षित तज्ञ प्रतिनिधी, शासनाचे प्रतिनिधी व महाविद्यालयाच्या व्यवस्थापन मंडळाचे पदाधिकारी असे विविध सदस्य असलेल्या तज्ञ समितीकडून डॉ.विष्णू फुलझेले यांची निवड करण्यात आली व त्यानुसार त्यांची नेमणूक करण्यात आली.



प्राचार्य डॉ. विष्णू फुलझेले यांची शैक्षणिक क्षेत्रातील ३४ वर्षांची प्रदीर्घ कारकीर्द असून यामध्ये त्यांनी पालघर जिल्ह्यातील डहाणू येथील कर्णाटकर महाविद्यालय येथे वाणिज्य विभागात सहयोगी प्राध्यापक म्हणून २८ वर्षे तर सोनुभाऊ बसवंत महाविद्यालय, शहापूर, जिल्हा ठाणे येथे प्राचार्य म्हणून पाच वर्षे काम केलेले आहे. त्यांनी एम.कॉम., एम.बी.ए., एल.एल.बी., जी.डी.सी. आणि ए., एम. ए., एम. फिल. व पीएच.डी. अशी शैक्षणिक अर्हता प्राप्त केली आहे. गुणवत्ता व्यवस्थापनातील "ठाणे जिल्ह्यातील आय.एस.ओ. ९००० च्या विशेष संदर्भाने लघु उद्योगांचा अभ्यास" असा त्यांच्या संशोधनाचा विषय आहे.

फोंडाघाट एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सुभाष सावंत, सचिव चंद्रशेखर लिंग्रस, खजिनदार आनंद मर्वे तसेच संचालक मंडळ व महाविद्यालय विकास समितीचे सदस्य यांनी त्यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व महाविद्यालयाची प्रगती याबद्दल कटिबद्ध आहे, असे आश्वासन पदभार स्वीकारताना डॉ.फुलझेले यांनी दिले.

ARTS & COMMERCE COL...
Phondaghat, Tal.Kankavli, Dist.Sindhu...

लोकमत
सिंधुदुर्ग, शनिवार, दि. ५ मार्च २०२२

# मराठीच्या बोली जपून तिचा गौरव वाढवूया

## जगदीश राणे : 'जपुया बोलीचा गोडवा' याचर मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : कोणतीही भाषा समृद्ध होते ती तिच्यात असणाऱ्या बोलीमुळेच. मराठी भाषेलाही बोलीने समृद्ध केले आहे. मालवणीही त्या बोलीपैकीच एक बोली आहे. मालवणीने मराठी भाषेला समृद्ध केलेले आहे. त्यामुळे मालवणी सारख्या सर्व मराठीच्या बोली जपून मराठीचा गौरव वाढवूया, असे विचार मुंबई विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य प्रा. जगदीश राणे यांनी व्यक्त केले.

ते मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय पाचल - रायपाटण आणि कला व वाणिज्य महाविद्यालय - फोंडाघाट यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा व वाङ्मय मंडळ आयोजित मराठी राजभाषा दिन कार्यक्रमात जपुया बोलीचा गोडवा या विषयावर बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. बी. टी. दाभाडे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

प्रा.व्ही. एस. पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. मराठी भाषेवर होणारे इतर भाषांचे अतिक्रमण आपण रोखले पाहिजे. मराठीत इतर भाषेतून घेतलेल्या शब्दांना पर्यायी मराठी शब्द उपलब्ध आहेत. त्या शब्दांचा वापर करून मराठीचा गौरव आपण वाढवला पाहिजे असे आवाहन डॉ. दाभाडे यांनी केले. या ऑनलाईन कार्यक्रमास दोन्ही महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे डॉ. व्ही. एस. पाटील यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा. एस. व्ही. निंबाळकर यांनी आभार मानले. या विभागामार्फत पुस्तक प्रदर्शन, वाचू लिहू मराठी अभियान असे विविध कार्यक्रम यानिमित्ताने झाले.

### मालवणी माणूस संकटापुढे हतबल होत नाही

- प्रा.जगदीश राणे म्हणाले, मालवणी संस्कृती आणि मालवणी माणूस यांनी ही बोली सातासमुद्रापार नेली आहे.
- घरी प्रचंड दारिद्र्य असताना मालवणी माणूस आपल्या बोलीतून पूर्ण समाधानी असल्याचेच विचार व्यक्त करतो.
- ओठातील संवादांविषयी ती कधीही निराशेचा सूर आळवत बसत नाही. मालवणीतील म्हणी जनमानसातील रूढ प्रवाहातून पुढे आलेल्या आहेत.
- मालवणी माणूस कधीही संकटापुढे हतबल होऊन आत्महत्या करताना दिसत नाही.

लोकमत
epaper.lokmat.com
सिंधुदुर्ग, शनिवार, दि. २६ फेब्रुवारी २०२२

# फोंडाघाट महाविद्यालयात जयंती साजरी

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये सांस्कृतिक विभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराज, संत रविदास व संत गाडगेबाबा यांचा संयुक्त जयंती महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात संविधानाच्या प्रास्ताविकेच्या वाचनाने करण्यात आली.

महामानवांच्या कार्याचा आणि भारतात विचारांची क्रांती कशी झाली, याचा आढावा घेणे गरजेचे आहे, असे यावेळी सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. विनोदसिंह पाटील यांनी सांगितले.

प्रा. डॉ. राज ताडेराव यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. त्यानंतर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सतीश कामत यांनी पाहुण्यांना ग्रंथ देऊन त्यांचे अनोख्या पद्धतीने स्वागत केले. त्याचबरोबर प्रा. डॉ. सोमनाथ कदम यांनीही महाविद्यालयाला भेट म्हणून १४ ग्रंथ दिले.

डॉ. सोमनाथ कदम म्हणाले, माणसांची ओळख टप्प्याटप्प्याने होत जाते. सर्व प्रकारच्या विचारांची ओळख विद्यार्थ्यांना झाली पाहिजे. प्राचीन ते आधुनिक काळापर्यंत अनेक महामानवांनी विचारांचा जागर केला होता. म्हणूनच आजचा परिवर्तनशील भारत सर्वांना पाहायला मिळतो. या महामानवांचे उपकार प्रत्येक माणसावर झालेले आहेत. त्याची जाणीव सर्वांनी करून घेणे गरजेचे आहे.

ARTS & COMMERCE COLLEGE PHONDAGHAT TAL. KANKAVLI ESTD. 1995

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

लोकमत

सिंधुदुर्ग, शनिवार, दि. १२ मार्च २०२२



लोकराजा शाहू संविधान संवाद प्रशिक्षण केंद्रायावतीने सावित्री वदते ही पुस्तिका भेट देण्यात आली. (छाया : निकेत पावसकर)

# फोंडाघाट येथे संविधान संवादशाळेला प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

तळेरे : लोक राजा शाहू संविधान संवाद प्रशिक्षण केंद्र सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त फोंडाघाट एज्युकेशन सोसायटीचे कला व वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाट येथे संविधान संवाद शाळा घेण्यात आली.

यावेळी मुलांशी संविधान ह्या विषयावर संवाद साधण्यात आला.

संविधान म्हणजे काय ? संविधानाची गरज का आहे? हे सर्व सांगणारी प्रस्ताविका, या प्रस्ताविकेवर व त्यातील मूल्यावर तसेच लोकशाही असुदात की धर्मनिरपेक्षता या महत्त्वाच्या मूल्यांवर विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि शिक्षकांशी संवाद सत्र संविधान संवादक सुजय स्वप्नाली सत्यवान यांनी घेतले. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ॲड. स्वाती तेली, कॉलेजचे प्राचार्य डॉ. सतीश कामत, सावित्रीबाई फुले महिला विकास कक्षाच्या प्रमुख प्रा. राधिका सावंत, डॉ. राज ताडेराव, संतोष रायबोले, प्रमोदसिंह पाटील आदी उपस्थित होते.

ह्या संवादशाळेसाठी केंद्राचे संवादक सुनील स्वामी, राजवैभव शोभा रामचंद्र, हर्षल जाधव, रेश्मा खाडे, शीतल यशोधरा, तुषार घोपडे, शर्मिला जोशी, उमेश खानखेडे, प्रमोद गायधनी, मीनाक्षी खातगावकर, अमोल कदम, सुमित प्रतिभा संजय, महेश बिराजदार, निलेश सांबळे, दीपाली कांबळे, मुक्ता निशांत, अमर पवार, गायत्री आडे, जावेद शहा व सर्व आम्ही संविधान संवादक टीम महाराष्ट्र यांचे मार्गदर्शन लाभले. याशिवाय जिल्ह्यातील इतर शाळा कॉलेजमध्ये, वाड्या वस्त्या, गाव संवाद शाळा आणि कार्यशाळा घेण्याची इच्छा व्यक्त केली.

ARTS & COMMERCE COLLEGE
ESTD. 1995
PHONDAGHAT TAL. KANKAVLI

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudu

सकाळ

सिंधुदुर्ग, रविवार, १३ मार्च २०२२

# संविधानामुळे स्त्रियांना महत्त्वाचे स्थान

## ॲड. स्वाती तेली : फोंडाघाट येथील महाविद्यालयात मार्गदर्शन

फोंडाघाट, ता. १२ : संविधान हे प्रत्येक भारतीयाच्या दैनंदिन जीवनाशी निगडित आहे. ते कोणा एका व्यक्तीची मक्तेदारी नसून प्रत्येकाचे आहे. या संविधानाच्या माध्यमातून न्याय, स्वातंत्र्य, समता ही मूल्ये यांची ओळख आपल्याला होत असते. आपल्या संविधानामुळे स्त्रियांना महत्त्वाचे स्थान मिळू लागले आहे. अर्थात त्यासाठी खूप मोठा संघर्ष करावा लागला असे प्रतिपादन ॲड. स्वाती तेली यांनी येथे बोलताना केले.



फोंडाघाट : महिला दिनी मार्गदर्शन करताना ॲड. स्वाती तेली.

येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या सावित्रीबाई फुले महिला विकास कक्षाच्या माध्यमातून जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी संविधान आणि महिला सबलीकरण या विषयावर ॲड. स्वाती तेली बोलत होत्या. त्या म्हणाल्या की, संविधानात स्त्री हक्काविषयी अनेक कायदे झाले आहेत. महिलांवर होणारे अन्याय, अत्याचार महिला निमूटपणे सहन करते. त्याला कारण म्हणजे कायद्याविषयी अज्ञान. कोणत्याही गोष्टीचा कायदेशीर तथा देणे, कायदेशीर ज्ञान मिळणे हे नेहमी चांगले असते. आपण जर कायद्याने सज्ञान झालो तर आपण अन्यायाविरुद्ध निश्चितपणे गुरगुरणार. ही ताकद संविधानाने दिली आहे. हक्काविषयी जागृत असणारी स्त्री समाजात स्वाभिमानाने जगू शकते. डॉ. सतीश कामत यांनी मार्गदर्शन केले. प्रा. राधिका सावंत यांनी प्रास्ताविक केले. डॉ. राज ताडेराव यांनी परिचय केला. खुशी कामतेकर व रेवती मेस्त्री यांनी सूत्रसंचालन केले. संतोष रायबोले यांनी आभार मानले. ॲड. स्वाती तेली यांच्यावतीने भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेची भेट देण्यात आली.

लोकमत
सिंधुदुर्ग, रविवार, दि. २७ मार्च २०२२



फोंडाघाट महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांनी राधाकृष्ण मंदिराची स्वच्छता केली.

# युवाशक्तीला योग्य दिशा दिल्यास अभूतपूर्व कार्याचे प्रात्यक्षिक

## राधाकृष्ण मंदिराची विद्यार्थ्यांनी केली स्वच्छता

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : फोंडाघाट कला आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या निवासी श्रमसंस्कार शिबिरांतर्गत मुला-मुलींनी फोंडाघाट बाजारपेठेतील मध्यवर्ती असलेल्या श्री राधाकृष्ण मंदिराची संपूर्ण स्वच्छता केली. त्याचबरोबर समाजापुढे स्वच्छता व आरोग्याचा चांगला पायंडा घालून दिला. युवाशक्तीला योग्य दिशा दिल्यास अभूतपूर्व कार्य घडू शकते, याची प्रचिती या कामातून आली.

यावेळी मंदिर व्यवस्थापन समिती सदस्य गुणेश कोरगावकर, दिलीप पारकर, बाळा वळंजू यांनीसुद्धा पदाधिकारी व प्राध्यापक वर्ग तसेच मुला-मुलींना धन्यवाद दिले. श्रमसंस्कार शिबिरार्थींना प्रोत्साहन देताना, मोफत चहापान व नाश्त्याची सोय करणाऱ्या समीर पारकर यांचेही आभार मानण्यात आले.

यावेळी मुला-मुलींनी कोळीष्टके काढून सर्व भिंती, फरशी आणि सभामंडपाची संपूर्ण स्वच्छता करून पावित्र्याची अनुभूती भाविकांना घडविली. आजवर निवासी शिबिरामध्ये वाडीवरील साक्षरता, पर्यावरण संरक्षण, आपत्कालीन, नैसर्गिक आपत्ती, पीडितांचे दुःख, समाजसेवा, बंधारे, आरोग्य,मंदिरांची स्वच्छता यासाठी वाडी वाडीत काम करून अहवाल सादर केले जात होते. समाजाच्या हितासाठी समाजातील लोकांबरोबर काम करताना एन.एस.एस.चे ब्रीदवाक्य 'नॉट मी,बट यू'चे यथार्थ दर्शन या निवासी शिबिरार्थींनी फोंडाघाटवासीयांना घडविले. यावेळी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाष सावंत, आनंद मर्ये, संदेश सावंत-पटेल, केदार रेवडेकर, लक्ष्मीकांत कोरगावकर, सुंदर पारकर, सुरेश पारकर, अतुल कोरगावकर यांनी भेट देऊन कामाचा गौरव केला.

ARTS & COMMERCE COLLEGE
SINDHUDURG
ESTD. 1995
PHONDAGHAT TAL. KANKAVLI

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

प्रहार
सिंधुदुर्ग
रविवार २७ मार्च, २०२२

Arts & Commerce College, Phondaghat, Tal. Kankavli
Estd. 1995

# फोंडाघाट कॉलेजच्या विद्यार्थ्यांकडून राधाकृष्ण मंदिर परिसराची स्वच्छता

## राष्ट्र- युवाशक्तीला, योग्य दिशा दिल्यास अभूतपूर्व कार्याचे प्रात्यक्षिक




फोंडाघाट कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांकडून राधाकृष्ण मंदिर व परिसराची स्वच्छता करण्यात आली. (छाया: कुमार नाडकर्णी).

**फोंडाघाट :**

कला आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या, निवासी श्रमसंस्कार शिबिराअंतर्गत मुला-मुलींनी, फोंडाघाट बाजारपेठेतील मध्यवर्ती,राधाकृष्ण मंदिर व परिसराची संपूर्ण स्वच्छता केली. व समाजापुढे स्वच्छता- आरोग्याचा पायंडा घालून दिला. मंदिर व्यवस्थापनाचे मुकेश कोरगावकर, दिलीप पारकर, बाळा वर्दम यांनी सुद्धा पदाधिकारी व प्राध्यापक वर्ग तसेच मुला-मुलींना धन्यवाद दिले. श्रमसंस्कार शिबिरार्थींना प्रोत्साहन देताना, मोफत पाहुणचार व नाश्त्याची सोय करणाऱ्या स्वागताचे समीर पारकर यांचेही कौतुक होत आहे.

यावेळी मुला-मुलींनी सर्व भिंती, फरशी आणि सभामंडपाची संपूर्ण स्वच्छता करून श्रमिकांची अनुभूती भाविकांना पटविली. आजवर निवासी शिबिरामध्ये वाडीवरील साक्षरता, पर्यावरण, संरक्षण, आपत्कालीन, नैसर्गिक आपत्ती, पीडितांचे दुःख, समाजसेवा, बंधारे, आरोग्य, मंदिरांची स्वच्छता यावर वाडी वाडी ठिकाणी काम करून अहवाल सादर केले जात होते. समाजाच्या हितासाठी समाजातील लोकांबरोबर काम करताना एन. एस. एस. चे ब्रीदवाक्य 'नॉट मी,बट यू' चे यथार्थ दर्शन या निवासी शिबिरार्थींनी फोंडाघाट वासियांना पटविले. समाज सेवेतून राष्ट्रसेवा करण्याची शिकवण राष्ट्रीय सेवा योजने तून साकारली, याचेच सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी चेअरमन सुभाष सावंत, आनंद मर्ये, संदेश सावंत, केदार रेवडेकर, लक्ष्मीकांत कोरगावकर, सुंदर पारकर, सुरेश पारकर, अतुल कोरगावकर यांनी भेटी देऊन कामाचा गौरव केला. विभाग प्रमुख डॉक्टर बालाजी सुरवसे, संतोष आखाडे, अण्णा तायशेटे, संतोष पेडणेकर यांनीही विशेष परिश्रम घेतले.

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

लोकमत

सिंधुदुर्ग, बुधवार, दि. ३० मार्च २०२२

# यशामुळे आत्मविश्वास वाढतो

## अक्षय आहेर : फोंडाघाट महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : नियोजनबद्ध अभ्यास केला तर कोणत्याही परीक्षेत निश्चितच यश मिळविता येते. आपण पाण्यात उडी मारली की प्रयत्नांनी किनारा नक्की सापडतो. यशामुळे आत्मविश्वास वाढतो आणि मग जीवन सुंदर वाटायला लागते, असे प्रतिपादन अक्षय आहेर यांनी केले.

फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालय येथे सी. ए. परीक्षेची तयारी कशी करावी? या विषयावर अक्षय आहेर यांचे मार्गदर्शन स्पर्धा परीक्षा व कॉमर्स विभागाच्यावतीने आयोजित करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

ते म्हणाले, आपण काही तरी करायचे ठरवले तर ते नक्कीच साध्य करता येते. शिक्षणासाठी खर्च केलेले पैसे ही एक गुंतवणूक असते. प्रयत्न करीत गेल्यावर अनेक मार्ग सापडत जातात. संघर्ष प्रत्येकाच्या आयुष्यात असतो. मात्र, स्वतःची ओळख निर्माण करण्याची जिद्द अंगी असली पाहिजे. सी. ए. चा अभ्यास हा सुद्धा एक नियोजित अभ्यास असतो. त्याची प्रत्येक पायरी समजून घेतली पाहिजे. पैशाचा बाऊ न करता स्वतः अभ्यास केला तर नक्की यश मिळते. आपल्याला लोक नक्की शाबासकी देतात. त्यामुळे योग्य अभ्यास केला पाहिजे.




फोंडाघाट महाविद्यालयात अक्षय आहेर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### कष्ट केले पाहिजेत

संस्थेचे संचालक संदेश सावंत-पटेल म्हणाले, कोणत्याही यशाला कष्टाची फार जोड लागते. आपल्या ग्रामीण भागातून पुढे येणारे हे टॅलेंट आपला आदर्श असले पाहिजे. भविष्यात काय करणार याबाबत ध्येय ठरले पाहिजे. आणि त्यादृष्टीने आपण कष्ट केले पाहिजेत.

### जीवन जगले पाहिजे

प्रा. डॉ. संतोष रायबोले म्हणाले, स्पर्धा परीक्षेत यश मिळवलेले उमेदवार वैशिष्ट्यपूर्ण असतात. आपल्यातली एक व्यक्ती जरी अशा उच्च पदावर पोहोचेल तेव्हा खूप आनंद होईल. परिस्थितीवर मात करून मिळवलेले यश हे फार आनंददायी असते. मी कोण आहे? याचे उत्तर मिळवण्यासाठी आपण जीवन जगले पाहिजे, असे ते म्हणाले. प्रा. संतोष जोईल यांनी सूत्रसंचालन तर डॉ. बाजीराव हाथले यांनी आभार मानले.

सिंधुदुर्ग, गुरुवार, दि. ३१ मार्च २०२२



फोंडाघाट महाविद्यालयात आयोजित क्रीडा महोत्सवाचा शुभारंभ प्राचार्य सतीश कामत यांनी केला. यावेळी प्रा. जगदीश राणे यांच्यासह अन्य प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

# हार-जीत यापेक्षा खिलाडूवृत्ती सर्वांच्या लक्षात राहते

## जगदीश राणे : फोंडाघाटमध्ये क्रीडा महोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : कोविडच्या दीर्घ विश्रांतीनंतर आपण परत खेळाच्या स्पर्धा सुरू करीत आहोत. खेळ हे खिलाडूवृत्तीने खेळले गेले पाहिजेत. हार-जीत यापेक्षा चांगल्या प्रतीची खिलाडूवृत्ती सर्वांच्या लक्षात राहते. त्यामुळे कोणतेही वाद न घालता सर्व खेळाडूंनी या महोत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन क्रीडा विभाग प्रमुख प्रा. जगदीश राणे यांनी केले. फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयाचा सन २०२१-२०२२ चा वार्षिक क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते.

तीन दिवस चाललेल्या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सतीश कामत यांच्या हस्ते झाले. यावेळी ते म्हणाले की, जीवनाला नियमबद्धतेत बांधण्याचे काम क्रीडा क्षेत्र करते. प्रत्येक खेळाचे नियम स्वतंत्र असतात. आणि त्या नियमात राहूनच आपल्याला खेळावे लागते. एकदा का नियम पाळण्याची सवय लागली की दैनंदिन जीवनातही आपण नियमात वागतो. आणि शिस्तबद्ध मानून घडतो.

या महोत्सवात १०० मीटर, २०० मीटर धावणे, थाळीफेक, भालाफेक, बुद्धिबळ, कॅरम, कबड्डी, व्हॉलीबॉल हे क्रीडा प्रकार घेण्यात आले.


PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

बुधवार, २३ फेब्रुवारी २०२२ पुढारी

# फोंडाघाट महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना उद्‌बोधन वर्ग

**फोंडाघाट : पुढारी वृत्तसेवा**

कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाटमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या उद्‌बोधन वर्ग झाला. प्रास्ताविकामध्ये बोलताना कार्यक्रम अधिकारी डॉ. बालाजी सुरवसे यांनी एन. एस. एस. विभागाचे महत्त्व सांगितले. फक्त श्रमदानापुरतेच विभागाचे कार्य मर्यादित नसून संकट काळी मदत, स्वच्छता अभियान, पल्स पोलिओ, निराधार आश्रमांसाठी मदत अशा अनेक गोष्टीत महाविद्यालयाच्या एन.एस.एस. विभागाने भरीव काम केले आहे. कोविड काळात या काळात पडलेले अंतर भरून काढले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.



कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मान्यवर.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक लेफ्टनंट डॉ. डी. बी. राठोड म्हणाले, समाजाची गरज ओळखून मदत करणारा विभाग म्हणून एन.एस.एस. विभागाकडे पाहिले जाते. आपल्या महाविद्यालयाने पूर परिस्थिती व स्वच्छता अभियान, पल्स पोलिओ अभियान यात भरीव काम केले आहे. एन.एस.एस. निवासी शिबिरामध्ये विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडत असते. वर्षभरातील १२० तासांचे काम फार मोठे राष्ट्रीय काम करतात. स्वतः बरोबरच समाज सुधारण्याचे काम करत असतो. एन.एस.एस. विभागाचे काम हे मनापासून करावे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. सतीश कामत म्हणाले, महामारीचा काळ विसरून आपल्याला नव्या उमेदीने कामाला लागणे गरजेचे आहे. त्या काळाने माणसाला माणसापासून दूर करण्याचे काम केले. माणूस मोबाईलमध्ये गुंतून एकलकोंडा झाला. म्हणून कोविड काळात शारीरिक अंतर ठेवणे गरजेचे असताना सामाजिक अंतर वाढत गेले. हेच समाजाच्या दृष्टीने हानिकारक ठरले. आता ते कमी केले पाहिजे. माणसा-माणसांमधील दरी कमी करणे गरजेचे असून त्यासाठी एनएसएस विभाग मदत करू शकतो. समाजासाठी काम करण्याची शिकवण हा विभाग देतो. त्यामुळे समाजाची गरज ओळखण्यासाठी या विभागात जोमाने काम केले पाहिजे, असे प्रतिपादन केले.

सूत्रसंचालन डॉ. बालाजी सुरवसे यांनी तर आभार प्रा. संतोष आखाडे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचा कर्मचारीवर्ग व एन.एस.एस. विभागाचे स्वयंसेवक उपस्थित होते.

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

# उच्च शिक्षण हाच परिवर्तनाचा केंद्रबिंदू आहे : डॉ. प्रमोद मेश्राम

## फोंडाघाट महाविद्यालयात 'नॅक' अहवाल मार्गदर्शन कार्यशाळा

**फोंडाघाट : पुढारी वृत्तसेवा**

कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाट अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षाच्यावतीने एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेसाठी सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यामधील प्राध्यापक उपस्थित होते. 'नॅकसाठी SSR अहवाल कसा पद्धतीने तयार करावा', या विषयावर ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.



कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. प्रमोद मेश्राम. सोबत मान्यवर.

कार्यशाळेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून पावस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद मेश्राम आणि याच महाविद्यालयाचे नॅकसमन्वयक डॉ. संजय निवाळकर उपस्थित होते. प्रा. डॉ. प्रमोद मेश्राम म्हणाले, ग्रामीण भागातील सर्वच महाविद्यालयांची परिस्थिती सारखीच असते. काही शैक्षणिक उपक्रम हे संयुक्तपणे राबविल्यास, त्याचा निश्चित उपयोग दोन्ही महाविद्यालयांना होईल. यासाठीच दोन महाविद्यालयामध्ये सामंजस्य करार करून शैक्षणिक उपक्रमांची देवाणघेवाण करता येईल. अशा उपक्रमामुळे शिक्षणाचा गुणात्मक दर्जा वाढण्यास मदत होईल.

प्रा. संजय निवाळकर म्हणाले, पूर्वीप्रमाणे सध्या नॅकचे कामकाज किंवा अहवाल राहिलेला नसून, त्यामध्ये अमुलाग्र बदल झाला आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे महाविद्यालयीन स्तरावर राबविलेल्या उपक्रमांची माहिती, डिजिटल पद्धतीने सर्वांपर्यंत पोहोचली पाहिजे. यासाठी अनेक माध्यमांचा वापर करता येतो.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सतीश कामत आपल्या अध्यक्षीय भाषणात 'नॅक'ला सामोरे जाताना घ्यावयाची काळजी याविषयी माहिती दिली. कार्यशाळेमध्ये सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी सामंजस्य करारावर दोन्ही महाविद्यालयाच्या प्राचार्य व समन्वयकाच्या स्वाक्षऱ्या करून संबंधितांनी त्याचे आदानप्रदान केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन, नॅकसमन्वयक डॉ. राजाराम पाटील यांनी केले, तर प्रा. वि. वि. पाटील यांनी आभार मानले.



PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

लोकमत
सिंधुदुर्ग, बुधवार, दि. १२ जानेवारी २०२२

# हिंदी भाषा ही एकतेचे प्रतीक आहे

## महादेव नारिंगकर; फोंडाघाट महाविद्यालयात विश्व हिंदी दिवस साजरा

ARTS & COMMERCE COLLEGE
ESTD. 1995
PHONDAGHAT Tq. KANKAVLI

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : हिंदी भाषेत विविध प्रकारचे साहित्य फार मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळे जागतिक पातळीवरही या भाषेला आता महत्त्व प्राप्त होत आहे. हिंदी भाषा ही एकतेचे प्रतीक आहे, असे मत प्रा. महादेव नारिंगकर यांनी व्यक्त केले.

फोंडा घाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये विश्व हिंदी दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. महादेव नारिंगकर उपस्थित होते. यावेळी ते बोलत होते. त्यांनी हिंदी दिनाचे महत्त्व विशद करून हिंदी



फोंडाघाट महाविद्यालयात विश्व हिंदी दिन साजरा झाला. यावेळी प्रा. महादेव नारिंगकर, प्रा. संतोष रायबोले आदींनी हिंदी भाषेचे महत्त्व विशद केले.

भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी केलेले प्रयत्न सांगितले. हिंदी भाषा फक्त भारतातच नाही तर संपूर्ण जगात प्रसिद्ध झाली आहे. मूळ संस्कृत भाषेतून हिंदी भाषेचा जन्म झाला. त्यानंतर मात्र या भाषेने आपला प्रचार आणि प्रसार केला. जनमानसात जागा मिळवली, असे प्रा. नारिंगकर म्हणाले.

लोकमत
सिंधुदुर्ग, बुधवार, दि. २ फेब्रुवारी २०२२

# फोंडाघाट महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आपली भाषा जगली पाहिजे, टिकली पाहिजे तसेच तिचा प्रसार आणि प्रचार झाला पाहिजे, या उद्देशाने महाविद्यालयाच्या मराठी विभागाने कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

पहिल्याच कार्यक्रमात अभिनय कार्यशाळा घेण्यात आली. यासाठी प्रसिद्ध निवेदक, अभिनेते नीलेश पवार यांनी मुलांना मार्गदर्शन केले. अभिनयात भाषा, शब्दफेक, आवाज तसेच समयसूचकता कशी उपयुक्त असते, याचे प्रात्यक्षिक करून त्यांनी मुलांमध्ये नवचेतना आणली. त्यानंतर अजय कांडर लिखित 'युगानुयुगे तूच' या दीर्घकवितेचा काव्याभिनय करण्यात आला.

दुसरे पुष्प गुंफताना कथाकथन सादर करण्यात आले. त्यानिमित्ताने नवीन कथाकार डॉ. प्रज्ञाकुमार गावडे व कथाकथनकार रविकांत मुळ्ये यांनी कथाकथनाद्वारे भाषासंवर्धन कसे करता येईल, याचे मार्गदर्शन केले.

कथा ही भाषा शिकण्याची प्राथमिक पायरी आहे. त्यांच्या कथेतून ग्रामीण भाग, भाषा, मराठी माणसे यांचे उत्तम उदाहरण दिले. 'हातमोजे' या कथेतून माणसाच्या अंधश्रद्धेवर प्रकाश टाकण्यात आला. तिसऱ्या कार्यक्रमात फोंडाघाट परिसरातील मान्यवर कवींचे कवितावाचन झाले. रविकांत शिरोडकर, प्रा. संतोष जोईल, विजय पालाडे, डॉ. सतीश कामत, प्रा. जगदीश राणे यांनी स्वरचित कवितांचे वाचन करून कार्यक्रमात रंगत आणली.

चौथ्या कार्यक्रमात 'मराठी भाषा आणि रोजगार संधी' या विषयावर वैभववाडी महाविद्यालयाच्या प्रा. संजीवनी पाटील यांनी मुलांशी संवाद साधला. भाषेमुळे संवादलेखन, कथालेखन, गीतलेखन त्याचबरोबर भाषांतर, मुद्रितशोधन या प्रकारातून रोजगार उपलब्ध होऊ शकतो. तेवढ्यात फ्रीलान्स लेखनातून रोजगार निर्माण केला असून, त्यांच्याकडे रोजगार संधी म्हणून पाहणे गरजेचे आहे. पाचवे व शेवटचे पुष्प गुंफताना रमेश सावंत यांनी 'मराठी भाषा विकास व संवर्धन' या विषयावर भाष्य केले.

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhu

प्रहार | मुंबई रविवार, २ जानेवारी २०२२

# फोंडाघाट महाविद्यालयाची व्यसनमुक्ती जनजागृती रॅली



फोंडाघाट महाविद्यालयाने व्यसन विरोधी जनजागृती रॅली फोंडाघाट बाजारपेठेतून काढली. (छाया: कुमार नाडकर्णी)

**फोंडाघाट :**

आज तरुण पिढी मोठ्या प्रमाणावर व्यसनाधीन होत आहे. गुटखा, तंबाखू, धुम्रपान, दारू या व्यसनांच्या आहारी जात असून त्यामुळे शारीरिक, मानसिक, आर्थिक तसेच सामाजिक दुष्परिणामांना सामोरे जावे लागत आहे. हे रोखण्यासाठी कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाटच्या राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.), तसेच एन.एस.एस. व आजीवन अध्ययन विस्तार विभागांच्यावतीने 'व्यसनमुक्ती जनजागृती रॅली'चे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांनी तयार केलेले व्यसन विरोधी जनजागृतीचे फलक लक्षवेधी ठरले. विद्यार्थ्यांनी 'दारूने झिंगला - संसार भंगला' 'नको की आदत देगी, बिमारी को दावत' असा अनेक व्यसन विरोधी घोषणा देऊन फोंडाघाट परिसर दणाणून टाकला.

फोंडाघाट महाविद्यालयातून निघालेली व्यसन विरोधी जनजागृती रॅली फोंडाघाट बाजारपेठेतून नेऊन तिची फोंडाघाट एसटी स्टॅण्ड येथे सांगता झाली. एन.सी.सी. विभाग प्रमुख लेफ्टनंट डॉ. राज ताडेराव, एन.एस.एस. विभाग प्रमुख प्रा. डॉ. बालाजी सुरवसे, आजीवन अध्ययन विस्तार विभाग प्रमुख प्रा. संतोष रायबोले जिमखाना विभागप्रमुख प्रा. जगदीश राणे यांनी या व्यसन विरोधी जनजागृती रॅलीचे यशस्वीरीत्या आयोजन केले. यावेळी महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

लोकमत | सिंधुदुर्ग, रविवार, दि. २ जानेवारी २०२२

# फोंडाघाट येथे व्यसनमुक्ती जनजागृती रॅलीच्या माध्यमातून केले जनप्रबोधन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कणकवली :** तरुण पिढी मोठ्या प्रमाणावर व्यसनाधीन होत आहे. गुटखा, तंबाखू, धुम्रपान, दारू या व्यसनांच्या आहारी जात असून त्यामुळे शारीरिक, मानसिक, आर्थिक तसेच सामाजिक दुष्परिणामांना सामोरे जावे लागत आहे. हे रोखण्यासाठी कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाट एन.सी.सी., एन.एस.एस. अध्ययन विस्तार विभागांच्या वतीने व्यसनमुक्ती जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीच्या माध्यमातून नागरिकांचे प्रबोधन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी तयार केलेले व्यसन विरोधी जनजागृतीचे फलक लक्षवेधी ठरले. विद्यार्थ्यांनी ३१ डिसेंबर - नो बीअर, नो चिअर, 'दारूने झिंगला - संसार भंगला' अशा अनेक व्यसन विरोधी घोषणा देऊन फोंडाघाट परिसर दणाणून टाकला.



फोंडाघाट महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी व्यसन विरोधी रॅली काढून जनजागृती केली.

फोंडाघाट महाविद्यालयातून निघालेली व्यसन विरोधी जनजागृती रॅली, बाजारपेठ मार्गे एसटी स्टॅण्ड येथे नेण्यात आली. तसेच तिथे रॅलीची सांगता करण्यात आली. एन.सी.सी. विभागप्रमुख मेजर ले. डॉ. ताडेराव, एन.एस.एस.विभागप्रमुख प्रा. डॉ. बालाजी सुरवसे,आजीवन अध्ययन विस्तार विभाग प्रमुख प्रा. संतोष रायबोले जिमखाना विभागप्रमुख प्रा. जगदीश राणे यांनी या व्यसन विरोधी जनजागृती रॅलीचे यशस्वीरीत्या आयोजन केले. यावेळी महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

ARTS & COMMERCE COLLEGE PHONDAGHAT, TAL. KANKAVLI estd. 1995

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

लोकमत epaper.lokmat.com
सिंधुदुर्ग, शनिवार, दि. २७ नोव्हेंबर २०२१

# संविधानामुळेच मानवतेचे योग्य रक्षण होत आहे : राज ताडेराव

लोकमत न्यूज नेटवर्क

**कणकवली :** भारत हा असा जगातला एकमेव देश असेल की, ज्या देशाने कोणावरही हल्ला केलेला नाही. परंतु भारतावर अनेकांनी हल्ले केले. ब्रिटीश राजवटीत अनेक कायदे मंजूर झाले. स्वातंत्र्यानंतर भारताने संविधानाचा स्वीकार केला. संविधानामुळेच मानवतेचे योग्य रक्षण होत आहे, असे मत लेफ्टनंट डॉ. राज ताडेराव यांनी व्यक्त केले.



फोंडाघाट महाविद्यालयात संविधान दिनानिमित्ताने डॉ. राज ताडेराव यांनी मनोगत व्यक्त केले.

फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालय येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या आजीवन अध्ययन विस्तार विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी लेफ्टनंट डॉ. ताडेराव बोलत होते.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी लेफ्टनंट डॉ. ताडेराव म्हणाले, संविधान हा भारतीयांना मिळालेला अमूल्य ठेवा आहे.

अनेक परकीय तज्ज्ञ म्हणतात की, भारतातून नेण्यासारखे सर्वात अमूल्य म्हणजे भारतीय संविधान आहे. संविधानामुळे देशाच्या विविध परंपरा, संस्कृती, सण, समारंभ, धर्म, जाती, जमाती असा विविधता एकत्रितपणे बांधणी करून संपूर्ण देश एकसंघ करण्याचे काम संविधानाने केले आहे. संविधानाची सुरुवातच आम्ही भारतीय लोक अशी आहे.

डॉ. संतोष रायबोले म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक सुधारणेवर भर दिला आणि त्यानंतरच मानवी अधिकाराचा विचार या देशात होऊ लागला. जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाही असलेल्या देशात मताधिकार हा फार मोठा अधिकार प्राप्त झाला. संविधान हा शब्द मानवतेचा संदेश देणारा आहे.

डॉ. बालाजी सुरवसे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तर प्रा. संतोष आखाडे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ARTS & COMMERCE COLLEGE PHONDAGHAT TAL. KANKAVLI ESTD. 1995

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

**तरुण भारत** ■ गुरुवार, ११ नोव्हेंबर २०२१

# फोंडाघाट कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांचे विशेष लसीकरण शिबीर




फोंडाघाट : मार्गदर्शन करताना डॉ. सचिन जंगम, सोबत सतीश कामत, बालाजी सुरवसे, राणे, दीपक सावंत.

वार्ताहर
फोंडाघाट

येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयातील एनएसएस व डीएलएलई विभागामार्फत महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडील मिशन युवा स्वास्थ्य मोहिमेंतर्गत विशेष लसीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेंतर्गत महाविद्यालयात गुरुवारी विशेष लसीकरण शिबीर घेण्यात आले. याचा महाविद्यालयीन विद्यार्थी व शिक्षकांनी लाभ घेतला. अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कामत, फोंडाघाट प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन जंगम यांनी मार्गदर्शन केले. अभियान यशस्वीतेसाठी एनएसएस विभागप्रमुख डॉ. बालाजी सुरवसे व डीएलएलई विभागप्रमुख डॉ. संतोष रायबोले तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक डॉ. सुरवसे यांनी केले. आभार डॉ. संतोष रायबोले यांनी मानले.

---

**लोकमत**

सिंधुदुर्ग, गुरुवार, दि. २५ नोव्हेंबर २०२१

# फोंडाघाट महाविद्यालयाला देणगी

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयाला कुंभळजाई देवी सामाजिक विकास संस्था कामोठे नवी मुंबई आणि सिद्धगिरी गुरुकुल फाउंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने १० जोड बाके, ३५ एकेरी बाके तसेच खुर्च्या देणगी म्हणून देण्यात आले.

या संस्था नेहमी सामाजिकदृष्ट्या मदत करण्यात अग्रेसर असतात. विशेषतः ग्रामीण भागातील शैक्षणिक संस्थांना आवश्यक ती मदत करण्याचा त्यांचा उद्देश असतो. त्यासाठी सुजाता आंबेरकर व विनोद मोरे आणि महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी दीपक सावंत व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले.

फोंडाघाट एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन श्रीकांत आपटे, सचिव मनीष गांधी, खजिनदार समीर मांगले तसेच सर्व संचालक मंडळ, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सतीश कामत इतर प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी संबंधित संस्थांचे आभार मानले व त्यांच्या सामाजिक कार्याला शुभेच्छा दिल्या.

---

**प्रहार** शनिवार २७ नोव्हेंबर, २०२१



फोंडाघाट महाविद्यालयाला देणगी देण्यात आली. (छाया: कुमार नाडकर्णी).

# फोंडाघाट महाविद्यालयाला देणगी

**फोंडाघाट:**

येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाटला कुंभळजाई देवी सामाजिक विकास संस्था कामोठे नवी मुंबई आणि सिद्धगिरी गुरुकुल फाउंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने १० जोड बाके ३५ एकेरी बाके आणि खुर्च्या देणगी म्हणून देण्यात आले.

या संस्था नेहमी सामाजिक मदत करण्यात अग्रेसर असतात. विशेषतः ग्रामीण भागातील शैक्षणिक संस्थांच्या निकडीवर ते लक्ष ठेवून त्यांना मदत करण्याचा त्यांचा उद्देश असतो. या कामी सौ. सुजाता आंबेरकर व श्री. विनोद मोरे आणि महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी श्री. दीपक सावंत व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले.

फोंडाघाट एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन श्री. श्रीकांत आपटे, सेक्रेटरी, मनीष गांधी, खजिनदार समीर मांगले तसेच सर्व संचालक मंडळ, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सतीश कामत इतर प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी. सर्वांनी आभार मानले व त्यांच्या सामाजिक कार्याला शुभेच्छा दिल्या.

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

सिंधुदुर्ग, सोमवार, १७ एप्रिल २०२३ सकाळ



कणकवली : येथील महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

# डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा जागर

## फोंडाघाट महाविद्यालयात जयंतीनिमित्त चर्चासत्र

सकाळ वृत्तसेवा

फोंडाघाट, ता. १६ : येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाट येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू फुलझेले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. त्यानंतर 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार' या चर्चासत्रात प्रा. डॉ. सतीश कामत, प्रा. डॉ. संतोष रायबोले, प्रा. विनोदसिंह पाटील यांनी मांडणी केली.

प्रा. डॉ. सतीश कामत यांनी त्यांच्या जीवनाचा ओघवता आढावा घेतला. त्यांनी शिक्षण, शेती, अर्थकारण, राजकारण, धर्म अशा विविध क्षेत्रांचा अभ्यास कसा केला याची माहिती दिली. प्रा. डॉ. संतोष रायबोले यांनी डॉ. आंबेडकरांच्या जीवनातील काही किस्से विशद केले. त्यांनी स्वाभिमान कसा जपला, हे विविध उदाहरणे देऊन स्पष्ट केले. तर विनोदसिंह पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कशा पद्धतीने शिक्षण घेतले, उच्च शिक्षण घेताना त्यांना कोणी कोणी सहकार्य केले, याबद्दलची माहिती दिली.

चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विष्णू फुलझेले उपस्थित होते. प्राचार्य फुलझेले म्हणाले की, "अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांचे शिक्षण घेतले. तत्कालीन परंपरेनुसार त्यांना वर्गात प्रवेश मिळत नव्हता, तरीही त्यांनी वर्गाच्या बाहेर बसून ज्ञानार्जन केले व भारताचे संविधान लिहून सर्व भारतीयांवर उपकार करून आजपर्यंत भारत देश एकसंघ ठेवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नामांकित अशा अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठ व इंग्लंडमधील लंडन विद्यापीठातील इकॉनॉमिक्स मधून त्यांनी अतिउच्च शिक्षण प्राप्त केले. डॉ. आंबेडकर हे केवळ दलितांचे उद्धारकर्ते नव्हते, तर ते भारतातील सर्वच समाज घटकांचे उद्धारकर्ते होते.

या चर्चासत्रामधून डॉ. आंबेडकरांच्या कार्याचा विविधांगी परिचय विद्यार्थ्यांना करून देण्यात आला. महाविद्यालयातील प्राध्यापिका नम्रता मंचेकर यांनी आभार मानले.

---

लोकमत

सिंधुदुर्ग, शनिवार, दि. १७ एप्रिल २०२३

# विद्यार्थ्यांची मधू दंडवते ग्रंथालयास भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त फोंडाघाट कला व वाणिज्य महाविद्यालयातील इंग्रजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी प्रा. मधू दंडवते ग्रंथालय व वाचनालय या संस्थेस सदिच्छा भेट दिली.

ग्रंथपाल दीक्षा नेरूरकर यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा स्थापनेपासूनचा इतिहास सांगितला. तसेच ग्रंथालयात उपलब्ध असलेली ग्रंथ संपदा, वाचकांसाठीच्या विविध योजनांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. विद्यार्थ्यांनीही ग्रंथांचे विविध प्रकार, ग्रंथ कसे जतन केले जातात, त्यांची वर्गवारी कशी केली जाते, पुस्तकांची देव-घेव कशा पद्धतीने केली जाते, या शंकांचे निरसन करून घेतले. इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. संतोष आखाडे व प्रा. विनोदसिंह पाटील यांनी या भेटीचे आयोजन केले होते.

फोंडाघाट महाविद्यालयाच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्व पालकांनी कौतुक केले.

---

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

ARTS & COMMERCE COLLEGE
Estd. 1995
PHONDAGHAT, TAL. KANKAVLI

लोकमत
सिंधुदुर्ग, शनिवार, दि. २४ सप्टेंबर २०२२

# एनएसएस : व्यक्तिमत्त्व विकासासाठी ठरतय वरदान!

महाविद्यालयीन अभ्यासक्रमाला राष्ट्रसेवेची जोड देऊन राष्ट्रोद्धार कसा साधता येईल, या दृष्टीने १९५० ते १९६९ पर्यंत तत्कालीन विश्वविद्यालय आयोगाचे अध्यक्ष डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, केंद्रीय मंत्री डॉ. सी.डी. देशमुख, प्रो. के.जी. सैयदैन, शिक्षण समितीचे अध्यक्ष डॉ. दौलतसिंग कोठारी, शिक्षणमंत्री डॉ. व्ही.के. आर.व्ही. राव, भारतातील विद्यापीठांचे कुलगुरू, विद्यार्थी प्रतिनिधी यांच्यात विचार विनिमय झाला.

राष्ट्रीय सेवा ही राष्ट्रीय एकात्मतेसाठी एक प्रभावी साधन सिद्ध होऊ शकते, शहरी विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवन अवगत होईल आणि महात्मा गांधी जन्म शताब्दी वर्षाचे औचित्य साधून २४ सप्टेंबर १९६९ रोजी भारतातील सर्व राज्यांतून ३७ विद्यापीठांत पदवीपूर्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी दोन वर्षांकरिता प्रायोगिक तत्त्वावर राष्ट्रीय सेवा योजना सुरू करण्यात आली. निःस्वार्थ सेवाभाव त्यामागे आहे. शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार नियमित कार्यक्रम व विशेष शिबिर कार्यक्रम, असे वर्गीकरण केले आहे. एका महाविद्यालयाने जवळचे खेडे दत्तक

## राष्ट्रीय सेवा योजना दिन

घेऊन त्याचा विकास साधण्यासाठी गावाच्या आवश्यकतेनुसार नियोजित प्रकल्प प्रतीकात्मक स्वरूपात विद्यार्थ्यांनी कार्यान्वित करावेत. त्यातून त्यांचे संघटनकौशल्य विकसित होईल.

राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय एकात्मतेचे सशक्त साधन मानले गेले आहे. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे विविध सामाजिक घटना एका राष्ट्रीय घटकात आणि प्रवाहात सामील करून घेण्याची प्रक्रिया होय. दत्तक गावात कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थी हे राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व पटवून सांगतात व क्रियात्मक रूप देतात. व्यक्तिमत्त्व विकास योजनेचे ध्येय आहे. शिक्षित अज्ञानतेच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा करून उत्तम राष्ट्रभक्त नागरिक घडवण्याची प्रक्रिया म्हणजे रासेयो होय.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना दत्तक गावात विविध प्रकारचे सर्वेक्षण करावे लागते. नवीन नवीन योजनांची माहिती घ्यावी लागते. त्यावेळी लोकांशी संवाद साधावा लागतो. या सवयीमुळे ते संवादकौशल्य अवगत करू शकतात. वाचनाच्या सवयीमुळे भाषेवर प्रभुत्व मिळवता येते. वस्तुतः हा एक व्यक्तिमत्त्वाचा प्रभावी पैलू आहे. उपेक्षित निरक्षरांपासून तर उच्चविद्या विभूषितांमध्ये राष्ट्रीय विचार रुजू शकतात. त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे ओघानेच त्यांच्याकडे नेतृत्व चालून येते, असे अनुभवाने सिद्ध झालेले आहे. अशा प्रकारे राष्ट्रीय सेवा योजना ही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी वरदान ठरली आहे.

-प्रा. डॉ. बाळाजी सुरवसे, फोंडाघाट

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

प्रहार
शनिवार २४ सप्टेंबर, २०२२

# एनएसएस : व्यक्तिमत्त्व विकासासाठी वरदान



महाविद्यालयीन अभ्यासक्रमात राष्ट्रसेवेची जोड देऊन राष्ट्रोद्धार कसा साधता येईल, या दृष्टीने १९५० ते १९६९ पर्यंत तत्कालीन विश्वविद्यालय आयोगाचे अध्यक्ष डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, केंद्रीय मंत्री डॉ. सी. डी. देशमुख, प्रो. के. जी. सैयदेन, शिक्षण समितीचे अध्यक्ष डॉ. दौलतसिंग कोठारी, शिक्षणमंत्री डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव, भारतातील विद्यापीठांचे कुलगुरू, विद्यार्थी प्रतिनिधी यांच्यात विचार विनिमय झाला. राष्ट्रीय सेवा ही राष्ट्रीय एकात्मतेसाठी एक 'सशक्त साधन' सिद्ध होऊ शकते. शहरी विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवन अवगत होईल आणि महात्मा गांधी जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून २४ सप्टेंबर १९६९ रोजी भारतातील सर्व राज्यांतून ३७ विद्यापीठांत पदवीपूर्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी ऐच्छिक स्वरूपात प्रायोगिक तत्त्वावर राष्ट्रीय सेवा योजना सुरू करण्यात आली. निःस्वार्थ सेवाभाव त्यामागे आहे. रासेयोच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार नियमित कार्यक्रम व विशेष शिबिर कार्यक्रम असे वर्गीकरण केले आहे. एका महाविद्यालयाने जवळचे खेडे दत्तक घेऊन त्याचा विकास साधण्याकरिता गावाच्या आवश्यकतेनुसार नियोजित प्रकल्प प्रतीकात्मक स्वरूपात विद्यार्थ्यांनी कार्यान्वित करावेत. त्यातून त्यांचे संघटन कौशल्य विकसित होईल.

## एनएसएसची मुख्य उद्दिष्टे

समाजाच्या गरजा आणि समस्या ओळखण्यासाठी विद्यार्थी किंवा तरुण पिढीला सामील करून समस्या सोडवण्यात सहभागी करून घेणे. तरुणांमध्ये सामाजिक आणि नागरी जबाबदारीची भावना विकसित करणे. वैयक्तिक आणि सामाजिक समस्यांवर व्यावहारिक उपाय शोधण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करणे. टीमवर्क आणि जबाबदाऱ्या वाटून घेण्यासाठी आवश्यक क्षमता विकसित करणे. नेतृत्वगुण आणि लोकशाही दृष्टिकोन प्राप्त करण्यास मदत करणे. आपत्कालीन परिस्थिती आणि नैसर्गिक आपत्तीत सामोरे जाण्याची क्षमता विकसित करणे. राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक सौहार्द जोपासणे.

एनएसएस ब्रीदवाक्य - एनएसएसचे ब्रीदवाक्य "Not Me But You" आहे, जे लोकशाही जगण्याची कल्पना प्रतिबिंबित करते आणि स्वयंसेवकाच्या गरजेला प्रोत्साहन देते. त्याचे तत्त्वज्ञान एखाद्या व्यक्तीचे कल्याण पूर्णपणे समाजाच्या कल्याणावर अवलंबून आहे, या विश्वासावर आधारित आहे म्हणून एनएसएस स्वयंसेवकांनी समाजाच्या भल्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

एनएसएस लोगो हा भारताच्या ओरिसा राज्यातील जगप्रसिद्ध कोणार्क सूर्य मंदिराच्या (८ ब्लॉक पॅटर्न) विशाल रथाच्या चाकावरून प्रेरित आहे. लोगोचा लाल आणि निळा रंग एनएसएस स्वयंसेवकांना राष्ट्र उभारणीच्या सामाजिक उपक्रमांसाठी सक्रिय आणि उत्साही होण्यासाठी प्रेरित करतो. लाल रंग सूचित करतो की, स्वयंसेवक तरुण रक्ताने भरलेला आहे आणि सक्रिय, उत्साही आणि दृढनिश्चयी आहे. नेव्ही ब्लू रंग विश्वाचे संकेत देते, ज्यामध्ये एनएसएस एक लहान भाग आहे आणि अशा प्रकारे समाज आणि मानवजातीच्या भल्यासाठी आपला वाटा देण्यास तयार आहे. लोगोचे चाक निर्मितीचे प्रतिनिधित्व करते.



**प्रा. डॉ. बालाजी सुरवसे**
कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाट, ता. कणकवली जि. सिंधुदुर्ग

राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय एकात्मतेचे सशक्त साधन मानले गेले आहे. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे विविध सामाजिक घटकांना एका राष्ट्रीय घटकात आणि प्रवाहात सामील करून घेण्याची प्रक्रिया होय. दत्तक गावात कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थी हे राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व पटवून सांगतात व क्रियात्मक रूप देतात. व्यक्तिमत्त्व विकास योजनेचे ध्येय आहे. शिक्षित जनसमाजाच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा करून उत्तम राष्ट्रभक्त नागरिक घडवण्याची प्रक्रिया म्हणजे रासेयो होय. लोकांना प्रिय असणारे राष्ट्रभक्ती, सेवाभावीवृत्ती, विज्ञान निष्ठा, प्रामाणिकपणा, उदारता, विश्वासपात्रता, आत्मभाव, खेळाडूवृत्ती इत्यादी गुण संवर्धन केल्या जातात. शिबिर कालावधीमध्ये सहजीवन, सहशिक्षण व सहभोजन या प्रक्रियांच्या माध्यमातून सर्वधर्म समानता या भावनेचा विकास होतो. कॅरन हॉर्नी आणि हॅरी स्टॅक सलिव्हन या मनोविकास चिकित्सकांच्या मतानुसार, 'चांगले सामाजिक संबंध' हा उत्तम विकसित व्यक्तिमत्त्वाचा पाया आहे. जागतिक आरोग्य संघटनेने व्यक्तीच्या स्वास्थ्याची व्याख्या अशी केली की, "Health is a state of complete physical, mental and social well-being and not merely the absence of disease or infirmity." राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागात काम करताना विद्यार्थी चांगले सामाजिक संबंध प्रस्थापित करू शकतात. चांगले सामाजिक संबंध ठेवण्याकरिता सामाजिक कौशल्य अवगत करावे लागते. संवाद कौशल्यामुळे हे शक्य होऊ शकते. दुसऱ्या व्यक्तीच्या मनात आपले म्हणणे प्रस्थापित झाल्याची पावती त्या व्यक्तीकडून प्राप्त झाल्याशिवाय संवाद साधला गेला, असे म्हणता येणार नाही म्हणून संवाद कुशलतेने करण्याची आवश्यकता आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना दत्तक गावात विविध प्रकारचे सर्वेक्षण करावे लागते. नवीन नवीन योजनांची माहिती घ्यावी लागते, त्यावेळी लोकांशी संवाद साधावा लागतो. या सरावामुळे ते संवादकौशल्य अवगत करू शकतात. वाचनाच्या सवयीमुळे भाषेवर प्रभुत्व मिळवता येते. वक्तृत्व हा एक व्यक्तिमत्त्वाचा प्रभावी पैलू आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सभा संचालन, प्रास्ताविक भाषण, मनोगत, आभार प्रदर्शन करावयाचे असते. यामुळे त्यांच्या ठिकाणी सभाधीटपणा येतो. सरावाने सहज टिकू न ठेवल्यास त्यांची वक्तृत्व कला विकसित होते. मैत्री वक्तृत्वाचा लाभ होतो. भाषाप्रभुत्वामुळे मोठमोठ्या सभा जिंकण्यास ते समर्थ ठरतात. उत्तम शिक्षणाबरोबरच [illegible] विभूतिमत्त्वे राष्ट्रीय [illegible] त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्व [illegible] नेतृत्व [illegible]

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal.Kankavli Dist Sindhudurg

लोकमत
शुक्रवार, १७.०६.२०२२

फोंडाघाट महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेना विभागामार्फत आयोजन

# प्लास्टिकमुक्ती अभियानाला चांगला प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेना विभागामार्फत प्लास्टिक मुक्ती अभियान राबवण्यात आले. या अभियानाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या वेळी महाविद्यालयाच्या परिसरातील प्लास्टिक गोळा करण्यात आले. आजच्या काळात प्लास्टिक वापराचा झालेला अतिरेक व त्यामुळे होणारी पर्यावरणाची हानी याविषयी प्रबोधन करण्यात आले. प्लास्टिकचा वापर पूर्णपणे बंद करणे शक्य नसले तरी किमान वापर केला तर प्लास्टिकपासून पर्यावरणावर होणाऱ्या परिणामापासून आपण वाचू शकतो. प्लास्टिक निर्माण करणे सोपे आहे परंतु ते नाहीसे करणे कठीण आहे. त्याचे विघटन होत असताना पर्यावरण विषारी होत असते. त्यामुळे प्लास्टिक वापरावर आळा हाच उपाय असल्याचे प्रबोधन विद्यार्थ्यांकडून करण्यात आले.

या उपक्रमाला छात्र सेनेचे विद्यार्थी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू फुलझेले, असोसिएट एनसीसी ऑफिसर लेफ्टनंट डॉ. राज ताडेराव व सहायक डॉ. संतोष रायबोले उपस्थित होते.



फोंडाघाट महाविद्यालयाच्यावतीने प्लास्टिकमुक्ती अभियान राबविण्यात आले. यावेळी मुलांसह प्राध्यापक उपस्थित होते.

लोकमत
बुधवार, २२.०६.२०२२

# फोंडाघाट महाविद्यालयात योग दिन

## राष्ट्रीय छात्र सेना,आजीवन अध्ययन, विस्तार विभागाचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालय येथे आंतरराष्ट्रीय योग दिन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना व आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात आला.

यावेळी योगाची प्रात्यक्षिके दाखविण्यासाठी योग प्रशिक्षक प्रा. डॉ. संतोष रायबोले उपस्थित होते. सुरुवातीला योगाची शरीर व मन यासाठी असणारी उपयुक्तता समजावून सांगून प्रात्यक्षिके करून दाखवली व करून घेतली. नियमित योगाने शरीर तंदुरुस्त तर होतेच पण मनही तंदुरुस्त राहते. दवाखाना आपल्यापासून दूर होतो आणि जीवन प्रसन्नतेने जगता येते, असे प्रतिपादन प्रा. डॉ. संतोष रायबोले यांनी केले.

यावेळी फोंडाघाट एज्युकेशन सोसायटीचे संचालक, माजी कृषी सभापती माननीय संदेश सावंत-पटेल म्हणाले, योग दिनाच्या निमित्ताने असलेली विद्यार्थ्यांची उपस्थिती चांगली असून योग करताना मला तंदुरुस्त वाटते. विद्यार्थ्यांनी नियमित योग केला पाहिजे.

आपल्याला काय येते याबरोबरच आपण काय करतो हे सुद्धा महत्त्वाचे असते. इच्छाशक्तीने सर्व प्राप्त होते. महाविद्यालयीन जीवन जगत असताना उपक्रमशील राहिले पाहिजे. याच आठवणी भविष्यात स्मरणात राहतात.

त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बालाजी सुरवसे यांनी आपले महाविद्यालय उपक्रमशील आहे. तेथे नेहमी काही ना काही चांगले घडत असते. याचा विद्यार्थ्यांनी फायदा घेतला पाहिजे. विद्यार्थी सजग असला पाहिजे, असे प्रतिपादन केले. एनसीसी असोसिएट ऑफिसर डॉ. राज ताडेराव यांनी प्रास्ताविक केले.




फोंडाघाट महाविद्यालयात योग दिन निमित्त आयोजित कार्यक्रमात संदेश सावंत-पटेल यांनी मनोगत व्यक्त केले.

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal.kankavli, Dist.Sindhudurg

17

लोकमत
सोमवार, २७.०६.२०२२

फोंडाघाट येथे स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी या विषयावर कार्यक्रम

# स्वतःला घडविण्यासाठी वेळ खर्च करा : पंढरीनाथ राणे

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : जीवनातील यशस्वीतेचे गमक म्हणजे महत्त्वाकांक्षा होय. त्याचा ध्यास आणि पूर्णतेची इच्छा या तीन महत्त्वपूर्ण गोष्टी आहेत. कोकणी बुद्धिमत्ता ही कोकणची ताकद आहे. त्याचा पूर्ण क्षमतेने वापर आपण करत नाही. त्यामुळे यश मिळत नाही. त्यामुळे स्वतःला घडविण्यासाठी वेळ खर्च करा, असे आवाहन पंढरीनाथ राणे यांनी केले.

फोंडाघाट एज्युकेशन सोसायटी संचलित कला आणि वाणिज्य महाविद्यालयात 'स्पर्धा परीक्षांची पूर्व तयारी' या विषयावर आयोजित केलेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पंढरीनाथ राणे बोलत होते. ते म्हणाले, स्वयंशिस्त आली की, आळस दूर होतो. मेहनती शिवाय महत्त्वाकांक्षा पूर्ण होत नाही. काही मर्यादा आपणाला मान्य करायला लागतात. जीवनातील तात्पुरता आनंद आणि नकली प्रलोभनाला बळी पडू नका. समाजावर प्रभाव टाकण्यासाठी शाश्वत काम केले पाहिजे. गणिताला घाबरणारा मी आज गणिताची अनेक पुस्तके लिहून मार्गदर्शन करतो. हे शाश्वत कामामुळेच शक्य झाले. सध्या स्पर्धा परीक्षेचे युग आहे. आणि या स्पर्धा परीक्षेत गणित विषय अत्यंत महत्त्वाचा आहे.

त्यामुळे गणिताचा अभ्यास महत्त्वाचा असतो. गणिताचे एक सूत्र आहे. जेवढा सराव तेवढ्या चुका कमी. सामान्य ज्ञानाची तयारी स्वतः करावी लागते. नियमित वर्तमानपत्रे वाचली म्हणजे सामान्य ज्ञानाची तयारी नीट होते. रेडिमेड सामान्यज्ञान धोका देते. एनसीईआरटीच्या सर्व पुस्तकांचे नोट्स काढा. नोट्स स्वतः तयार केले पाहिजेत. जिद्दीने अभ्यास करत असताना आत्मविश्वास बाळगणे आवश्यक आहे. ध्येयाने झपाटलेली माणसेच आयुष्यात यशस्वी होतात, असेही ते म्हणाले.



फोंडाघाट महाविद्यालयात पंढरीनाथ राणे यांनी मार्गदर्शन केले.

## सकारात्मक विचार यशाकडे नेतात

स्पर्धा परीक्षेची तयारी करताना आत्मविश्वास वाढतो. सकारात्मक विचार आपल्याला यशाकडे नेतात. जगात कोणतीही गोष्ट असाध्य नसते. फक्त त्याला अजोड प्रयत्नांची गरज असते. भविष्यात आपणाकडून स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेण्यासाठी सर्व प्रयत्न केले जातील, असे आश्वासन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू फुलझेले यांनी दिले.

संस्थेचे संचालक तथा माजी जिल्हा कृषी सभापती संदेश सावंत-पटेल म्हणाले, स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासाचा पाया रचण्याचे हे दिवस आहेत. याच दिवसात आपल्याला शाश्वत काम केले पाहिजे. तरच आपण जीवनात यशस्वी होऊ शकतो. पंढरीनाथ राणे यांनी केलेले मार्गदर्शन फार मोलाचे आहे. ही जीवनातील सुरुवात असून, भविष्य काळातील आपली गरज ओळखून आम्ही स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन सुरू करणार आहोत. या अल्लड वयात योग्य रस्ता पकडा, यश तुमचेच आहे.

कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष सुभाष सावंत उपस्थित होते. स्पर्धा परीक्षा विभागप्रमुख डॉ. संतोष रायबोले यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. राज ताडेराव यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी वर्ग व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal.Kankavli, Dist.Sindhudurg

लोकमत
शुक्रवार १.७.२०२२

# यशासाठी वास्तवाचे भान ठेवा!

## अनिल नेवाळकर : फोंडाघाट महाविद्यालयात पदवी प्रदान कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : मी कुठे आहे आणि मला काय करायचे आहे याची स्पष्टता असली की यश मिळवणे सोपे आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध उद्योजक अनिल नेवाळकर यांनी केले. ते फोंडाघाट येथे कला आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये आयोजित पदवीदान समारंभात बोलत होते. "विद्यार्थ्यांना भविष्याचा प्रश्न पडतो आणि मार्गदर्शनासाठी ते येतात. त्यावेळी ते कुठे आहेत हेच त्यांना माहीत नसते. त्या विद्यार्थ्यांना मी कुठे आहे? मला काय करायचे आहे? आणि त्याबरोबर आपल्याकडे कोणती साधन संपत्ती आहे? याचे भान असणे गरजेचे आहे.



फोंडाघाट महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात अनिल नेवाळकर यांनी मनोगत व्यक्त केले.

राजकारणापासून दूर ठेवून माझ्या वडिलांनी आम्हाला उद्योजक केले आणि त्याचे समाधान आम्हाला मिळते आहे. तरुणांनी उद्योजक बनण्यासाठी स्वतःला घडवले पाहिजे. आज तंत्रज्ञानामुळे फार वेगाने बदलत आहे. जगातील सर्व नोकऱ्या नष्ट होतील, पण नवीन उद्योग सुरू करण्याची नोकरी कोणीही हिरावून घेऊ शकत नाही.

फोंडाघाट एज्युकेशन सोसायटी जे उपक्रम आयोजित करीत आहे ते कौतुकास्पद आहे. त्यांची तळमळ वाखाणण्याजोगी आहे. विद्यार्थ्यांनी वाचणे आणि लिहिते होणे आवश्यक आहे. जो लिहितो तो जगात कधीच मागे पडत नाही. आपल्यातल्या सर्वात मोठ्या व्यक्तींनी प्रचंड वाचन आणि लेखन केले आहे.

यावेळी जिल्हा परिषद माजी कृषी सभापती संदेश सावंत-पटेल, संस्थेचे सचिव चंद्रशेखर लिंग्रस, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू फुलझेले यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला २०२१-२२ च्या वर्षीच्या पदवीधर विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. त्याचबरोबर वर्ष २०२१-२२ साली घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांच्या विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. डॉ. सतीश कामत यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख डॉ. बालाजी सुरवसे यांनी केली.

डॉ. संतोष रायबोले यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. डी. बी. तायेराव यांनी आभार मानले. कार्यक्रमाला संस्थेचे चेअरमन सुभाष सावंत, कर्मचारी वर्ग आजी-माजी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal.kankavli, Dist. Sindhudurg

लोकमत
रविवार ०३.०७.२०२२

# प्रामाणिक प्रयत्न हाच खरा यशाचा मंत्र : नारायण सावंत

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : जगात नोकऱ्यांची कमतरता नक्कीच नाही. परंतु ती मिळवण्यासाठी असणाऱ्या उत्कृष्टतेची उंची गाठण्यास आपण कमी पडतो. आनंदी राहण्यासाठी श्रीमंती आवश्यक नसते. फक्त शिक्षण असून चालत नाही. शिक्षणाचा आणि पैसा कमावण्याचा कोणताही संबंध नाही. ती एक वैयक्तीक कला आहे. प्रामाणिक प्रयत्न हाच खरा यशाचा मंत्र आहे, असे मत नारायण सावंत यांनी व्यक्त केले.



फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयात नारायण सावंत यांचे स्वागत करण्यात आले.

फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालय येथे स्पर्धा परीक्षा विभाग आयोजित 'व्यक्तिमत्व विकास आणि उत्पन्नाचे विविध पर्याय' या विषयावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून नारायण सावंत बोलत होते.

ते म्हणाले, व्यक्तिमत्व विकासाचा खरा अर्थ सर्वांगीण विकास असा असतो. कमी पैशानेसुद्धा चांगल्या व्यक्तिमत्वाची जोपासना करता येते. अण्णा हजारे, आमटे कुटुंब अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. समाजासाठी आपली गुंतवणूक फार मोलाची असते. आपल्याकडे जे आहे ते समाजाला देण्याचा प्रयत्न करा. दिल्याने आपल्याला मिळतच असते.

आपल्या विकासासाठी स्वतःला तयार ठेवणे आवश्यक असते. हार्डवर्कपेक्षा स्मार्टवर्क महत्त्वाचे आहे.

हार्डवर्कचे आयुष्य कमी असते. स्मार्टवर्क दीर्घकाळ चालते. विद्यार्थ्यांनी नवीन ज्ञानासाठी भुकेलेले असले पाहिजे. त्याचबरोबर सामाजिक बांधिलकीसुद्धा आवश्यक आहे. चौफेर ज्ञान हे पदवीपेक्षा महान असते, असेही ते म्हणाले. संस्थेचे अध्यक्ष सुभाष सावंत म्हणाले, नारायण सावंत यांच्या अनुभवाचा फायदा आपण घेतला पाहिजे. सर्वसामान्य परिस्थितीत उच्च जीवनशैलीत पोहोचलेली व्यक्ती आपली माती विसरली नाही, हे त्यांचे मोठेपण आहे. राजू पटेल म्हणाले, अर्थार्जन ही काळाची गरज आहे. उत्पन्नाच्या अनेक प्रकारच्या पर्यायांचा आपण शोध घेतला तर आपले उत्पन्न खूप वाढू शकते. आपल्या प्रयत्नांना यश नक्की मिळेल. नारायण सावंत यांसारखी आपली व्यक्ती या प्रयत्नांमुळे यशस्वी झाली याचा आदर्श आपण घेतला पाहिजे.


मुख्याध्यापक शंकर सावंत यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख व प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे प्रा. संतोष जोईल यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रा. जगदीश राणे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू कुलकर्णी, प्राध्यापक, कर्मचारी वर्ग व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

ARTS & COMMERCE COLLEGE PHONDAGHAT TAL. KANKAVLI

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal.kankavli.Dist.Sindhudurg

लोकमत
सोमवार ०४.०७.२०२२

# मुलींनी आरोग्याची काळजी स्वतःच घेण्याची गरज : श्रद्धा पाटकर



फोंडाघाट महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात श्रद्धा पाटकर यांनी मनोगत व्यक्त केले.

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : मासिक पाळी संदर्भात आजही समाजात अनेक गैरसमज आहेत. या गैरसमजापोटी मुलींना खूप तणावाखाली वावरावे लागते. त्याचा परिणाम त्यांच्या मानसिक व शारीरिक आरोग्यावर होतो. त्यामुळे मुलींनी आपल्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी स्वतःच सजग राहिले पाहिजे, असे प्रतिपादन रोटरॅक्ट क्लब ऑफ कणकवलीच्या अध्यक्षा श्रद्धा पाटकर यांनी केले.

फोंडाघाट कला आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये सावित्रीबाई फुले महिला विकास कक्ष व रोटरॅक्ट कणकवली यांच्या संयुक्त विद्यमाने 'मासिक पाळी व आरोग्य' या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी डॉ. विद्या मोदी म्हणाल्या, आजच्या जगात मुलींनी मानसिक व शारीरिकदृष्ट्या सक्षम असणे गरजेचे आहे. आपल्यावर काही नैसर्गिक बंधने येतात, परंतु त्याच्या अज्ञानातून आपण बाहेर पडल्यास आपल्याला बळ प्राप्त होते आणि समाजात वावरताना आत्मविश्वास निर्माण होतो. जीवनातील कोणतेही पूर्ण ज्ञान आपली प्रगती करते. मग ते आरोग्याचे सुद्धा असू शकते. आपल्या आरोग्याची काळजी मुलींनी नीट घेतली तर त्या सकारात्मकतेने वागू शकतात. आमच्या काळात आई अशिक्षित होत्या, पण आता परिस्थिती बदलली आहे. तुमची आई शिक्षित आहे. त्याचबरोबर तुम्हीही शिक्षित आहात. त्यामुळे आरोग्याचे ज्ञान आपण स्वतः मिळविले पाहिजे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू फुलझेले म्हणाले, शिक्षित स्त्री ही समाजाची मार्गदर्शिका असते. एक स्त्री शिकली की सगळे कुटुंब शिक्षित होते. मुलींच्या आरोग्याची काळजी आई जेवढी घेते तेवढी कोणीही घेऊ शकत नाही. परंतु आता काळ बदलला असून आपल्या आरोग्याची काळजी स्वतः घेतली पाहिजे.

कार्यक्रमाच्या वेळी रोटरॅक्ट क्लब ऑफ कणकवली यांच्यातर्फे विद्यार्थिनींना सॅनिटरी नॅपकिन्स वितरण करण्यात आले. डॉ. विद्या मोदी यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा. नम्रता मंडेकर यांनी आभार मानले.

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal.Kankavli, Dist.Sindhudurg

लोकमत
रविवार १७.०७.२०२२

# लोकसंख्येचे नियंत्रण हे सर्वांगीण विकासाचे माध्यम : फुलझेले

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : अतिरिक्त लोकसंख्या व अपुरी साधने यांचा समन्वय साधने गरजेचे आहे. लोकसंख्येचे नियंत्रण हे सर्वांगीण विकासाचे माध्यम आहे. संसाधनावरील पडलेला ताण हा कैकपटीने मोठा आहे, त्यामुळे त्याची पूर्तता करणे म्हणजे आर्थिक ताण मोठ्या प्रमाणावर पडतो. दिवसेंदिवस निसर्ग कमी कमी होत चाललेला आहे व त्याचा मानव व इतर प्राणी यांच्यावर प्रभाव पडला आहे, असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू फुलझेले यांनी केले.

फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये अर्थशास्त्र व भूगोल विभागाच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला.

यावेळी प्रास्ताविक करताना डॉ. बालाजी सुरवसे म्हणाले, लोकसंख्येचा विस्फोट ही जागतिक समस्या बनली आहे. वाढती लोकसंख्या आणि नैसर्गिक साधन संपत्ती यांचे होणारे व्यस्त प्रमाण मानव जातीला घातक आहे.

विद्यार्थ्यांच्या वतीने मनोगत व्यक्त करताना खुशी कामतेकर म्हणाली, साधन संपत्ती आणि लोकसंख्या यांचे समान प्रमाण असले पाहिजे. जन्मदर व मृत्युदर यातील फरकही लोकसंख्या विस्फोटाला कारणीभूत ठरले आहेत. लोकसंख्या विस्फोटामुळे अन्न, वस्त्र, निवारा, बेरोजगारी अशा अनेक समस्या उद्भवतात.

डॉ. राजाराम पाटील म्हणाले, लोकसंख्या ही पृथ्वीवरील सर्वात महत्त्वाची साधन संपत्ती आहे. दोन दशलक्ष वर्षांपासून मानव जात अस्तित्वात आहे. सर्व सजीवांचे वास्तव्य म्हणजे लोकसंख्या. लोकसंख्येची गणना प्रथम कैनहामध्ये सुरू झाली. लोकसंख्येच्या बाबतीत झालेली स्थित्यंतरे ही मोठ्या प्रमाणात आहेत. लोकसंख्या अभ्यासासाठी आकडेवारी पुरविणारे सर्वात महत्त्वाचे साधन म्हणजे जनगणना होय. त्यामुळे १८७२मध्ये पहिली जनगणना झाली. लोकसंख्या विस्फोटाचे दुष्परिणाम रोखण्यासाठी लहान कुटुंबाचे महत्त्व समजून सांगणे, मुलींच्या शिक्षणावर भर देणे, महिलांच्या आरोग्याचा विचार करणे, आर्थिक उन्नती करणे तसेच अंधश्रद्धांमधून बाहेर पडणे यासारख्या गोष्टींचे प्रबोधन करणे गरजेचे आहे. डॉ. बालाजी सुरवसे यांनी सूत्रसंचालन, तर प्रा. जगदीश राणे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal.kankavli, Dist.Sindhudurg

सकाळ TODAY

६ ऑगस्ट २०२२

# प्रेमचंदांकडून विशाल साहित्य निर्मिती

## प्रा. महादेव नारिंगकर : कला आणि वाणिज्य महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन

### टिळकांचे चळवळीतील योगदान प्रेरणादायी



फोंडाघाट : येथील महाविद्यालयात झालेल्या वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात बोलताना प्रा. महादेव नारिंगकर, शेजारी प्राचार्य डॉ. विष्णु कुलकर्णे आदी.

ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

१० पुढारी बुधवार, १४ सप्टेंबर २०२२

# शेळीपालनातून आर्थिक सक्षम बना!

## भास्कर काजरेकर : फोंडाघाट महाविद्यालयात शेळीपालन प्रशिक्षण


फोंडाघाट : पुढारी वृत्तसेवा

भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली पुरस्कृत, सिंधुदुर्ग जिल्हा कृषी प्रतिष्ठान संचलित - कृषी विज्ञान केंद्र किर्लोसमार्फत आणि प्रदीप सावंत ऊर्फ आबू पटेल मित्र मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना विभाग, कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाट यांच्या संयुक्त विद्यमाने फोंडाघाट महाविद्यालयात १२ ते १५ सप्टेंबर या कालावधीत होणाऱ्या शेळीपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ फोंडाघाट एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन सुभाष सावंत यांच्या हस्ते करण्यात आला.

कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख भास्कर काजरेकर, फोंडाघाट महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू कुलकर्णी, आबू पटेल, राजेंद्र सावंत, शांताराम रावराणे, राजू रावराणे, पिंटू पटेल, प्रशिक्षक डॉ. केशव देसाई, सौ. माधवी दळवी, श्री. कृपी सावंत आदी उपस्थित होते.

भास्कर काजरेकर म्हणाले, कृषी विज्ञान केंद्रामार्फत समृद्ध व आनंदी गाव संकल्पनेतून ग्रामीण भागातील लोकांना रोजगार व स्वयंरोजगार मिळवून देऊन आर्थिक सक्षम करण्यासाठी विविध उपक्रमांची व प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येते. विविध शेतीपूरक व्यवसाय आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सुरू करण्याकरता आम्ही मदत व मार्गदर्शन करत असतो. प्रशिक्षणानंतरही ज्यांना प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी लागेल तांत्रिक मदतीची गरज असेल अशा प्रशिक्षणार्थींना ते दिले जाईल. या प्रशिक्षणादरम्यान विविध शासकीय योजनांची माहितीही देण्यात येणार आहे.

आबू पटेल म्हणाले, फोंडाघाट परिसरात आजपर्यंत आपण अनेक सामाजिक उपक्रम राबविले असून यापुढेही ते राबविण्याचा आपला मानस आहे. कोणत्याही व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणारे वित्तीय संस्था प्रशिक्षण प्रमाणपत्राची मागणी करतात तेव्हा सर्व प्रशिक्षणार्थींनी हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करून वित्तीय सहाय्य मिळवावे व आपली आर्थिक प्रगती साधावी. प्रास्ताविक डॉ. केशव देसाई यांनी तर आभार राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख प्रा. डॉ. बालाजी सुरवसे यांनी मानले. फोंडा पंचक्रोशीतील शेतकरी व सुशिक्षित बेरोजगार युवक उपस्थित होते.



फोंडाघाट : शेळीपालन प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शन करताना भास्कर काजरेकर. सोबत अन्य मान्यवर.

### 'बकरी' हे उपजीविकेचे महत्त्वाचे साधन

फोंडाघाट महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू कुलकर्णी म्हणाले, ग्रामीण भागात बकरी म्हणून प्रसिद्ध असलेली शेळी उपजीविकेचे महत्त्वाचे साधन आहे. गाई-म्हैशी पालन व्यवसायाच्या तुलनेत शेळीपालन व्यवसायासाठी खर्च कमी येतो. शेळीपालन व्यवसायात खूप मोठी संधी असून याचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन प्रशिक्षणार्थींनी आपला व ग्रामीण भागाचा आर्थिक विकास साधावा.

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal.kankavli.Dist.Sindhudurg

ARTS & COMMERCE COLLEGE PHONDAGHAT TAL. KANKAVLI ESTD. 1995

पुढारी
सिंधुदुर्ग, बुधवार, १४ सप्टेंबर २०२२

# फोंडाघाट महाविद्यालयाचा वर्धापन दिन उत्साहात

फोंडाघाट : पुढारी वृत्तसेवा

कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाटचा २७ वा वर्धापन दिन उत्साहात झाला. १२ सप्टेंबर १९९५ साली सुरू झालेल्या या महाविद्यालयाने गेल्या २७ वर्षांत अनेक यशाची शिखरे पार केली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे माजी चेअरमन प्रदीप तथा आबू पटेल उपस्थित होते.



फोंडाघाट : वर्धापन दिन कार्यक्रमात बोलताना आबू पटेल. सोबत इतर मान्यवर.

विद्यार्थ्यांच्या मनोगतात खुशी कामतेकर व आयुष सावंत यांनी मनोगते मांडली. त्याचबरोबर महाविद्यालयाचे कार्यालयीन प्रमुख दीपक सावंत यांनीही मनोगत व्यक्त केले व शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविकामध्ये डॉ. सतीश कामत म्हणाले, प्रतिकूल परिस्थितीत सुरू केलेल्या या शैक्षणिक संकुलामुळे उच्च शिक्षणाची सोय झाली व त्याचा अधिक फोंडाघाटसारख्या ग्रामीण भागाचा विकास झाला. शिक्षणाच्या चौकटीच्या बाहेर फेकल्या गेलेला वर्ग उच्चशिक्षित झाला. यामुळेच महाविद्यालयाने अनेक मान्यता प्राप्त पुरस्कार प्राप्त केले आहेत. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. फुलझेले म्हणाले, ग्रामीण डोंगराळ भागातील गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय केली यासारखे पुण्य कार्य कोणतेही नाही. अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले, त्यातून शिक्षण संस्था फुलवून शिक्षणाची बाग निर्माण केली हे कार्य अतुलनीय आहे.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना प्रदीप तथा आबू पटेल म्हणाले, कोणत्याही संस्थेची विद्याशाखेत वाढ ही त्या संस्थेची प्रगती दाखवते. १९५२ साली स्थापन झालेल्या फोंडाघाट एज्युकेशन सोसायटीचे महाविद्यालय हे याचे अपत्य आहे. सुरुवातीच्या विनाअनुदान काळाचा मी साक्षीदार आहे. संस्थेबरोबरच कर्मचाऱ्यांच्याही कसोटीचा तो काळ होता. त्यातून पार होत महाविद्यालयाने अनेक उत्तुंग शिखरे पार पाडली. ग्रामीण भागातील विद्यार्थी उच्चविभूषित होताना पाहिले की मनाला फार समाधान वाटते. संस्थेचे चेअरमन सुभाष सावंत यांनीही विचार मांडले. सूत्रसंचालन डॉ. संतोष रायबोले यांनी केले. आभार प्रा. जगदीश राणे यांनी मानले.

ARTS & COMMERCE COLLEGE SINDHUDURG ESTD. 1995 PHONDAGHAT TAL. KANKAVLI

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal.Kankavli, Dist.Sindhudurg

लोकमत
बुधवार १४.०९.२०२२

प्रदीप पटेल यांचे आवाहन; फोंडाघाट महाविद्यालयाचा वर्धापन दिन

# विद्यार्थ्यांनी ज्ञानदान करणाऱ्या संस्थेला कधीही विसरू नये

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : सध्याच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांवर लक्ष केंद्रित करावे. तसेच आपला उत्कर्ष साधावा. त्याचबरोबर महत्त्वाचे म्हणजे आपल्याला ज्ञानदान करणाऱ्या संस्थेला कधीही विद्यार्थ्यांनी विसरू नये, असे आवाहन फोंडाघाट एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष प्रदीप उर्फ आबू पटेल यांनी केले.

फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयाचा २७ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला, यावेळी ते बोलत होते.



फोंडाघाट महाविद्यालयाच्या वर्धापन दिन कार्यक्रमात संस्थेचे माजी अध्यक्ष आबू पटेल यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी सुभाष सावंत, डॉ. विष्णू फुलझेले आदी उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, कोणत्याही संस्थेची विद्याशाखेत वाढ ही त्या संस्थेची प्रगती दाखवते. १९५२ साली स्थापन झालेल्या फोंडाघाट एज्युकेशन सोसायटीचे महाविद्यालय हे याचे अपत्य आहे. सुरुवातीच्या विनाअनुदान काळाचा मी साक्षीदार आहे. संस्थेबरोबरच कर्मचाऱ्यांच्याही कसोटीचा तो काळ होता. त्यातून पार होत महाविद्यालयाने अनेक उत्तुंग शिखरे गाठली. ग्रामीण भागातील विद्यार्थी उच्च विभूषित होताना पाहिले की मनाला फार समाधान वाटते. राजकारण करत असताना शिक्षण क्षेत्रात मात्र प्रामाणिकपणे समाजकारण केले आणि त्याच प्रामाणिकपणाचे फळ याची देही याची डोळा पाहण्याचे भाग्य मला लाभले.

डॉ. सतीश कामत म्हणाले, प्रतिकूल परिस्थितीत सुरू केलेल्या या शैक्षणिक संकुलामुळे उच्च शिक्षणाची सोय झाली व फोंडाघाटसारख्या ग्रामीण भागाचा विकास झाला.

## महाविद्यालयाच्या प्रगतीकडे लक्ष दिले पाहिजे

आताचा महाविद्यालयाचा ऐश्वर्याचा काळ आहे. परंतु त्याचा पाया रचणाऱ्यांचे आभार मानतो. कारण त्यांनी या वटवृक्षाचे पालनपोषण केले आहे. त्यामुळे मी आज येथे उभा आहे. विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी एकोप्याने महाविद्यालयाच्या प्रगतीकडे लक्ष दिले पाहिजे. शिक्षणाच्या मिळणाऱ्या सोयींचा उपयोग करून घ्या आणि जीवन यशस्वी करा असे संस्थेचे अध्यक्ष सुभाष सावंत म्हणाले.

**लोकमत**
शुक्रवार ०१.०४.२०२२

नामदेव सावंत : फोंडाघाट महाविद्यालयात निवासी शिबिरात कौशल्य विकास कार्यशाळा

# महापुरुषांची आत्मचरित्रे विद्यार्थ्यांनी वाचावीत

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : आपल्या देशात अनेक महापुरुष होऊन गेले आहेत. जिद्द, चिकाटी, मेहनत अशा विविध गुणांमुळे त्यांनी आपल्या जीवनात यश मिळविले. अशा महापुरुषांची आत्मचरित्रे विद्यार्थ्यांनी वाचायला हवी. त्यातून आपल्याला निश्चितच जीवन जगण्याची वेगळी दिशा मिळेल आणि आपला उत्कर्ष साधता येईल, असे प्रतिपादन नामदेव सावंत यांनी केले.

फोंडाघाट महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या निवासी शिबिरात कौशल्य विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

सावंत यांनी सिंधुदुर्ग जिल्हा कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या विविध योजनांची माहिती दिली. ऑनलाइन रोजगार नोंदणी कशी करावी? विविध ऑनलाइन सुविधांचा लाभ कसा घ्यावा? याविषयीही सविस्तर माहिती दिली.

यावेळी फोंडाघाट एज्युकेशन सोसायटीचे संचालक संदेश सावंत-पटेल, फोंडाघाट महाविद्यालय विकास समितीचे सदस्य केदार रेवडेकर, फोंडाघाट महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कामत, राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. डॉ. बाळाजी सुरवसे, प्रा. संतोष आखाडे, प्रा. राधिका सावंत, इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी व गांगोवाडी येथील ग्रामस्थ उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. डॉ. बाळाजी सुरवसे यांनी प्रास्ताविक केले तर ग्रंथपाल प्रा. डॉ. विद्या मोदी यांनी आभार मानले.

**महिलांनी स्वावलंबी बनण्यासाठी लाभ घ्यावा**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ सिंधुदुर्गच्या स्नेहल पुजारे यांनी महामंडळाच्या योजनांकरिता सामायिक अटी व शर्ती, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, गट प्रकल्प कर्ज योजना याविषयी माहिती दिली. महिलांनी स्वावलंबी बनले पाहिजे यासाठी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्नेहल पुजारे यांनी केले.

**लोकमत**
शनिवार ०२.०४.२०२२

# शिबिरातून निर्माण झालेला आत्मविश्वास महत्त्वपूर्ण

## संदेश सावंत-पटेल; फोंडाघाट महाविद्यालयाच्या एन.एस.एस. शिबिराची सांगता

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : कुठल्याही शिबिराचा समारोप हा वेदनादायीच असतो. मात्र, या शिबिरातून मुलांना मिळालेला आत्मविश्वास महत्त्वपूर्ण आहे. हा सकारात्मक बदल प्रत्येक विद्यार्थ्यात दिसून येत आहे. या आत्मविश्वासाचा लाभ विद्यार्थ्यांना भविष्यात निश्चितच होईल, असे मत जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती संदेश सावंत-पटेल यांनी व्यक्त केले.



फोंडाघाट महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या शिबिराच्या समारोपप्रसंगी विद्यार्थ्यांसह प्राध्यापक वर्ग उपस्थित होता.

फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या निवासी शिबिराची सांगता झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी केदार रेवडेकर तसेच उद्योजक रमेश नारकर उपस्थित होते.

रमेश नारकर म्हणाले, समाजाच्या विकासाची प्रक्रिया ही माणसे एकत्र येऊन होते. राष्ट्रीय सेवा योजना हे एकत्र येऊन समाजाभिमुख काम करण्याचे उत्तम माध्यम आहे. समाजाला पुढे नेण्याचे काम युवक करीत असतो. त्याच्या शक्तीचा उपयोग सकारात्मक झाला तर समाज निश्चितच विकसित होतो.

ग्रामविकास अधिकारी चौलकर म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या मुलांच्या कामाचे मूल्यमापन मी स्वतः केले. ते कौतुकास पात्र आहेत. शिबिरातील शिक्षण हे संस्कारक्षम असते. त्यातून स्वावलंबन शिकायला मिळते आणि संस्कारित युवक तयार होतो.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कामत म्हणाले, सात दिवसांत आमच्या विद्यार्थ्यांची घेतलेली काळजी ही वाखाणण्यासारखी आहे. शिबिरातून झालेला आंतरिक बदल हा महत्त्वाचा असतो. कोविडच्या काळामुळे आलेली मरगळ या कॅम्पच्या माध्यमातून दूर होईल. जिव्हाळा, प्रेम दीर्घकाळ लक्षात राहील. शिबिराच्या आठवणी या हृदयाच्या कुपीत जपून ठेवता येतात. विद्यार्थ्यांनी आपल्या कामाने येथील माणसांच्या मनात घर निर्माण केले आहे.

शिबिरामध्ये मंदिर स्वच्छता, रस्ता स्वच्छता, रस्ता दुरुस्ती, प्रबोधन, आरोग्य शिबिर, विविध शासकीय योजनांची माहिती, जलसाक्षरता प्रबोधन असे अनेक कार्यक्रम पार पडले. विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. शिबिरातील विद्यार्थ्यांच्या रायगड गटाला आदर्श गट, सतीश वळवे याला आदर्श स्वयंसेवक, दीपाली जाधव हिला 'आदर्श स्वयंसेविका' म्हणून गौरविण्यात आले. शिबिर पार पाडण्यासाठी लिंगम, उमेश चव्हाण, संदेश लाड, सुहासी लाड, प्रा. संतोष जोईल, प्रमोद लाड, बाळा खंबाळेकर यांचे बहुमोल सहकार्य लाभले. वैभव पवार यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम अधिकारी डॉ. बाळाजी सुरवसे यांनी प्रास्ताविक तर प्रा. संतोष आखाडे यांनी आभार मानले.


PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEG
Phondaghat, Tal.kankavli.Dist.Sindhudurg

लोकमत
बुधवार ०७.१२.२०२२

# फोंडाघाट महाविद्यालयात एड्स सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : एड्स रोगावर आपल्याला मात करायची असेल तर त्याची पूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आपल्या शरीरातील होणारे बदलही ज्ञात असले पाहिजेत, असे मत डॉ. फोंडाघाट प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. अन्नपूर्णा वालावलकर यांनी व्यक्त केले.



फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालय येथे एड्स दिन साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. अन्नपूर्णा वालावलकर यांनी मार्गदर्शन केले.

फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालय येथे एनएसएस व एनसीसी विभागाच्यावतीने एड्स दिन साजरा करण्यात आला. १ ते ७ डिसेंबर असा जगात एड्स सप्ताह साजरा करण्यात येतो. त्याचाच एक भाग म्हणून हा दिन साजरा करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना फोंडाघाट प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. अन्नपूर्णा वालावलकर बोलत होत्या.

त्या म्हणाल्या,आपल्या संस्कृतीत या विषयावर बोलणे निषिद्ध मानले जाते,त्यामुळेच असा रोगात आपण अज्ञानापोटी अडकून पडतो. आताच्या सोशल मीडियाच्या युगात आपण या ज्ञानापासून दूर राहणे योग्य नाही. अशा बाबतीत सुरुवातीच्या टप्प्यात आपल्याला रोगाचे ज्ञान झाल्यास या रोगातून आपल्याला मुक्त होणे सोपे जाते. बदलत्या समाज जीवनामुळे लैंगिक क्रिया या खूप लवकर होऊ लागल्या आहेत. त्यामुळे योग्य मार्गदर्शन किंवा ज्ञान मिळाले नाही तर या रोगाचे बळी पडू शकतो.

डॉ. अमोल केंद्रे म्हणाले,कोणत्याही गोष्टी लपवून ठेवू नका. त्यामुळे आपल्या अडचणीत मोठ्या प्रमाणात वाढ होते. ज्या वयोगटात शरीरात खूप बदल होतात तेच हे वय आहे. या वयात आपल्याला जीवनाला नीट आकार देता आला पाहिजे. प्रत्येक गोष्टीची काळजी घेतली पाहिजे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू फुलझेले म्हणाले, आमच्या काळात एड्स हा प्रकार नवीन होता. त्यामुळे त्याची भीती खूप मोठ्या प्रमाणात होती. परंतु अभ्यासानंतर त्याची काळजी कशी घ्यावी हे आम्हाला कळले आणि भीती कमी झाली. नैतिक मूल्यांचे पालन केले तर या रोगापासून आपल्याला भीती बाळगण्याची आवश्यकता पडणार नाही. डॉ. राज ताडेराव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. बालाजी सुरवसे यांनी सूत्रसंचालन तर प्रा. विनोद पाटील यांनी आभार मानले.

ARTS & COMMERCE COLLEGE ... ESTD. 1995 PHONDAGHAT

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat,Tal.kankavli,Dist.Sindhudurg

ARTS & COMMERCE COLLEGE
ESTD. 1995
PHONDAGHAT, TAL. KANKAVLI

लोकमत
मंगळवार २७.१२.२०२२

फोंडाघाट महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

# ध्येय निश्चित असले तरच इतिहास घडतो : सुधीर सावंत

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : युवकांनी प्रथम आपले ध्येय निश्चित केले पाहिजे. ध्येय निश्चित असले तरच इतिहास घडतो. छत्रपती शिवाजी महाराज आणि ताराराणी यांचे ध्येय निश्चित होते, त्यामुळे त्यांच्या कार्याची इतिहासाने नोंद घेतली, असे मत माजी खासदार निवृत्त ब्रिगेडियर सुधीर सावंत यांनी व्यक्त केले.



फोंडाघाट महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनप्रसंगी माजी खासदार सुधीर सावंत यांनी मनोगत व्यक्त केले.

फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ समारंभाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सुधीर सावंत उपस्थित होते. ते म्हणाले, शिवरायांच्या स्वराज्य स्थापनेचा इतिहास तर अवघ्या आदर्श म्हणून स्वीकारला आहे. आज जगातील अनेक देश छत्रपती शिवाजी महाराजांचे अभ्यासक आहेत. हीच भारताची खरी ताकद आहे.

बाळासाहेब हीर्वे म्हणाले, कष्टाची चीज काय असते हे संस्थेचा विकास पाहिला की समजते. आमच्या काळात कार कष्टाने ही संस्था उभी केली. त्यानंतर कालमानाने व वर्तमानाप्रमाणे ही संस्था तरुणांच्या हातात दिली आणि त्यांनी आम्ही लावलेल्या या ज्ञानरूपी रोपाचे वटवृक्षात रूपांतर केले. डॉ. अजित सावंत-पटेल म्हणाले, आम्ही माजी विद्यार्थी मदतीचा ओघ देत असतो. या मदतीचा योग्य वापर ही संस्था करते, यातच आमचे समाधान आहे. डॉ. सतीश कामत यांनी प्रास्ताविक केले. संस्थेचे अध्यक्ष सुभाष सावंत, सचिव चंद्रशेखर लिंग्रस, खजिनदार आनंद मर्ये, संचालक महेश सावंत-पटेल, संदेश सावंत-पटेल, न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक शंकर सावंत, मुख्याध्यापिका विभा लिंग्रस, डकवी राजन नानचे, बाबा पटेल व इतर मान्यवर उपस्थित होते.

### इतिहास घडविला आहे

- या कार्यक्रमाचे उद्घाटन सिने अभिनेते अभय खडपकर यांच्या हस्ते झाले. ते म्हणाले, माणूस हा कलाकार असला पाहिजे तरच तो जीवनाचा आनंद घेऊ शकतो.
- या देशात अनेक कलाकार मंडळी आहेत, त्यांनी आपल्या कलेने या देशाचा इतिहास घडविला आहे. प्रा. जगदीश राणे यांनी आभार मानले.

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

ARTS & COMMERCE COLLEGE
Estd. 1995
PHONDAGHAT TAL. KANKAVLI

फोंडाघाट येथे स्वच्छताविषयक फेरी : फोंडाघाट महाविद्यालय, ग्रामस्थांतर्फे केली जनजागृती

# 'प्लास्टिकमुक्त गाव'चा दिला संदेश

लोकमत न्यूज नेटवर्क

फोंडाघाट : कला आणि वाणिज्य महाविद्यालय, फोंडाघाटच्या एन. एस. एस. विभागाने फोंडाघाट-ब्राह्मणगी येथे 'घनकचरा व्यवस्थापन जनजागृती मेळावा' आयोजित करून स्वच्छता व प्लास्टिकमुक्त पर्यावरणाचे महत्त्व पटवून दिले.

अभियानाची सुरुवात स्वच्छताविषयक जनजागरण फेरी काढून करण्यात आली. यामध्ये ब्राह्मणगिरी या गावातील विविध स्वयंसहाय्यता समूहातील महिला, ग्रामस्थ, फोंडाघाट महाविद्यालयातील एन. एस. एस. स्वयंसेवकांनी सहभाग घेतला होता. स्वच्छ सुंदर व पर्यावरणयुक्त देशाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी घोषणाही यावेळी देण्यात आल्या.

यावेळी ग्रामविकास अधिकारी चंद्रकांत चौलकर, पाणी स्वच्छता मिशन जिल्हा परिषद सिंधुदुर्गचे अधिकारी तज्ज्ञ अमेय पाटेकर, एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बालाजी सुरवसे, ग्रामस्थ सहदेव सावंत, ज्ञानेश चिंदरकर, प्रवीण हिंदळेकर, आदी उपस्थित होते.

डॉ. बालाजी सुरवसे म्हणाले की, देशातील सर्व नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे. [illegible] स्वच्छ भारत [illegible] राबविले [illegible] अभियानासाठी लोकसहभाग महत्त्वाचा असून, ब्राह्मणगिरी गावातील ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन हे अभियान यशस्वी करण्याचे आवाहन यावेळी डॉ. सुरवसे यांनी केले. ब्राह्मणगिरीतील सर्व ग्रामस्थ उत्स्फूर्तपणे सहभाग घेतील, असा आशावाद व्यक्त करून डॉ. सुरवसे यांनी या अभियानासंदर्भात शासनाची, मुंबई विद्यापीठाची व फोंडाघाट महाविद्यालयाच्या एन. एस. एस. विभागाची भूमिका स्पष्ट केली.

फोंडाघाट ग्रामविकास अधिकारी चंद्रकांत चौलकर यांनी स्वच्छतेच्या बाबतीत सिंधुदुर्ग देशात आघाडीवर असल्याचे सांगितले. ही आघाडी कायम टिकविण्यासाठी ग्रामीण भागातील युवक मंडळे, स्वयंसेवी संस्था, स्वयंसहाय्यता गटातील सदस्य, एन. एस. एस. स्वयंसेवक, ग्रामस्थ, आदींनी सक्रिय सहभाग घेतल्यास 'स्वच्छ भारत' निर्माण होण्यास वेळ लागणार नसल्याचे त्यांनी सांगितले. 'प्लास्टिकमुक्त गाव आणि शौचालययुक्त गाव' हे ध्येय समोर ठेवून कार्य केल्यास हे अभियान नक्की यशस्वी होईल, असे चौलकर यांनी सांगितले.

यावेळी फोंडाघाट महाविद्यालयाच्या एन. एस. एस. स्वयंसेवकांनी पथनाट्य सादर करून कचरा व मानवी आरोग्याच्या प्रश्नावर प्रकाश टाकला. तसेच या स्वयंसेवकांनी घरातील टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू कशा बनविता येतील याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी पाण्याच्या रिकाम्या बाटल्यांपासून बनविलेले झाडू, कागदी पुठ्ठ्यापासून बनविलेल्या फोटोफ्रेम, मिठाईबॉक्स, गोधडया, पायपुसणी, आदींचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

गणेश पोवार याने सूत्रसंचालन केले, तर ज्ञानेश चिंदरकर यांनी आभार मानले.



फोंडाघाट येथे 'घनकचरा व्यवस्थापन जनजागृती मेळावा' अभियानाची सुरुवात स्वच्छताविषयक जनजागरण फेरी काढून करण्यात आली.

## आरोग्यसंपन्न भारत घडविण्याचा निर्धार

स्वच्छतादूत म्हणून निवड झालेल्या फोंडाघाट महाविद्यालयातील एन. एस. एस. स्वयंसेवक गणेश पोवार (पटेकर) ऋतिका खरात, संजना प्रभाकर, ओंकार राणे, दत्ताराम लाड, अक्षता चव्हाण, राजेश हुंबे, दिव्यांश चव्हाण, सुदीप कदम, प्रतीक्षा तेली यांना यावेळी मान्यवरांनी सुपेयर दिल्या. स्वच्छतादूत म्हणून निवड झालेल्या सर्व स्वयंसेवकांनी यावेळी स्वच्छ आणि आरोग्य संपन्न भारत घडविण्याचा निर्धार व्यक्त केला.

### बायोगॅसचे महत्त्व अनन्यसाधारण

कार्यक्रमाला उपस्थित असलेले पाणी व स्वच्छता मिशन, सिंधुदुर्गचे अधिकारी अमेय पाटेकर यांनी घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले. घरातील कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याचे ज्ञान महिलांना आवश्यक असून, कचऱ्याचे वर्गीकरण कसे करावे याबाबत त्यांनी सखोल माहिती दिली. ओल्या व सुक्या कचऱ्याचे व्यवस्थित वर्गीकरण करून त्यापासून कंपोस्ट खताची निर्मिती कशी करावी, याची त्यांनी ग्रामस्थांना माहिती दिली. घरच्या घरी गांडूळ खताची निर्मिती करून स्वयंरोजगाराला चालना देता येऊ शकते. शिवाय बायोगॅसदेखील महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे मत अमेय पाटेकर यांनी मांडले.

सिंधुदुर्ग, शनिवार, दि. २७ जुलै २०१९
लोकमत

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

लोकमत गुरुवार, दि. १४ मार्च २०१९

# फोंडाघाटच्या 'विवेकसिंधु' वार्षिकांकास राजा राजवाडे पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

फोंडाघाट : सर्वोत्कृष्ट वार्षिकांकासाठी दिला जाणारा लेखक राजा राजवाडे पुरस्कार फोंडाघाट महाविद्यालयाच्या 'विवेकसिंधु' या वार्षिकांकास प्राप्त झाला आहे. देवरुख (जि. रत्नागिरी) येथे झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत शेवडे, मराठी विभागप्रमुख डॉ. सतीश कामत आणि कार्यालयीन प्रमुख दीपक सावंत यांनी हा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते स्वीकारला.

देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाचे आठल्ये, सप्रे, पित्रे महाविद्यालय दरवर्षी दर्जेदार वार्षिकांकांना पुरस्कार देत असते. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, नवी मुंबई, मुंबई येथील महाविद्यालयांकडून ते वार्षिकांक मागवून घेतात. त्या अंकांची तज्ज्ञांकडून तपासणी केली जाते. अंकात समाविष्ट कविता, कथा, लेख आदींचे परीक्षण केले जाते आणि या सर्व पातळ्यांवर उत्कृष्ट ठरलेल्या अंकांना सन्मानित केले जाते. फोंडाघाट महाविद्यालयाने प्रथमच या पुरस्कार योजनेत सहभाग घेऊन 'लेखक राजा राजवाडे' पुरस्कार मिळविला आहे.



फोंडाघाट महाविद्यालयाच्या 'विवेकसिंधु' वार्षिकांकास लेखक राजा राजवाडे पुरस्कार प्राप्त झाला. प्राचार्य डॉ. वसंत शेवडे, कार्यालयीन प्रमुख दीपक सावंत, मराठी विभागप्रमुख डॉ. सतीश कामत यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

## यापुढेही दर्जेदार अंकांची निर्मिती करणार

पुरस्कार मिळाल्यानंतर आपल्या भावना व्यक्त करताना डॉ. वसंत शेवडे म्हणाले की, सर्वांच्या संपादनकृती, कसदार लेखन आणि कलात्मक मांडणी यामुळे महाविद्यालयाच्या 'विवेकसिंधु' या अंकाला हे यश प्राप्त झाले असून महाविद्यालय यापुढेही दर्जेदार अंकांची निर्मिती करणार आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

फोंडाघाट महाविद्यालयाच्या 'विवेकसिंधु' या वार्षिकांकास मिळालेल्या यशाबद्दल फोंडाघाट एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन श्रीकांत आपटे, सेक्रेटरी मनीष गांधी, खजिनदार समीर मांगले, सर्व संचालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी प्राचार्यांचे अभिनंदन करून महाविद्यालयाच्या भावी वाटचालीस सदिच्छा व्यक्त केल्या.

ARTS & COMMERCE COLLEGE FONDAGHAT TAL. KANKAVLI Estd. 1985

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Fondaghat, Tal.kankavli, Dist.Sindhudurg

तरुण भारत शनिवार, १६ मार्च २०१९

# फोंडाघाट कॉलेजच्या 'विवेकसिंधु'ला पुरस्कार

## देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाने लेखक राजा राजवाडे पुरस्काराने केला सन्मान

वार्ताहर
फोंडाघाट

सर्वोत्कृष्ट वार्षिक अंकासाठी दिला जाणारा लेखक राजा राजवाडे पुरस्कार फोंडाघाट महाविद्यालयाच्या विवेकसिंधु या वार्षिकांकास प्राप्त झाला आहे. देवरुख येथे झालेल्या पुरस्कार सोहळ्यात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर वसंत शेवडे, मराठी विभागप्रमुख डॉक्टर सतीश कामत आणि कार्यालयीन प्रमुख दीपक सावंत यांनी हा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते स्वीकारला.

देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाचे आठल्ये सप्रे पित्रे महाविद्यालय, देवरुख प्रतिवर्षी दर्जेदार वार्षिकांकांना पुरस्कार देत असते. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, नवी मुंबई येथील महाविद्यालयांकडून ते वार्षिकांक मागवून घेतात. त्या अंकांची तज्ज्ञांकडून तपासणी केली जाते. अंकात समाविष्ट कविता, कथा, लेख आदींचे परीक्षण केले जाते. या सर्व पातळ्यांवर उत्कृष्ट ठरलेल्या अंकांना सन्मानित केले जाते.



देवरुख : फोंडाघाट कॉलेजच्या विवेकसिंधु या विशेषांकास मिळालेला पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते स्वीकारताना प्रा. डॉ. वसंत शेवडे, सतीश कामत, दीपक सावंत.

फोंडाघाट महाविद्यालयाने प्रथमच या पुरस्कार योजनेत सहभाग घेऊन लेखक राजा राजवाडे पुरस्कार मिळविला आहे. पुरस्काराबाबत प्रा. डॉ. शेवडे म्हणाले, सर्वांची संपादन वृत्ती, कसदार लेखन आणि कलात्मक मांडणी यामुळे महाविद्यालयाच्या विवेकसिंधु या अंकाला हे यश प्राप्त झाले आहे. महाविद्यालय यापुढेही दर्जेदार अंकांची निर्मिती करेल.

या यशाबद्दल फोंडाघाट शिक्षण संस्थेचे चेअरमन श्रीकांत आपटे, सचिव मनीष गांधी, खजिनदार समीर मांगले, सर्व संचालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी प्राचार्यांचे अभिनंदन केले आहे.

रविवार
दि. १८ ऑगस्ट २०१९ | लोकमत

# फोंडाघाट महाविद्यालयात 'स्वच्छ भारत पंधरवडा'

लोकमत न्यूज नेटवर्क

फोंडाघाट : भारत सरकारच्या युवक कल्याण व क्रीडा मंत्रालयाच्या निर्देशानुसार 'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत संपूर्ण भारतभर राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत स्वच्छ भारत पंधरवड्याचे आयोजन केले आहे.

स्वच्छ भारत पंधरवड्यामध्ये फोंडाघाट महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागानेही सहभाग घेतला असून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. अभियानाच्या सुरुवातीला महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी स्वच्छतेची शपथ घेतली. या स्वच्छता पंधरवड्यात विद्यार्थी महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करणार आहेत. तसेच दत्तक गावाला भेट देऊन तेथील घरोघरी जाऊन स्वच्छताविषयक माहिती देणार आहेत व तेथे स्वच्छता मोहीमही राबवण्यात येणार आहे. तसेच फोंडाघाट परिसरातील मंदिरे, बसस्थानक, बाजारपेठ, प्राथमिक आरोग्य केंद्र अशा महत्त्वाच्या सार्वजनिक ठिकाणांची साफसफाई करण्यात येणार आहे. स्वच्छताविषयक कार्यक्रमांतर्गत जनजागरण फेरी काढून पथनाट्य सादर करून प्रबोधनाचे कार्यही केले जाणार आहे.

अभियानाच्या निमित्ताने फोंडाघाट महाविद्यालय हे स्वच्छ महाविद्यालय बनविण्याचा संकल्प विभागप्रमुख डॉ. बी. ए. सुरवसे यांनी जाहीर केला. त्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक प्रयत्न करत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या अभियानाच्या यशस्वीतेसाठी फोंडाघाट महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत शेकडे यांनी मार्गदर्शन केले असून एनएसएस विभागप्रमुख डॉ. बी. ए. सुरवसे तसेच प्रा. एस. एस. आव्हाडे, प्रा. रूपाली भाने हे विशेष परिश्रम घेत आहेत.

लोकमत | कोकण, बुधवार,
दि. २१ ऑगस्ट २०१९




फोंडाघाट न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पूरग्रस्तांसाठी जमा केलेली मदत प्रा. डॉ. बालाजी सुरवसे यांच्याकडे सुपुर्द केली.

# पूरग्रस्तांसाठी मदत जमा

लोकमत न्यूज नेटवर्क

फोंडाघाट : फोंडाघाट महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख प्रा. डॉ. बालाजी सुरवसे यांच्याकडे येथील न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पूरग्रस्तांसाठी जमा केलेली मदत सुपुर्द केली.

पूरग्रस्तांसाठी सामाजिक भावनेतून विद्यार्थ्यांनी मदत गोळा करून एक आदर्श समाजासमोर ठेवला. जमा केलेल्या साहित्यामध्ये धान्य, कपडे, तेल, बिस्किटे, पाणी बाटल्या व जीवनावश्यक वस्तू अशा प्रकारच्या साहित्याचा समावेश आहे. यावेळी प्रशालेचे पर्यवेक्षक सावंत व अन्य शिक्षक उपस्थित होते.

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat,Tal.kankavli,Dist.Sindhudurg

ARTS & COMMERCE COLLEGE
SINDHUDURG
ESTD. 1995
PHONDAGHAT

पुढारी सिंधुदुर्ग, बुधवार, २८ ऑगस्ट २०१९



फोंडाघाट महाविद्यालय एनएसएस विभागामार्फत पूरग्रस्तांसाठी साहित्य पाठविण्यात आले.

## फोंडाघाट महाविद्यालयाची आवळी बु.व करंजफेन येथील पूरग्रस्तांना मदत

फोंडाघाट : वार्ताहर

मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालकांच्या निर्देशानुसार कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाटच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आवळी बु. व करंजफेन येथील पूरग्रस्तांसाठी अन्नधान्य, कपडे, ब्लँकेट, चादर, बेडशीट, पाणी बॉटल इत्यादी साहित्य पाठवण्यात आले. एनएसएस विभागाने संकलित केलेली ही मदत प्रत्यक्ष बाधित गावाकडे रवाना करताना फोंडाघाट महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. सतीश कामत, एन.एस.एस. विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. बालाजी सुरवसे, कार्यालय प्रमुख दीपक सावंत, डॉ. संतोष रायबोले, डॉ. वैभव साबळेकर, प्रा. संतोष आखाडे, प्रा. जगदीश राणे, डॉ. बी. व्ही. डाफळे, अनंत गुरव, रमेश पवार उपस्थित होते. आवळी बु. सरपंच सर्जेराव कांबळे, तंटामुक्तीचे अध्यक्ष प्रा. आनंद कदम, सहकारी साखर कारखान्याचे संचालक बी. आर. पाटील, माजी उपसरपंच बी.व्ही. शिंदे, ग्रामसेवक श्री. डी., मंडलाधिकारी श्री. कदम, राजेंद्र कदम, सचिन चौगुले, करंजफेन पोलीस पाटील ज्ञानदेव पाटील व ग्रामस्थ उपस्थित होते.

तरुण भारत सोमवार, २६ ऑगस्ट २०१९

# निबंध स्पर्धेत किरण सावंत, सिद्धी मोरे प्रथम

कणकवली : कणकवली तालुका पत्रकार समितीच्यावतीने आयोजित शालेय व खुल्या गटातील निबंध स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. खुल्या गटात शिरवडे येथील किरण मोतीराम सावंत यांनी तर शालेय गटात विद्यामंदिर हायस्कूल, कणकवलीच्या सिद्धी सुरेंद्र मोरे हिने प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना बुधवार २८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता कणकवली कॉलेजच्या एचपीसीएल सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमात पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे.



सिद्धी मोरे

उर्वरित निकाल पुढीलप्रमाणे : खुला गट - २ सौ. सुरेखा श्यामसुंदर परब, ओसरगाव, ३ हेमंत मोतीराम पाटकर, कणकवली, उत्तेजनार्थ - प्रतीक्षा भगवान तेली, फोंडाघाट कॉलेज. शालेय गट - २. समीक्षा सतीश कामत, ३ भक्ती शंकर राठोड (दोन्ही न्यू इंग्लिश स्कूल, फोंडाघाट), उत्तेजनार्थ-हृतिका रविकांत पेडूरकर (माध्यमिक विद्यालय, कनेडी). स्पर्धेचे परीक्षण पत्रकार वीरेंद्र चिंदरकर, मानसिंग सावंत व शिक्षिका निकिता कदम यांनी केले. यशस्वी स्पर्धकांनी बक्षीस वितरण समारंभाला उपस्थित राहावे, असे आवाहन तालुका पत्रकार समितीचे अध्यक्ष भगवान लोके (९४२२३१४५०५) यांनी केलेय.

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEG
Phondaghat, Tal.kankavli, Dist.Sindhudurg

# प्रहार

बुधवार, २१ ऑगस्ट २०१९






फोंडाघाट महाविद्यालयाचे एन एस एस प्रमुख प्रा.डॉ.बाळाजी सुरवसे यांचेकडे न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज च्या विद्यार्थ्यांनी पूरग्रस्तांसाठी आणलेली मदत. धान्य, कपडे, तेल, बिस्किटे, पाणी बॉटल्स व जीवनावश्यक वस्तू प्रशालेचे पर्यवेक्षक श्री. सावंत सर व शिक्षक सुपूर्द करताना.

ARTS & COMMERCE COLLE
Phondaghat, Tal.kankavli, Dist.Sindhudurg

लोकमत
कोकण, गुरुवार, दि. १३ ऑक्टोबर २०२२

# फोंडाघाट महाविद्यालयाचे क्रीडा स्पर्धेत उज्ज्वल यश

लोकमत न्यूज नेटवर्क

कणकवली : फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विभाग व विद्यापीठ पातळीवर उज्ज्वल यश प्राप्त केले. मुंबई विद्यापीठ अंतर्गत कुस्ती या क्रीडा प्रकारात चमकदार कामगिरी केली. महाविद्यालयाचा ज्युदो या क्रीडा प्रकाराचा संघ सी.के.टी. पनवेल येथे विभागस्तरीय स्पर्धेत सहभागी झाले होते. त्यात मुलींच्या ५३ किलो वजनी गटात प्रचिती तारी हिने तृतीय क्रमांक पटकावून कास्य पदकाची कमाई केली, तर ९० किलो वजनी गटात प्रथम क्रमांक पटकावून मैंसन डिसोझा या विद्यार्थ्याची मुंबई विद्यापीठात खेळण्यास निवड झाली.

तसेच कुस्ती या क्रीडा प्रकारात के.एम.सी. खोपोली येथे गेलेल्या संघात ५३ किलो वजनी गटात प्रचिती तारी हिने प्रथम क्रमांक पटकावून मुंबई विद्यापीठात खेळण्यासाठी तिची निवड झाली.



प्रचिती तारी




मैंसन डिसोझा

आंतर महाविद्यालय क्रीडा स्पर्धेत मुंबई विद्यापीठ येथे झालेल्या मुलांच्या ९० किलो वजनी गटातील स्पर्धेत मैंसन डिसोझा याने तृतीय क्रमांक पटकावून कास्यपदकाची कमाई केली.

फोंडाघाटसारख्या ग्रामीण भागातून मुंबई सारख्या शहरात यश मिळवणे हे कौतुकास्पद आहे. या यशाचे कौतुक संस्थेचे अध्यक्ष सुभाष सावंत, सचिव चंद्रशेखर लींगज, खजिनदार आनंद मर्वे तसेच सर्व संचालक, प्राचार्य डॉ. विष्णु फुलझेले, सर्व शिक्षक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले. या विद्यार्थ्यांना क्रीडा विभागप्रमुख प्रा. जगदीश राणे यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रहार
सिंधुदुर्ग
सोमवार १७ ऑक्टोबर, २०२२ | ५

# फोंडाघाट महाविद्यालयाचे क्रीडा स्पर्धेत उज्वल यश



फोंडाघाट :

येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाटच्या विद्यार्थ्यांनी विभाग व विद्यापीठ पातळीवर उज्वल यश प्राप्त केले. मुंबई विद्यापीठ अंतर्गत कुस्ती व क्रीडा प्रकारात चमकदार कामगिरी केली. महाविद्यालयाचा ज्युदो या क्रिडा प्रकाराचा संघ सी.के.टी. पनवेल येथे विभाग पातळीवर खेळण्यास गेला होता त्यात मुलींच्या ५३ किलो वजनी गटात प्रचिती तारी हिने तृतीय क्रमांक पटकावून कास्यपदकाची कमाई केली तर ९० किलो वजनी गटात प्रथम क्रमांक पटकावून मैंसन डिसोझा या विद्यार्थ्यांची मुंबई विद्यापीठात खेळण्यास निवड झाली. तसेच कुस्ती या क्रीडा प्रकारात के.एम.सी. खोपोली येथे गेलेल्या संघात ५३ किलो वजनी गटात कु. प्रचिती तारी हिने प्रथम क्रमांक पटकावून मुंबई विद्यापीठात खेळण्यास तिची निवड झाली. आंतर महाविद्यालय क्रीडा स्पर्धेत मुंबई विद्यापीठ येथे झालेल्या मुलांच्या ९० किलो वजनी गटातील स्पर्धेत मैंसन डिसोझा याने तृतीय क्रमांक पटकावून कास्यपदकाची कमाई केली.

फोंडाघाटसारख्या ग्रामीण भागातून मुंबई सारख्या शहरात यश मिळवणे हे कौतुकास्पद आहे. या यशाचे कौतुक संस्थेचे चेअरमन सुभाष सावंत, सचिव चंद्रशेखर लींगज, खजिनदार आनंद मर्वे तसेच सर्व संचालक महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णु फुलझेले, सर्व शिक्षक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले. सदर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन क्रीडा विभाग प्रमुख प्रा. जगदीश राणे यांचे लाभले.

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLE
Phondaghat, Tal.Kankavli, Dist. Sindhudu

लोकमत
बुधवार १९.१०.२०२२

ARTS & COMMERCE COLLEGE
ESTD. 1995
PHONDAGHAT TAL. KANKAVLI

# फोंडाघाट महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कणकवली :** फोंडाघाट एज्युकेशन सोसायटीच्या कला आणि वाणिज्य महाविद्यालयात माजी राष्ट्रपती डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.




फोंडाघाट महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिनानिमित्त प्राचार्य डॉ.विष्णू फुलझेले यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.विष्णू फुलझेले म्हणाले, प्रत्येक विद्यार्थ्यांनी पुस्तके वाचलीच पाहिजेत. पुस्तके ही मित्र असतात. जीवनाला योग्य दिशा देण्याचे काम पुस्तकांमधून होत असते. आपल्या संपूर्ण जीवनात डॉ.कलाम यांनी भारत देशाला मिसाईलमध्ये प्रगतिपथावर नेऊन ठेवले. डॉ.कलाम यांची 'भारत २०२०', 'प्रज्वलित मने', 'सामाजिक परिवर्तन' यांसारखी पुस्तके विद्यार्थ्यांनी वाचली पाहिजेत. डॉ.कलाम यांना पद्मभूषण, पद्मविभूषण, भारतरत्न, यांसारखे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. या पुरस्कारातून त्यांच्या कार्याची महानता समजून येणे आजच्या पिढीला आवश्यक आहे. आजचा युवक हा वाचनापासून दूर होत चालला आहे. भारत महासत्ता होण्यासाठी आजच्या पिढीने वाचन संस्कृती जोपासली पाहिजे. महाविद्यालयात फक्त कार्यक्रमाचे आयोजन केले जाते, पण त्याची अंमलबजावणी विद्यार्थ्यांनी केली पाहिजे. डॉ.कलाम यांचे विचार आणि संदेशाचे पालन युवापिढीने केले, तरच खऱ्या अर्थाने वाचन प्रेरणा दिन साजरा झाला, असे म्हणता येईल.

वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून ग्रंथालयामार्फत 'वाचन संस्कृती काळाची गरज' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये १८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यात प्रथम क्रमांक सुयश लाड, द्वितीय क्रमांक सुचिता कदम, तृतीय क्रमांक दीप्ती मासये व प्रियांका गुरव यांना विभागून देण्यात आले. या कार्यक्रमाचे ग्रंथपाल डॉ. विद्या मोदी यांनी प्रास्ताविक केले तर प्रा. डॉ. सतीश कामत यांनी आभार मानले.

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal.kankavli, Dist.Sindhudurg

लोकमत
सिंधुदुर्ग, शुक्रवार, दि. २ डिसेंबर २०२२



फोंडाघाट महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रदीप खानविलकर यांनी मार्गदर्शन केले.

# भरतीपूर्व उत्तम तयारी हीच यशाची गुरुकिल्ली

## प्रदीप खानविलकर : फोंडाघाट येथे मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कणकवली :** आजकाल स्पर्धा परीक्षेचे युग आहे. सर्वच क्षेत्रात स्पर्धा आहे. त्यामुळे कोणत्या ही स्पर्धेची तयारी करण्याची आवश्यकता असते. उत्तम तयारी हीच यशाची गुरुकिल्ली आहे,असे मत खानविलकर अकॅडमीचे प्रदीप खानविलकर यांनी व्यक्त केले.

फोंडाघाट येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालय येथे स्पर्धा परीक्षा व राष्ट्रीय छात्र सेना विभागामार्फत पोलिस भरतीपूर्व मार्गदर्शन उपक्रम घेण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना प्रदीप खानविलकर बोलत होते.

ते म्हणाले, आपली स्वप्न ही उच्च असली पाहिजेत. आपले करिअरचे ध्येय हे महाविद्यालय शिक्षण घेत असतानाच निश्चित झाले पाहिजे. मग त्यादिशेने आपण कसोशीने प्रयत्न केले पाहिजेत. या स्पर्धेसाठी लिखित परीक्षेबरोबरच मैदानी चाचणीचा स्तरही उच्च असणे आवश्यक आहे. कोणत्याही नोकरीचे करिअर हे वयोमर्यादित असते. त्यामुळे योग्य वेळीच नीट अभ्यास करून स्पर्धेत उतरला तर यश मिळवणे कठीण जाणार नाही.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू पुलझेले म्हणाले, स्पर्धा परीक्षा हा आपल्या वैयक्तिक क्षमतेवर कोणत्याही प्रकारचा शॉर्टकट न घेता नोकरी मिळवण्याचा निश्चित पर्याय आहे.

पुढारी
रविवार, ४ डिसेंबर २०२२

# फोंडाघाट उगवाई नदीवर श्रमदानातून बंधारा

**फोंडाघाट : पुढारी वृत्तसेवा**

महाविद्यालय फोंडाघाट राष्ट्रीय छात्र सेना विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थ्यांनी केलेल्या श्रमदानातून फोंडाघाट उगवाई नदीच्या पात्रात कच्चा बंधारा बांधण्यात आला.



या बंधाऱ्यामुळे काय परिसरातील विहिरींच्या पाण्याची पातळी स्थिर होणार असून जनावरांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. दरवर्षी मार्च महिन्यानंतर फोंडाघाट गावात पाळीव प्राणी आणि जनावरांना पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होते. त्याचप्रमाणे डिसेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत ओढ्यातून पाणी वाहत असल्याने मोठ्या प्रमाणात पाणी वाया जाते. हे वाया जाणारे पाणी अडविण्यासाठी महाविद्यालय फोंडाघाट येथील राष्ट्रीय छात्र सेना विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला. ६५ विद्यार्थ्यांनी श्रमदानातून सुमारे ५० फूट लांबीचा कच्चा बंधारा बांधला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विष्णू पुलझेले यांनी या उपक्रमास प्रोत्साहन दिले. बंधाऱ्याच्या पाहणीसाठी राष्ट्रीय छात्र सेनेचे असोसिएट एन. सी. सी. अधिकारी लेफ्ट. डॉ. राज ताडेराव व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बाळाजी सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली एन. सी. सी. कॅडेट व राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLL
Phondaghat,Tal.kankavli,Dist.Sindhu

प्रहार
शनिवार ३ डिसेंबर, २०२२

# स्वत :चा व्यवसाय हाच खरा विकास : दर्शना पेडणेकर

फोंडाघाट (वार्ताहर)

स्वतःचा व्यवसाय हे प्रत्येकाचे स्वप्न असावं पाहिजे. स्वतःच्या डोक्याने कौशल्याचा विकास केला तर आपला व्यवसाय निश्चित भरारी घेतो व त्यातून आपली आर्थिक उन्नती घडते हे नक्की, असे आत्मविश्वास प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या, फोंडाघाट महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी दर्शना पेडणेकर यांनी केले.



दर्शना पेडणेकर यांचे स्वागत करताना प्राचार्य फुलझेले, बाजूला डॉ. विद्या मोदी.

येथील कला वाणिज्य आणि महाविद्यालयीन फोंडाघाट मध्ये सावित्रीबाई फुले महिला विकास कक्ष व ग्रंथालय विभागामार्फत रोजगाराच्या संधीतून महिलांचा आर्थिक विकास या विषयावर मार्गदर्शनासाठी आयोजित कार्यक्रमात दर्शना पेडणेकर बोलत होत्या.

कुठलही क्षेत्र निवडताना त्या क्षेत्राचा अभ्यास असणे आवश्यक आहे. दुसऱ्याच्या हाताखाली काम करण्यापेक्षा स्वतः रोजगार निर्माण करा, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. फुलझेले या वेळी म्हणाले स्वतःचा उद्योग ही मोठी अचिव्हमेंट असते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. विद्या मोदी यांनी केले. तर प्रा. जगदीश राणे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचा कर्मचारी वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal.Kankavli, Dist.Sindhudurg

पुढारी | रविवार, ४ डिसेंबर २०२२

# फोंडाघाट महाविद्यालयात एड्स दिन साजरा

फोंडाघाट : पुढारी वृत्तसेवा

कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाट येथे एन.एस.एस. व एन.सी.सी. विभागाच्यावतीने एड्स दिन साजरा करण्यात आला. १ ते ७ डिसेंबर असा जगात एड्स सप्ताह साजरा करण्यात येतो. त्याचाच एक भाग म्हणून हा दिन साजरा करण्यात आला.

फोंडाघाट प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. अन्नपूर्णा बालावलकर यांनी मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, एड्सवर मात करायची असेल तर त्या रोगाची पूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आपल्या शरीरातील होणारे बदलही ज्ञात असले पाहिजेत. आपल्या संस्कृतीत ज्या विषयावर बोलणे निषिद्ध मानले जाते त्यामुळेच अशा रोगात आपण अज्ञानापोटी अडकून पडतो. आता सोशल मीडियाच्या युगात आपण या ज्ञानापासून दूर राहणे योग्य नाही. अशा बाबतीत सुरुवातीच्या टप्प्यात आपल्याला रोगाचे ज्ञान झाल्यास या रोगातून आपल्याला मुक्त होणे सोपे जाते. बदलत्या समाज जीवनामुळे लैंगिक क्रिया या खूप लवकर होऊ लागल्या आहेत. त्यामुळे योग्य मार्गदर्शन किंवा ज्ञान मिळाले नाही तर आपण या रोगाचे बळी पडू शकतो असे डॉ. बालावलकर म्हणाल्या.

डॉ. अमोल केंद्रे म्हणाले, कोणत्याही गोष्टी लपवून ठेवू नका. त्यामुळे आपल्या अडचणीत मोठ्या प्रमाणात वाढ होते. ज्या वयोगटात खूप बदल होतात तेच हे वय आहे. या वयात आपल्याला जीवनाला नीट आकार देता आला पाहिजे. प्रत्येक गोष्टीची काळजी घेतली पाहिजे असे मत व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. विष्णू फुलझेले म्हणाले, आमच्या काळात एड्स हा प्रकार नवीन होता. त्यामुळे त्याची भीती खूप मोठ्या प्रमाणात होती. परंतु अभ्यासानंतर त्याची काळजी कशी घ्यावी हे आम्हाला कळले आणि भीती कमी झाली. आपल्या नैतिक मूल्यांचे पालन केले तर या रोगापासून आपल्याला भीती बाळगण्याची आवश्यकता पडणार नाही. स्वच्छता ही सुद्धा एक काळजी घेण्याची गोष्ट आहे असे प्रतिपादन केले.

प्रास्ताविक डॉ. राज ताडेराव यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. बालाजी सुरवसे यांनी तर आभार प्रा. विनोद पाटील यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.




कार्यक्रमात बोलताना डॉ. अन्नपूर्णा बालावलकर. सोबत डॉ. फुलझेले, डॉ. ताडेराव, डॉ. केंद्रे, डॉ. सुरवसे.

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal.kankavli, Dist Sindhudurg

87 134

125

लोकमत सिंधुदुर्ग, गुरुवार, १६ जानेवारी २०२०

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा उपक्रम : वाहतुकीच्या नियमांबाबत विद्यार्थ्यांना मान्यवरांकडून मार्गदर्शन

# फोंडाघाट महाविद्यालयात रस्ता सुरक्षा कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

फोंडाघाट : जिल्हा वाहतूक शाखा सिंधुदुर्ग, महामार्ग पोलीस केंद्र कणकवली-कसाल आणि कला व वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाटच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने फोंडाघाट महाविद्यालयात ३१ व्या रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त रस्ता सुरक्षा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. सतीश कामत, जिल्हा वाहतूक शाखा सिंधुदुर्गचे पोलीस निरीक्षक अविनाश भोसले, महामार्ग प्रभारी अधिकारी अरुण जाधव, उमाकांत पालव, संतोष प्रकाश गवस, विक्रम काकडे, कल्याण पिंटो, ए. बी. पवार, विशाल कांबळे, रणजित सावंत, राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. डॉ. बालाजी सुरवसे, प्रा. संतोष आखाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

अविनाश भोसले म्हणाले की, सर्वांनी वाहतुकीचे नियम नीट समजून घेऊन वाहन चालविताना नियमांचे उल्लंघन होऊ नये. निष्काळजीपणे वाहन चालविल्याने चालकासोबत प्रवाशांचाही जीव धोक्यात येतो. त्यामुळे अपघात रोखण्यासाठी व सुरक्षित प्रवासासाठी लोकांमध्ये जनजागृती होणे गरजेचे आहे. नियमांचे पालन करून वाहन चालविल्यास अपघातांना आळा बसतो.

## निष्काळजीपणामुळे अपघातांच्या प्रमाणात वाढ

अरुण जाधव म्हणाले की, युवकांनी अपघातापासून संरक्षण करावे यासाठी काळजी घेणे आवश्यक आहे. अपघातानंतर मदत करणे आवश्यक ही मदत करणे आपले राष्ट्रीय कार्य आहे. ते प्रत्येकाने पार पाडणे आवश्यक आहे. वाहनांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत चालली असून वाहनचालकांच्या निष्काळजीपणामुळे अपघाताचे प्रमाण वाढत आहे. या कार्यशाळेस प्रा. संतोष तायशेटे, प्रा. डॉ. राजाराम पाटील, प्रा. विनोद पाटील, प्रा. डॉ. बाळासाहेब शामळे, प्रा. सारिका राणे, प्रा. मधुरी सावंत, प्रा. रूपाली भाने व महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उमाकांत पालव यांनी महामार्ग पोलिसांकडे असणाऱ्या इंटरसेप्टर कारमधील विविध उपकरणांद्वारे वाहतुकीवर कसे नियंत्रण ठेवले जाते? तसेच वाहन चालविताना आपल्या वाहनाचा वेग कुठे व किती ठेवावा? वाहनाच्या काचा कशा असाव्यात? अल्कोहोल टेस्ट कशी केली जाते? याविषयी मार्गदर्शन केले.

प्रकाश गवस यांनी वाहन चालवताना लायसन्स, आरसी बुक, पीयूसी, विमा आणि किती महत्त्वाचे आहे हे सांगून ई-चलनद्वारे दंड कसा वसूल केला जातो याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी विक्रम काकडे व विशाल रेवडेकर यांनीही वाहतुकीच्या सुरक्षिततेच्या संदर्भात आपले विचार व्यक्त करताना सुरक्षेबाबत काळजी घेण्याचे आवाहन केले.




फोंडाघाट महाविद्यालयात रस्ता सुरक्षा कार्यशाळेत प्राचार्य डॉ. सतीश कामत यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवर उपस्थित होते.

कार्यशाळेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सतीश कामत म्हणाले, भारतात सुमारे ३० वर्षे रस्ता सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करूनही रस्ते अपघात कमी झालेले नाहीत ही अतिशय गंभीर बाब आहे. देशाचा युवक सुरक्षित असेल तरच तो देश सुरक्षित राहू शकतो. त्यामुळे अपघातावर नियंत्रण आणणे गरजेचे आहे. युवकांनी जास्तीत जास्त सुरक्षा बाळगणे आवश्यक असून युवकांनी समाजामध्ये जाऊन रस्ता सुरक्षेबाबत फार मोठ्या प्रमाणावर जाणीव-जागृती करणे आवश्यक आहे. तसेच शासनाने रस्ते सुरक्षेबाबतचे जनजागृतीचे व्यापक व नियमित कार्यक्रम शालेय स्तरावरून घेण्याची आवश्यकता आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख प्रा. डॉ. बालाजी सुरवसे यांनी केले तर आभार प्रा. संतोष आखाडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी रस्ता सुरक्षा शपथ ग्रहण केली.

ARTS & COMMERCE COLLEGE PHONDAGHAT ESTD. 1995

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

175

प्रहार | मंगळवार, २१ जानेवारी २०२०

# सातत्यपुर्ण प्रयत्नातून आपण इच्छीत ध्येय गाठू शकतो: श्यामसुंदर पाटील

## 'वेध भविष्याचा' स्पर्धा परिक्षा तयारी आणि व्यक्तिमत्व विकास शिबिराचे दुसरे पुष्प

▶ फोंडाघाट (वार्ताहर)

सध्याच्या सामाजिक उत्थापनात स्पर्धा परीक्षा हा यशस्वी आयुष्याचा, करिअरचा भाग आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थी-विद्यार्थीनींनी आपल्या आवडीप्रमाणे ध्येय निश्चित करा. योग्य मार्गदर्शनाने आणि अथक प्रयत्नाने, परिश्रमाने अभ्यास केल्यास उच्च दर्जाच्या अधिकारपदी आपण पोहोचू शकतो.

त्यासाठी चांगले मार्कसची आवश्यकता नसते. एखादे वेळी मार्क कमी पडले म्हणून निराश न होता सातत्यपुर्ण प्रयत्न केले तर आपले ध्येय आपण गाठू शकतोच असे सकारात्मक मार्गदर्शन महाराष्ट्र राज्याचे महसुल, वनखात्याचे सचिव श्यामसुंदर पाटील यांनी केले.

'निव' फाऊंडेशन, न्यु इंग्लिश स्कूल फोंडाघाट आणि माजी विद्यार्थी संघ, मुंबई यांच्या माध्यमातून 'वेध भविष्याचा' ह्या स्पर्धा परीक्षा तयारी आणि व्यक्तिमत्व विकास शिबिराच्या दुसऱ्या पुष्पात ते बोलत होते. व्यासपीठावर सौ. पाटील कणकवली प्रांताधिकारी सौ. वैशाली राजमाने, गुणाजी सावंत, दिलीप पारकर, मनिष गांधी, दिलीप पाटील, शंकर सावंत, डॉ. सतिश कामत इ. मान्यवर



'वेध भविष्याचा' स्पर्धा परिक्षा तयारी आणि व्यक्तिमत्व विकास शिबिराचे दुसरे पुष्प गंफताना महाराष्ट्र राज्याचे महसुल, वनखात्याचे सचिव श्यामसुंदर पाटील ,व्यासपीठावर सौ. पाटील ,प्रांताधिकारी सौ. वैशाली राजमाने. (छाया : कुमार)

उपस्थित होते. प्रास्ताविक 'निव' चे अध्यक्ष दिलीप सावंत यांनी केले. पाहुण्यांची ओळख अनिल सावंत यांनी तर प्रमुख व्याख्यात्यांचा स्वागत-सत्कार गुणाजी सावंत यांनी केला.

यावेळी श्यामसुंदर पाटील यांनी उपस्थित शिबिरार्थीना दृकश्राव्य माध्यमाद्वारे यशस्वी करिअरच्या शाखा, युपीएससी/एमपीएससी/आयपी एस/बँकिंग/इतर क्षेत्रे, सैनिकी विभाग इ.ची समग्र माहिती सांगुन त्यांच्या प्रवेश प्रक्रिया समजावून सांगितल्या.

दुसऱ्या व्याख्यात्या कणकवली प्रांताधिकारी सौ. वैशाली राजमाने यांनी 'निव' फाऊंडेशनच्या उपक्रमाचे कौतुक केले. सरकारी नोकरीत काम करताना सिंधुदुर्गातील युवक-युवती अधिकारी पदावर खुपच कमी पहावयास मिळतात. त्यामुळे या संस्थेचे काम महत्त्वाचे आहे.

यातून चांगले अधिकारी तयार होण्यासाठी प्रबोधन होईल असा विश्वास वाटतो. आपणही खेडेगावातून शिक्षण घेतले. एका शिक्षण संस्थेत शिक्षिकेची नोकरी केली. परंतु स्पर्धा परीक्षा खुणावत होती. ध्येय निश्चिती ला सकारात्मकतेची जोड मिळाली. जिद्द, परिश्रम, योग्य मार्गदर्शन यांच्या जोरावर अनेक अडचणी-समस्यांना सामोरे जाताना घरच्यांच्या प्रोत्साहनामुळे मी आज इथपर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे एखादा मार्क कमी पडले म्हणून खचून न जाता पुन्हा उभारी घ्या, प्रयत्न करा. यश नक्कीच मिळेल. या अनुभवाने सर्वच उपस्थित प्रेरित झाले.

यानंतर झालेल्या शंका समाधान सत्रात अनेक मुला-मुलींनी आपल्या समस्या, मार्गदर्शनाबद्दल प्रश्न उपस्थित केले. त्यावरून दोन्ही व्याख्यात्यांनी समाधान व्यक्त करून त्यांना विविध उदाहरणांनी सकारात्मक उत्तरे दिली. त्यामुळे उपस्थितांमधील मुला-मुलींनी या उपक्रमामुळे आपल्याला सविस्तर मार्गदर्शनामुळे प्रोत्साहन मिळाल्याचे मनोगत व्यक्त केले.

शिबिर पार पाडण्यासाठी अनिल सावंत, दिलीप सावंत, रंजन चिके, नंदू कोरगांवकर आणि फोंडा कॉलेजचे प्राध्यापक व स्टाफ यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी आभार गुणाजी सावंत व दिलीप सावंत यांनी मानले. 'निव' च्या या उपक्रमाचे सर्वत्र समाधान व्यक्त होत आहे.

सकाळ | सिंधुदुर्ग, रविवार, १९ जानेवारी २०२०

## फोंडाघाटात आज शिबिर

कणकवली : स्पर्धा परीक्षांची तयारी व विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास या उद्देशाने स्थापन झालेल्या नीव फाऊंडेशन व माजी विद्यार्थी संघातर्फे १९ ला दुपारी १.३० ते सायंकाळी ५.३० वाजता फोंडाघाट कला व वाणिज्य महाविद्यालय येथे वेध भविष्याचा हा स्पर्धा परीक्षा तयारी आणि व्यक्तिमत्व विकास शिबिराचा कार्यक्रम तरुणाईसाठी मोफत आयोजित करण्यात आला आहे. यापूर्वी फोंडाघाट येथे आयोजित अशा कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळेच पुन्हा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमात मार्गदर्शन म्हणून राज्य शासनाच्या वनविभागाचे महासचिव श्यामसुंदर पाटील, कणकवलीच्या उपविभागीय अधिकारी वैशाली राजमाने मार्गदर्शन करणार आहेत. नाव नोंदणीसाठी कुमार नाडकर्णी यांच्याशी संपर्क साधावा.

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

138



फोंडाघाट येथे बालकांसाठी लसीकरण मोहीम राबविण्यात आली.

**लोकमत**

बुधवार, दि. २९ जानेवारी २०२०

# 'लसीकरण'मध्ये फोंडाघाट महाविद्यालयाचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

फोंडाघाट : जागतिक आरोग्य संघटना संपूर्ण जगभर पोलिओ निर्मूलनासाठी विशेष प्रयत्न करीत असून ५ वर्षांखालील बालकांना पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबवित आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र फोंडाघाटअंतर्गत परिसरातील विविध लसीकरण केंद्रांवरही ही मोहीम राबविण्यात आली.

फोंडाघाट महाविद्यालयाच्या एनएसएस विभागाने यात उत्स्फूर्त सहभाग घेतला. वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन जंगम व एनएसएस विभाग प्रमुख प्रा. डॉ. बालाजी सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील एनएसएस स्वयंसेवकांनी पोलिओ लसीकरणासाठी फोंडाघाट परिसरातील ५ वर्षांखालील बालकांच्या पालकांचे घरोघरी जाऊन प्रबोधन केले. तसेच लसीकरण केंद्रावर लसीकरणास मदत करण्यासाठी स्वयंसेवक हजर राहिले. यासाठी रत्नेश पोवार, संजना तावडे, श्रावणी सावंत व सचिता लाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

पोलिओ लसीकरण मोहीम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाच्या एनएसएस विभागाने सहभाग घेतल्याबद्दल फोंडाघाट एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन श्रीकांत आपटे, सचिव मनीष गांधी, खजिनदार समीर मोंगले व संचालक तसेच प्राचार्य डॉ. सतीश कामत, वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन जंगम, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

ARTS & COMMERCE COLLEGE, PHONDAGHAT Tal. KANKAVLI, Estd. 1995

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

**लोकमत** सिंधुदुर्ग, शुक्रवार, ३१ जानेवारी २०२०

**मनोज रावराणे :** लोरे नं. १ येथे स्वामी विवेकानंद ग्रंथालयाचे उद्घाटन

# वाचनाने कल्पनाशक्तीचा विकास होतो

लोकमत न्यूज नेटवर्क

फोंडाघाट : वाचन माणसाला विचाराने व कृतीने श्रीमंत करते. जगभरातील श्रीमंत व्यक्ती नियमितपणे वाचन करतात. आपणास उत्तम शरीरासाठी उत्तम व्यायाम व जेवणाची आवश्यकता असते त्याचप्रमाणे उत्तम बुद्धिमत्तेसाठी रोज वाचन करणे आवश्यक असते. वाचनाने कल्पनाशक्तीचा विकास होतो, असे प्रतिपादन कणकवली पंचायत समिती सदस्य मनोज रावराणे यांनी विद्यामंदिर हायस्कूल लोरे नं. १ येथे कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाट राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित स्वामी विवेकानंद ग्रंथालयाच्या उद्घाटनप्रसंगी केले.



लोरे नं. १ येथील कार्यक्रमात मनोज रावराणे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी फोंडाघाट एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी मनीष गांधी, फोंडाघाट महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कामत, लोरे नं. १ सरपंच अजय रावराणे, उपसरपंच अनंत रावराणे, उद्योजक जीवन रावराणे, राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख प्रा. डॉ. बालाजी सुरवसे, प्रा. संतोष आखाडे व मुख्याध्यापक देसाई उपस्थित होते. रावराणे यांनी फोंडाघाट महाविद्यालयाच्या एनएसएस विभागाचे अभिनंदन करीत ५००० रुपये किमतीची पुस्तके स्वामी विवेकानंद ग्रंथालयासाठी देणगी स्वरूपात दिली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कामत म्हणाले, पुस्तक मस्तक घडवत असते. घडलेल्या मस्तकासमोर अनेकजण नतमस्तक होत असतात. विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा. वाचनाला जसे जीवनात [illegible] अनन्य साधारण महत्त्व आहे, असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला. ग्रंथालयाचे उद्घाटक व फोंडाघाट एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी मनीष गांधी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त पुस्तकांचे वाचन करणे आवश्यक आहे. वाचनाने आपल्या जीवनात निश्चित परिवर्तन घडू शकते. स्वामी विवेकानंद ग्रंथालयात विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थांनी मिळून जास्तीत जास्त ग्रंथ जमा करून ते जास्तीत जास्त वाचकांना उपलब्ध करून द्यावेत, असे आवाहन त्यांनी केले.

मनोज रावराणे यांचा मनीष गांधी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन एनएसएस विभाग प्रमुख प्रा. डॉ. बालाजी सुरवसे यांनी तर आभार प्रा. संतोष आखाडे यांनी मानले. यावेळी स्वयंसेवक गणेश पवार, कालिदास जाधव, प्राची राणे, काजल सुतार, सूरज लाड, रोहित जाधव तसेच विद्यामंदिर हायस्कूल लोरे - वाघेरी येथील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

139

# फोंडाघाट महाविद्यालयाच्यावतीने शहिदांना मानवंदना


लोकमत न्यूज नेटवर्क

फोंडाघाट : येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या छात्रसेना विभागाच्यावतीने हुतात्मा सैनिकांना मानवंदना देण्यात आली. विभागाच्यावतीने कणकवली येथील हुतात्मा स्मारकात एक छोटेखानी कार्यक्रम आयोजित केला होता. त्यावेळी हुतात्मा सैनिकांना मानवंदना देण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विभागप्रमुख डॉ. डी. बी. तायशेटे म्हणाले, सैनिकांच्या त्यागामुळे आपण सुरक्षित आहोत. सर्वसामान्य भारतीय नागरिक सुरक्षित राहण्यासाठी अनेक सैनिकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली आहे. त्यांचा व त्यांच्या कुटुंबीयांचा त्याग याची किंमत करता येणार नाही. आपण त्यांचा फक्त सन्मान केला पाहिजे. कणकवली येथील हुतात्मा स्मारकाच्या माध्यमातून सैनिकांच्या त्यागाची आठवण राहते.

यावेळी स्मारक आणि स्मारकाचा परिसर याची छात्रसेना विद्यार्थ्यांनी स्वच्छता केली. महाविद्यालयाच्यावतीने प्राचार्य डॉ. सतीश कामत यांनी सैनिकांप्रति कृतज्ञता व्यक्त करून या उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास डॉ. संतोष रायबोले, प्रा. संतोष आखाडे यांनी भेट दिली. उपक्रमाच्या यशस्वितेसाठी विभागप्रमुख डॉ. डी. बी. तायशेटे व सर्व छात्रसैनिकांनी परिश्रम घेतले.

रविवार दि. २ फेब्रुवारी २०२० | लोकमत | ३



फोंडाघाट महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना डॉ. सूर्यकांत आजगावकर यांनी मार्गदर्शन केले.

# मराठी विषयात व्यवसायाची संधी

## सूर्यकांत आजगावकर : फोंडाघाट येथे व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

फोंडाघाट : येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयात 'मराठी विषय आणि व्यवसाय संधी' या विषयावर खालसा कॉलेज मुंबईचे तसेच मुंबई विद्यापीठाच्या मराठी विषयाच्या अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. सूर्यकांत आजगावकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कामत होते.

यावेळी डॉ. आजगावकर म्हणाले, मराठी विषयात व्यवसाय संधी खूप मोठ्या प्रमाणात आहेत. त्या संधींच्या दृष्टीकोनातून आपण त्याचा गांभीर्याने अभ्यास केला पाहिजे. भाषांतर, मुद्रित शोधन, पत्रकारिता, संपादन अशा अनेक व्यवसाय संधींबरोबरच एम.पी.एस.सी., यू.पी.एस.सी. परीक्षेत मराठी विषय अनिवार्य केल्यामुळे मराठी विषयाकडे विद्यार्थ्यांचा बघण्याचा दृष्टीकोन हा व्यावसायिक असला पाहिजे. मराठीचे भवितव्य आताच्या तरुणांच्या हातात आहे. त्यांनी ते सांभाळले पाहिजे, असे ते म्हणाले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कामत यांनी डॉ. आजगावकर यांचे स्वागत करून पुस्तके भेट दिली. प्रा. जगदीश राणे म्हणाले, मराठी बोलल्याने मिळणारे समाधान खूप मोठे असते. आपल्या मातृभाषेचा सन्मान हा आपणच केला पाहिजे आणि तीच भाषा आपल्याला व्यवसाय मिळवून देते, असे ते म्हणाले. हे व्याख्यान मराठी विभागाच्यावतीने आयोजित करण्यात आले होते. आभार प्रा. जगदीश राणे यांनी मानले.

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal. Kankavli, Dist Sindhudurg

137

रविवार दि. २६ जानेवारी २०२० | लोकमत

# 'स्त्री'चा सन्मान केला पाहिजे

## सतीश कामत। फोंडाघाट महाविद्यालयात राष्ट्रीय कन्या दिन साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

फोंडाघाट : येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने राष्ट्रीय कन्या दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सतीश कामत होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. कामत म्हणाले, आपल्याच्या घरातसुद्धा भीक न घालता सध्या देशात अत्याचार चालू आहेत हे निंदनीय आहे. आपल्या देशात प्रत्येक क्षेत्रात स्त्रीने नावलौकिक मिळविला आहे. तरीही आपल्याला हा नावलौकिक कोणामुळे मिळाला, हे आपल्याला समजले नाही. ते समजले असते तर आज होणारे अत्याचार कमी होतील. स्त्रीला वजा करून हा निसर्ग चालणार नाही, याचे भान आपल्याला असले पाहिजे. स्त्रीचा सन्मान आपण केलाच पाहिजे.



फोंडाघाट येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने राष्ट्रीय कन्या दिन साजरा करण्यात आला. यावेळी मधुरी सावंत यांनी मार्गदर्शन केले.

### स्त्री मुळातच सोशिक : स्वत:चे रक्षण करणे गरजेचे

प्रा. सारिका राणे म्हणाल्या, स्त्रीला सक्षम बनविले पाहिजे. तिला स्वत:चे रक्षण करता आले पाहिजे. अत्याचाराविरुद्ध बोलण्याचे धाडस स्त्रियांमध्ये आले पाहिजे. तसे झाले तरच महिलांवरील अत्याचार कमी होतील. स्त्री मुळातच सोशिक असते. स्त्रियांच्या सोशिकपणाचा उपयोग पुरुषांच्या अहंकाराने घेतला आणि तिला सतत कमी लेखण्याचा प्रयत्न केला गेला. आता ही परिस्थिती बदलली तरी समाधान करावे असे नाही, असेही त्या म्हणाल्या.

यावेळी लिटिल फ्लॉवर इंग्लिश स्कूल फोंडाघाटच्या छोट्या मुलींचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना प्रमुख पाहुण्या प्रा. मधुरी सावंत यांनी स्त्री-पुरुष समानता फक्त भाषणापुरतीच मर्यादित आहे. प्रत्यक्षात ती दिसत नाही. यासाठीची आकडेवारी पुरावा म्हणून पुरेशी आहे. त्यासाठी मानसिकता बदलण्याची गरज आहे. या विषय प्रश्नाला फक्त पुरुषच जबाबदार नसून महिलासुद्धा जबाबदार आहेत. आजची मुलगी उद्याची बहीण, आई असते, त्यामुळे स्त्रीने स्वत:च्या आदर स्वत: केला पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

आई व बहिणीवर कविता करून भागणार नाही. त्यासाठी स्त्रीच्या जन्माचा आदर केला पाहिजे. पुरुषांवर अवलंबून राहण्याची सवय सोडली पाहिजे. स्वत:ला सिद्ध केले पाहिजे. तरच स्त्रीच्या जन्माचा सन्मान होईल, असे विद्यार्थिनी शितल कुणकावकर हिने सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बालाजी सुरवसे यांनी केले तर आभार सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. रूपाली माने यांनी मानले.

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat Tal.Kankavli Dist.Sindhudurg

९० १३८

प्रहार रविवार, २६ जानेवारी २०२० सिंधु

# स्त्रीने स्वत:चा आदर स्वत: राखला पाहिजे : प्रा.मयुरी सावंत

## फोंडाघाट येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय कन्या दिन साजरा

▶ फोंडाघाट (वार्ताहर)


स्त्री पुरुष समानता फक्त भाषणापुरतीच मर्यादित आहे, प्रत्यक्षात ती दिसत नाही. त्यासाठी मानसिकता बदलण्याची गरज आहे. या विषम प्रमाणाला फक्त पुरुषच जबाबदार नसून महिलासुद्धा जबाबदार आहेत. आजची मुलगी उद्याची बहीण, आई असते. त्यामुळे स्त्रीने स्वत:चा आदर स्वत: केला पाहिजे, असे प्रतिपादन प्रमुख पाहुण्या प्रा.मयुरी सावंत यांनी केले.



फोंडाघाट येथे राष्ट्रीय कन्या दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना प्रा.मयुरी सावंत.

कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाट येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय कन्या दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सतीश कामत होते. ते म्हणाले आपल्या देशात प्रत्येक क्षेत्रात स्त्रीने नावलौकिक मिळवला आहे. स्त्रीला कमी करून हा निसर्ग चालणार नाही. याचे भान आपल्याला असले पाहिजे.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने लिटिल फ्लावर इंग्लिश स्कूल फोंडाघाटच्या छोट्या मुलींचा सत्कार करण्यात आला. पुरुषांवर अवलंबून राहण्याची सवय सोडली पाहिजे. स्वत:ला सिद्ध केले पाहिजे, असे विद्यार्थिनी शितल कुमकावकर हिने सांगितले. त्यानंतर विद्यार्थी प्रतीक केळेकर याने राष्ट्रीय कन्या दिनाच्या शुभेच्छा देताना पुरुषांची स्त्री प्रति वाढलेली जबाबदारी सांगितली. प्रा. सारिका राणे म्हणाल्या की स्त्रीला सक्षम बनविले पाहिजे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बाळाजी सुरवसे तर आभार सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. रूपाली माने यांनी मानले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचा सर्व शिक्षक वर्ग व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.



फोंडाघाट : येथील महाविद्यालयात गोल्ड कार्डचे वितरण.

सकाळ गुरुवार, ३० जानेवारी २०२०

# फोंडाघाट महाविद्यालयात गोल्ड कार्डचे वितरण

फोंडाघाट, ता. २९ : येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये ग्रंथालयामार्फत गोल्ड कार्डचे वितरण करण्यात आले. प्रास्ताविकात ग्रंथपाल डॉ. विद्या मोदी यांनी गोल्डकार्ड ही संकल्पना स्पष्ट करून सांगितली. महाविद्यालयातील विविध गुणवत्ता पात्र विद्यार्थ्यांना हे गोल्ड कार्ड दिले जाते. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या कार्यालयात एंट्री न राहता त्याची मागणी पूर्ण केली जाते. तसेच ग्रंथालयात नेहमीच्या विद्यार्थ्यांपेक्षा दुप्पट पुस्तके मिळतात. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी जास्त सुविधा मिळते. ग्रंथालयाच्या विकासासाठी भारतामध्ये रंगनाथन यांनी फार मोठी चळवळ उभी केली. त्यानंतर ग्रंथालयात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. आजच्या इंटरनेटच्या युगात ग्रंथालये मोबाईलमध्ये आली आहेत. डिजिटलची ग्रंथालयेही तयार झाली आहेत. प्राचार्य डॉ. संतोष रायबोले हे अध्यक्षस्थानी होते. आभार प्रा. विनोद पाटील यांनी मानले.

३८

151

प्रहार

सोमवार, ३ फेब्रुवारी २०२०

# फोंडाघाट महाविद्यालयाच्या छात्रसेना विभागाकडून शहिदांना मानवंदना




फोंडाघाट (वार्ताहर) : येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाटच्या छात्रसेना विभागाच्यावतीने हुतात्मा सैनिकांना मानवंदना देण्यात आली. विभागाच्यावतीने कणकवली तालुका, कणकवली येथील हुतात्मा स्मारकात एक छोटेखानी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी हुतात्मा सैनिकांना मानवंदना देण्यात आली. यावेळी विभाग प्रमुख डॉ.डी.बी.ताडेराव,प्राचार्य डॉ. सतीश कामत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमास डॉ. संतोष रायबोले, प्रा. संतोष आखाडे यांनी भेट दिली. उपक्रमाच्या यशस्वितेसाठी विभाग प्रमुख डॉ. डी.बी.ताडेराव व सर्व छात्रसैनिकांनी परिश्रम घेतले.

सिंधुदुर्ग, सोमवार, ३ फेब्रुवारी २०२०

पुढारी

# फोंडाघाट विद्यालयात विद्यार्थ्यांना गोल्डकार्डचे वितरण

कणकवली, पुढारी वृत्तसेवा

गुणवत्तापूर्ण अभ्यासाने जगातील कुठलीही स्पर्धा परीक्षा आपण जिंकू शकतो. अशा स्पर्धा परीक्षेमधून आत्मविश्वास वाढतो, म्हणून विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त वाचन करा, देशाचे सुजाण व सक्षम नागरिक व्हा, असे प्रतिपादन फोंडाघाट महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष रायबोले यांनी केले.

फोंडाघाट महाविद्यालयात ग्रंथालयामार्फत गुणवंत विद्यार्थ्यांना गोल्ड कार्डचे वितरण करण्यात आले. यावेळी प्राचार्य रायबोले बोलत होते. ते म्हणाले, गोल्ड कार्ड हे विद्यार्थ्यांचे मोठे यश आहे. गोल्ड कार्डधारक विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील जबाबदारी अधिक वाढली आहे. विद्यार्थ्यांनी अधिकाधिक करण्यासाठी या सुविधेचा उपयोग करावा. विद्यार्थ्यांचा विकास हाच महाविद्यालयाचा विकास आहे असे डॉ. रायबोले यावेळी म्हणाले.

प्रास्ताविकात डॉ. विद्या मोदी यांनी गोल्डकार्ड ही संकल्पना स्पष्ट केली. सूत्रसंचालन डॉ. विद्या मोदी यांनी केले. आभार प्रा. विनोद पाटील यांनी मानले.

ARTS & COMMERCE COLLEGE PHONDAGHAT

# मराठी विषयात व्यवसाय संधी मोठ्या प्रमाणात : डॉ. आजगावकर



मराठी विषय आणि व्यवसाय संधी या विषयावर मार्गदर्शन करताना मान्यवर.

प्रहार

सोमवार, ३ फेब्रुवारी २०२०

▶ फोंडाघाट

येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाट मध्ये मराठी विषय आणि व्यवसाय संधी या विषयावर खालसा कॉलेज मुंबईचे तसेच मुंबई विद्यापीठ मुंबईच्या मराठी विषयाच्या अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. सूर्यकांत आजगावकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कामत होते. आपल्या मनोगतात डॉ. आजगावकर म्हणाले की मराठी विषयात व्यवसाय संधी खूप मोठ्या प्रमाणात आहेत. त्या संधींच्या दृष्टीकोनातून आपण त्याचा गांभीर्याने अभ्यास केला पाहिजे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कामत यांनी वक्त्यांचे स्वागत करून पुस्तके भेट दिली. प्रा. जगदिश राणे यांनी मार्गदर्शन केले. सदरचे व्याख्यान मराठी विभागाच्यावतीने आयोजित करण्यात आले होते. वक्त्यांची ओळख व आभार प्रा. जगदिश राणे यांनी मानले.

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLE
Phondaghat,Tal.Kankavli,Dist.Sindhud

# तरुण भारत

शनिवार, ८ फेब्रुवारी २०२०

## स्पर्धा परीक्षांबाबत लोकजागर आवश्यक!



फोंडाघाट : वेध भविष्याचा कार्यक्रमात मार्गदर्शन करताना श्यामसुंदर पाटील. बाजूला वैशाली राजमाने व अन्य.

वार्ताहर
फोंडाघाट

सिंधुदुर्गातील युवक-युवती शासकीय नोकरीत काम करत असताना अधिकारी पदावर खूपच कमी पाहायला मिळतात. त्यामुळे स्पर्धा परीक्षांबाबत लोकजागर होणे गरजेचे आहे. त्यामुळे नैब फाऊंडेशनचा हा उपक्रम आवश्यक अनुरूप आहे. यातून चांगले अधिकारी तयार होतील, असा विश्वास वाटतो, असे प्रतिपादन कणकवली प्रांताधिकारी सौ. वैशाली राजमाने यांनी केले.

नैब फाऊंडेशन आयोजित न्यू इंग्लिश स्कूल, फोंडाघाट व माजी विद्यार्थी संघ, मुंबई यांच्या सहकार्याने वेध भविष्याचा या स्पर्धा परीक्षा तयारी आणि व्यक्तिमत्त्व विकास शिबिरात त्या बोलत होत्या. व्यासपीठावर राज्याच्या महसूल, वन खात्याचे सचिव श्यामसुंदर पाटील, नैबचे अध्यक्ष दिलीप सावंत, सौ. पाटील, सुभाजी सावंत, दिलीप पारकर, मनीष गांधी, दिलीप पाटील, शंकर सावंत, डॉ. सतीश कामत आदी उपस्थित होते.

सौ. राजमाने म्हणाल्या, मीही खेडेगावातून शिक्षण घेतले. रसायन विज्ञान संबंधित ठिकठिकाणी नोकरी केली, परंतु स्पर्धा परीक्षा खुणावत होती. ध्येय निश्चितीला सकारात्मकतेची जोड मिळाली. जिद्द, परिश्रम आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर अडचणी, समस्यांना सामोरे जात मी आज इथवर पोहोचले. शिबीर यशस्वीतेसाठी अनिल सावंत, दिलीप सावंत, रंजन चिके, नंदू कोरगावकर, फोंडा हायस्कूलचा स्टाफ यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक नैबचे अध्यक्ष दिलीप सावंत यांनी, औक्षण अनिल सावंत यांनी करून दिली. स्वागत व आभारप्रदर्शन सुभाजी सावंत यांनी केले.

ARTS & COMMERCE COLLEGE PHONDAGHAT, TAL. KANKAVLI ESTD. 1995

# तरुण भारत

शनिवार, ८ फेब्रुवारी २०२०

## रंगनाथन यांचे योगदान अतुलनीय!

### फोंडाघाट महाविद्यालयात विद्यार्थ्यांना गोल्डकार्डचे वितरण

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

वार्ताहर
फोंडाघाट

फोंडाघाट कला आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या ग्रंथालयामार्फत गोल्ड कार्डचे वितरण नुकतेच करण्यात आले.

महाविद्यालयातील विविध गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना हे गोल्ड कार्ड दिले जाते. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या ग्रंथालयात रांगेत न राहता, त्यांची मागणी पूर्ण केली जाते. ग्रंथालयात नेहमीच्या विद्यार्थ्यांपेक्षा दुप्पट पुस्तके मिळतात. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी जास्त सुविधा मिळते. विद्यार्थ्यांमध्ये चुरस निर्माण झाली की, त्यांची शैक्षणिक प्रगती होते, असा महाविद्यालयाचा उद्देश आहे, असे प्रास्ताविकात ग्रंथपाल विद्या मोदी यांनी सांगितले.



फोंडाघाट : विद्यार्थ्यांना गोल्डकार्डचे वितरण करताना मान्यवर.

सौ. मोदी यांनी गोल्डकार्ड संकल्पना स्पष्ट करतानाच जागतिक ग्रंथालयाची संकल्पनाही स्पष्ट केली. ग्रंथालयाच्या विकासासाठी भारतात रंगनाथन यांनी मोठी चळवळ उभी केली. ग्रंथालयाच्या विकासात रंगनाथन यांचे मोठे योगदान आहे, असे सांगितले. प्रभारी प्राचार्य डॉ. संतोष रायबोले यांनी गोल्डकार्ड हे विद्यार्थ्यांचे मोठे यश आहे, असे सांगून गोल्डकार्ड प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. अभ्यासाने जगातील कोणतीही स्पर्धा आपण जिंकू शकतो, जास्तीत जास्त पुस्तके वाचा आणि सुजाण नागरिक बना, असे सांगितले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन ग्रंथपाल डॉ. विद्या मोदी यांनी केले. आभार प्रा. विनोद पाटील यांनी मानले.

96
150

लोकमत
गुरुवार, दि. १२ मार्च २०२०

# 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम'ला सुरुवात

## फोंडाघाटमध्ये कार्यशाळेसाठी विविध राज्यातील ४० प्राध्यापकांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क



फोंडाघाट येथील कार्यशाळेचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

फोंडाघाट : येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयात भारत सरकारचे मानव संसाधन विकास मंत्रालय, महाराष्ट्र शासनाचे सिडनहॅम कॉलेज, मुंबई, फॅकल्टी डेव्हलपमेंट सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित मदनमोहन मालवीय नॅशनल मिशन ऑफ टिचर्स अँड ट्रेनिंग अंतर्गत 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम रिसर्च मेथोडोलॉजी' या विषयावरील कार्यशाळेचा प्रारंभ झाला. या कार्यशाळेत विविध राज्यातील ४० प्राध्यापकांनी सहभाग घेतला.

या कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. अनिल चौगुले यांच्या हस्ते झाले. यावेळी ते म्हणाले, प्राध्यापकांचे ज्ञान हे अद्ययावत असले पाहिजे. त्यांची दृष्टी शोधक असली तरच ते आपले ज्ञान अद्ययावत ठेवतील. या कार्यशाळेचा यासाठी उपयोग करून घेणे गरजेचे आहे. तसा उपयोग सहभागी प्राध्यापकांनी करून घेतला पाहिजे, असे ते म्हणाले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कामत यांनी महाविद्यालयाच्या घडत्या आलेखाचा आढावा घेतला. ग्रामीण भागातील महाविद्यालय असूनही आमची प्रगती चांगली आहे. या दहा दिवसांच्या प्रशिक्षणार्थींच्या प्रत्येक गोष्टीचे निरीक्षण करून यू.जी.सी.च्या नियमानुसार मूल्यमापन करण्यात येईल व प्रमाणपत्र देण्यात येईल असे त्यांनी सांगितले.


दहा दिवसांच्या कार्यक्रमाचा आढावा घेऊन त्यांनी कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. सचिव मनीष गांधी म्हणाले, शिकण्यातले नावीन्य हे पाहून पडताळणी प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया कधीही थांबता नये.

चेअरमन श्रीकांत आपटे म्हणाले, संशोधक प्राध्यापक समाज घडवितो. त्यांनी नेहमी नव्याचा शोध घेतला पाहिजे. ज्ञान हे कधी संपत नाही. तसेच ते कधीच जुने होत नाही. आपली ज्ञान संपदा वाढविण्यासाठी या दहा दिवसांचा उपयोग प्राध्यापकांनी करावा.

कार्यक्रमाचे आभार कार्यशाळेचे समन्वयक डॉ. बालाजी सुरवसे यांनी मानले तर सूत्रसंचालन डॉ. संतोष रायबोले यांनी केले.

प्रहार
शनिवार, १४ मार्च २०२०

# महिलांनी बँकिंग व्यवहार समजून घ्यावेत: सौ. उषा नांदोसकर



फोंडाघाट महाविद्यालयात जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलताना बँक ऑफ महाराष्ट्र शाखा फोंडाघाटच्या व्यवस्थापक सौ. उषा नांदोसकर.

▶ फोंडाघाट(वार्ताहर) :

महिलांनी बँकिंग व्यवहारात स्वतःला सक्रिय सहभाग दाखवला पाहिजे आणि त्याची सुरुवात महाविद्यालयीन जीवनापासून सुरुवात केली पाहिजे. आर्थिक व्यवहार समजणे हे फार महत्त्वाचे आहे.सबल बनण्यासाठी स्वतः आर्थिक सक्षम बनणे गरजेचे आहे. जेव्हा आर्थिक सबल तेव्हा कुटुंबात आणि समाजात मान मिळेल. आताचा काळ खूपच बदलला आहे.मुल आणि मुलांपुरती मर्यादित असणारी आई आज सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहे. आपले गुण गुण ओळखून स्वतःची प्रगती केली पाहिजे, असे प्रतिपादन बँक ऑफ महाराष्ट्र शाखा फोंडाघाटच्या व्यवस्थापक सौ. उषा नांदोसकर यांनी केले. त्या कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाट येथे आयोजित केलेल्या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने साजरा करण्यात आलेल्या महिला दिनाच्या कार्यक्रमात बोलत होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सौ. सारिका राणे यांनी केले. दिवस कोणताही असला तरी घरात जाग ही स्त्रियांच्या आवाजाने होते. स्वतःच्या कर्तृत्वातून व्यक्तिमत्त्वाचा विकास आज महिलांनी केला आहे.आजच्या प्रमुख पाहुण्या एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यावेळी उषा नांदोसकर यांचा शाल श्रीफळ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. त्यानंतर या दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात घेण्यात आलेल्या पोस्टर व निबंध स्पर्धेच्या विजेत्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कामत म्हणाले की, विकासशील अवस्थेचे चित्र फार समाधानकारक नाही त्यामुळे अजूनही समाजाची स्त्रियांविषयी विचार बदलण्याची आवश्यकता आहे. मुलींनी इतर क्षेत्रात घेतलेल्या भरारी बरोबरच स्वतःच्या संरक्षणासाठी सक्षम बनले पाहिजे, असे सांगितले.कार्यक्रमासाठी पोस्टर व रांगोळीचे प्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे आभार प्रा. रूपाली माने यांनी तर सूत्रसंचालन शीतल कुंभारकर व रश्मी शिरोडकर यांनी केले.

ARTS & COMMERCE COLLEGE
ESTD. 1995
PHONDAGHAT

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudu

127

151

**लोकमत** | कोकण, शनिवार, दि. १४ मार्च २०२०

# फोंडाघाट येथे महाविद्यालयीन मुलींची आरोग्य तपासणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**फोंडाघाट :** कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाटच्या महिला विकास कक्षाच्या माध्यमातून जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला महाविद्यालयीन मुलींच्या रक्त घटकांची तपासणी करून घेण्यात आली.

वारंवार भेडसावणाऱ्या शारीरिक तक्रारींबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. आपल्या आरोग्याची काळजी का व कशी घ्यावी, रक्तघटकांचे प्रमाण योग्य राहण्यासाठी संतुलित आहार कोणता घ्यावा याचे मार्गदर्शन करण्यात आले. त्यातून आरोग्य व आहार या विषयी मुलींचे गैरसमज दूर झाले. तसेच भविष्यात काळजी घेण्याची शपथ मुलींनी घेतली.

आरोग्य तपासणी फोंडाघाट प्राथमिक आरोग्य केंद्राचे प्रमुख डॉ. सचिन जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्यसेविका पूर्वा मेस्त्री यांनी पूर्ण केले. तसेच हा उपक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कामत यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. सारिका राणे, प्रा. राधिका सावंत, प्रा. रुपाली माने यांनी परिश्रम घेतले. या तपासणीचा चाळीस विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

**प्रहार** | सोमवार, १६ मार्च २०२०

# फोंडाघाट महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबीर




▶ फोंडाघाट (वार्ताहर)

कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाटच्या महिला विकास कक्षाच्या माध्यमातून जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला महाविद्यालयीन मुलींच्या रक्त घटकांची तपासणी करून घेण्यात आली. मुळात मुली स्वतःच्या आरोग्याविषयी उदासीन असतात. त्यातून तपासणीसाठी येणारा किरकोळ खर्च करण्याची ऐपत नसते. त्यामुळे महाविद्यालयाच्या महिला विकास कक्षाच्या माध्यमातून महाविद्यालयीन मुलींच्या रक्त घटकांची तपासणी करून घेण्यात आली.

त्याचबरोबर त्यांना वारंवार भेडसावणाऱ्या शारीरिक तक्रारी बद्दल मार्गदर्शन करण्यात आले. आपल्या आरोग्याची काळजी का व कशी घ्यावी, रक्तघटकांचे प्रमाण योग्य राहण्यासाठी संतुलित आहार कोणता घ्यावा याचे मार्गदर्शन करण्यात आले. त्यातून आरोग्य व आहार या विषयी मुलींचे गैरसमज दूर झाले. तसेच भविष्यात काळजी घेण्याची शपथ मुलींनी घेतली.

आरोग्य तपासणी फोंडाघाट प्राथमिक आरोग्य केंद्राचे प्रमुख डॉ. सचिन जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्यसेविका सौ. पूर्वा मेस्त्री यांनी पूर्ण केले. तसेच हा उपक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कामत यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. सारिका राणे, प्रा. राधिका सावंत, प्रा. रुपाली माने यांनी परिश्रम घेतले. या तपासणीचा चाळीस विद्यार्थिनींनी लाभ घेतला.

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEC
Phondaghat,Tal.kankavli.Dist.Sindhudu

९७ १४८

लोकमत
शुक्रवार, दि. ६ मार्च २०२०

# फोंडाघाट महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची शिवगडास भेट

## सिंधुदुर्ग, कोल्हापूरच्या सीमा भागातील किल्ला

लोकमत न्यूज नेटवर्क

फोंडाघाट : कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाटच्या इतिहास व मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांनी शिवगड किल्ल्याला भेट दिली. शिवगड किल्ला सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर जिल्ह्यांच्या सीमा भागात असून तो खूपच दुर्लक्षित राहिलेला आहे. परंतु या किल्ल्याला मध्ययुगीन काळात फार मोठे महत्त्व होते.

पूर्वी कोल्हापुरातून किंवा पश्चिम महाराष्ट्रातून येणारा माल तसेच सिंधुदुर्गातून पश्चिम महाराष्ट्रात मालाची ने-आण करण्यात येत असे. त्यामुळे या मार्गावर देखरेख करण्यासाठी या स्थानाचा महत्त्वपूर्ण उपयोग होत असे.

तळकोकणातील देवगड, मालवण, विजयदुर्ग या बंदरांवर मोठ्या प्रमाणात मालाची चढ-उतार होत असे आणि पश्चिम महाराष्ट्रात त्या मालाची वाहतूक केली जात असे. या वाहतुकीच्या मार्गावर देखरेख करण्यासाठी या किल्ल्याचा महत्त्वपूर्ण उपयोग केला जात असे.

या किल्ल्याविषयी ऐतिहासिक माहिती देताना प्रवेशद्वार, किल्ल्याची तटबंदी, बुरूज, किल्ल्यातील वाड्यांचे अवशेष यांची माहिती इतिहास विभाग प्रमुख डॉ. डी. बी. गाडेराव यांनी दिली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य तथा मराठी विभाग प्रमुख डॉ. सतीश कामत म्हणाले, ऐतिहासिक दस्तऐवजांची जपणूक करणे गरजेचे आहे. त्यामुळे आपल्याला प्रेरणा मिळते. तसेच किल्ल्यांचे जतन करून त्यांचा उपयोग पर्यटन वाढीसाठी करता येतो. त्यातच शिवगडाचा सांस्कृतिक वारसा जतन करणे गरजेचे असून किल्ल्याची डागडुजी झाली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

# फोंडाघाट महाविद्यालयात 'फॅकल्टी डेव्हलपमेंट कोर्स'

## उत्साहात सांगता : विविध राज्यांतून ४० प्राध्यापक सहभागी

लोकमत
सिंधुदुर्ग, गुरुवार, १२ मार्च २०२०

लोकमत न्यूज नेटवर्क




फोंडाघाट येथील कार्यक्रमात मुंबई विद्यापीठाचे अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य प्रा. डॉ. विलास गायकर यांनी मार्गदर्शन केले.

फोंडाघाट : येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या 'फॅकल्टी डेव्हलपमेंट कोर्स'ची सांगता झाली.

भारत सरकारचे मानव संसाधन विकास मंत्रालय, महाराष्ट्र शासनाचे सिडनहॅम कॉलेज मुंबई, फॅकल्टी डेव्हलपमेंट सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित मदनमोहन मालवीय नॅशनल मिशन ऑफ टिचर्स अँड ट्रेनिंग अंतर्गत हे प्रशिक्षण फोंडाघाट महाविद्यालयात आयोजित केले होते. या प्रशिक्षणास विविध राज्यांतून ४० प्राध्यापक सहभागी झाले होते.

सांगता समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून बार कौन्सिल ऑफ इंडियाचे व मुंबई विद्यापीठ अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य प्रा. डॉ. विलास गायकर उपस्थित होते. सिडनहॅम कॉलेज मुंबई, फॅकल्टी डेव्हलपमेंट सेंटरचे प्रशिक्षण समन्वयक प्रा. डॉ. अनिल चौगुले यांनी प्राध्यापकांनी केलेले शैक्षणिक संशोधन समाजोपयोगी असावे. ते फक्त पदव्या किंवा पदोन्नतीसाठी मर्यादित असू नये. संशोधन क्षेत्रात विविधता असून आपले संशोधन राष्ट्रीय पातळीवर आणण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले.

डॉ. सतीश कामत यांनी सहभागी प्राध्यापकांचे कौतुक केले. ते म्हणाले, आपल्याकडील गुणवत्ता वाढविण्याची संधी तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनानंतर नवीन दृष्टी आली असून त्याचा उपयोग समाज घडविण्यासाठी करावा, असे आवाहनही त्यांनी केले. हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या प्राध्यापकांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरित करण्यात आली.

प्रभारी प्राचार्य डॉ. सतीश कामत व समन्वयक प्रा. डॉ. बाळाजी सुरवसे यांनी या प्रशिक्षणाचे आयोजन यशस्वीरित्या केल्याबद्दल सिडनहॅम कॉलेजच्यावतीने प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला व महाविद्यालयास विशेष प्रमाणपत्र देण्यात आले.

प्रा. डॉ. बाळाजी सुरवसे म्हणाले, या प्रशिक्षणास संपूर्ण भारतातून चांगला प्रतिसाद मिळाला. तज्ज्ञ मार्गदर्शकांनी वेळेत उपस्थित राहून उत्कृष्ट मार्गदर्शन केले. एसएसपीएम इंजिनिअरिंग कॉलेज कणकवली यांचीही बहुमोल सहकार्य लाभले. सहभागी प्राध्यापकांनीही फार मोलाचे सहकार्य केले, असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी मानले.

ARTS & COMMERCE COLLEGE PHONDAGHAT ESTD. 1995

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg



वैभववाडी : येथील कृषी प्रदर्शनाला फोंडाघाट महाविद्यालयीन तरुणांनी भेट देऊन पाहणी केली.

सकाळ
सिंधुदुर्ग, शुक्रवार, ६ मार्च २०२०

# फोंडाघाट महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची कृषी प्रदर्शनास भेट

फोंडाघाट, ता. ५ : येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वैभववाडी येथे आत्मा समिती व पंचायत समिती वैभववाडी यांच्यावतीने आयोजित कृषी प्रदर्शनास महाविद्यालयाच्या वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी भेट दिली.

प्रदर्शनात कृषी अवजारे, बी बियाणे, जैविक तसेच रासायनिक खते, आधुनिक टेक्नॉलॉजी, फवारणी, विषारी अवजारे आणि औषधे, विविध बनावट पदार्थांचे स्टॉल्स व औषधे, पावसाळ्यात पशुसंवर्धन विषयक माहिती फलक, निकृष्ट चारा सकस करण्याची प्रक्रिया करणारा माहितीफलक, तसेच गुरे उत्पादनाची दस्तपूर्ती माहितीफलक, शेळी गट स्थापना माहिती फलक, गवत सुधारणा माहिती फलक अशा विविध शेती विषयी सविस्तर माहिती महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी करून घेतली. विद्यार्थ्यांना आधुनिक शेती करण्यासाठी नवीन माहिती मिळण्यास तसेच शेतीक्षेत्राला मिळणारे अनुदान त्याची माहिती मिळण्यास मदत होते.

विद्यार्थ्यांनी ही माहिती तसेच उत्पादित माल व त्याला उपलब्ध असणारी बाजारपेठ यांची माहिती घेतली. तसेच कोकणात मिळणारे रानमेवे, काजू, करवंद, जांभूळ, कोकम, आंबा, रायवळ आंबा यांच्या उत्पादनातही कसा फायदा होतो याची ही माहिती घेतली. विद्यार्थ्यांना डॉ. बाजीराव झगडे, प्रा. सारिका राणे, प्रा. राधिका सावंत व प्रा. रुपाली माने यांनी अधिक मार्गदर्शन केले. अभ्यास सहलीच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कामत यांचे मार्गदर्शन लाभले.

ARTS & COMMERCE COLLEGE SINDHUDURG ESTD. 1995

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

लोकमत
सिंधुदुर्ग, गुरुवार, १९ मार्च २०२०

# पदवीचा उपयोग समाजासाठी करा

**मनीष गांधी यांचे आवाहन : फोंडाघाट महाविद्यालयात पदवी प्रदान समारंभ**

लोकमत न्यूज नेटवर्क



फोंडाघाट महाविद्यालयात आयोजित पदवी प्रदान कार्यक्रमाचे उद्घाटन मनीष गांधी यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी डॉ. सतीश कामत, राजन चिके, सुंदर पारकर आदी उपस्थित होते.

फोंडाघाट : विद्यार्थ्यांच्या आयुष्यात अनेक सुवर्णक्षण येतात. पदवी स्वीकारणे हा त्यापैकी एक आहे. उच्च शिक्षण घेतल्यानंतर त्याचे प्रमाणपत्र स्वीकारणे अभिमानास्पद असते. समाजोद्धाराचे काम शिक्षणामुळेच होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी पदवीचा उपयोग समाजासाठी केला पाहिजे, असे प्रतिपादन फोंडाघाट एज्युकेशन सोसायटीचे सचिव मनीष गांधी यांनी केले.

येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयात आयोजित पदवी वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन गांधी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कामत यांनी केले. ते म्हणाले, 'पदवी वितरण समारंभ, तृतीय वर्ष कला, वाणिज्य सदिच्छा समारंभ व शिष्यवृत्ती धनादेश वितरण असा त्रिवेणी संगम साधणारा हा सोहळा आहे. पदवीधर झालेले आणि पदवीधर होण्यासाठी तयार असलेले तसेच शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी यांचे हे कौतुक संमेलनच आहे.

राजन चिके म्हणाले, महाविद्यालय जीवनाशी तीन वर्षे फक्त मजाच करू नका. काहीतरी गांभीर्याने घेतले पाहिजे. त्यानुसार आपले आयुष्य घडत असते. नोकरी शोधत असताना स्वत:चे उद्योग उभे करण्यासाठी प्रयत्न करा. प्रयत्न करणाऱ्याला यश मिळते.

सुंदर पारकर म्हणाले, पदवी मिळाली म्हणजे शिक्षण संपत नाही. ते अविरत चालू असते. त्यानुसार माणूस घडत असतो, असे सांगून सर्वांना शुभेच्छा दिल्या. प्राचार्यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर पदवीधारकांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली. त्याचबरोबर ए.एन.जी.सी. शिष्यवृत्तीच्या धनादेशाचे वितरणही करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानसी हळूळ व सतीश पवार यांनी केले. तर आभार प्रा. विनोद पाटील यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. संतोष आखाडे व प्रा. विनोद पाटील यांच्यासह सर्व प्राध्यापकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

93 142

प्रहार

बुधवार, १२ फेब्रुवारी २०२०

# १४ रोजी फोंडाघाट महाविद्यालय नॅक विषयी एक दिवशी चर्चासत्र

फोंडाघाट (वार्ताहर) : कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाटमध्ये नॅक विषयी एक दिवसीय चर्चासत्र दिनांक १४ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आले आहे. महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षाच्यावतीने नॅक बंगलोर पुरस्कृत एक दिवसीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. सदरच्या कार्यशाळेत जानेवारी २०२० पासून बदललेला आय. क्यु. ए. आर., आय. आय. क्यु. ए. आणि एस. एस. आर. याबाबत सखोल मार्गदर्शन होणार आहे. सदरच्या मार्गदर्शनासाठी डॉ. डी. के. कांबळे असिस्टंट ॲडव्हायझर नॅक बेंगलोर, डॉ. एस. बी. कोष्टी बेळगाव, डॉ. अमर कांबळे पंढरपूर, प्रा. आर. बी. शिंदे सावंतवाडी हे तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

बदललेल्या नॅक पद्धतीची माहिती अवलोकन होण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयातील नॅक कोऑर्डिनेटर तसेच अन्य प्राध्यापकांना सदर कार्यशाळा उपयुक्त असणार आहे. तरी बहुसंख्य प्राध्यापकांनी सदर कार्यशाळेस उपस्थित राहावे असे आवाहन आयोजन समितीच्या वतीने डॉ. राजाराम पाटील व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कामत यांनी केले आहे.

लोकमत

सिंधुदुर्ग, बुधवार, १२ फेब्रुवारी २०२०

# फोंडाघाट महाविद्यालयात 'नॅक'विषयी चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

फोंडाघाट : येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयात 'नॅक' विषयी एकदिवसीय चर्चासत्र १४ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आले आहे.

महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षाच्यावतीने नॅक बेंगलोर पुरस्कृत एकदिवसीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. कार्यशाळेत जानेवारी २०२० पासून बदललेला आय. क्यु. ए. आर., आय. आय. क्यु. ए. आणि एस. एस. आर. याबाबत सखोल मार्गदर्शन होणार आहे. मार्गदर्शनासाठी डॉ. डी. के. कांबळे (सहाय्यक सल्लागार नॅक बेंगलोर), डॉ. एस. बी. कोष्टी (बेळगाव), डॉ. अमर कांबळे (पंढरपूर), प्रा. आर. बी. शिंदे (सावंतवाडी) हे तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

बदललेल्या नॅक पद्धतीची माहिती अवलोकन होण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयातील नॅक कोऑर्डिनेटर व अन्य प्राध्यापकांना कार्यशाळा उपयुक्त असणार आहे. तरी बहुसंख्य प्राध्यापकांनी कार्यशाळेस उपस्थित राहावे, असे आवाहन समितीच्यावतीने डॉ. राजाराम पाटील व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कामत यांनी केले आहे.

ARTS & COMMERCE COLLEGE PHONDAGHAT ESTD. 1995

PRINCIPAL
Arts & Commerce College
Phondaghat, Tal. Kankavli, Dist. Sindhudurg

143

लोकमत
www.lokmat.com
कोकण, बुधवार,
दि. १२ फेब्रुवारी २०२०

# फोंडाघाट महाविद्यालयात प्रशिक्षण कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

फोंडाघाट : येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयात भारत सरकारचे मानव संसाधन विकास मंत्रालय, महाराष्ट्र शासनाचे सिडनहॅम कॉलेज मुंबई, फॅकल्टी डेव्हलपमेंट सेंटर यांच्या सहकार्याने पंडित मदनमोहन मालवीय विकास मिशन ऑफ रिसर्च सेंटर ट्रेनिंग अंतर्गत 'डेव्हलपमेंट प्रोग्रॅम रिसर्च मेथोडोलॉजी' या विषयावर २१ फेब्रुवारी ते १ मार्च या कालावधीत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.

यू.जी.सी.च्या १८ जुलै २०१८ रोजीच्या अधिसूचनेनुसार हे प्रशिक्षण वरिष्ठ महाविद्यालयातील अधिव्याख्याता पदोन्नतीसाठी समकक्ष आहे.


देशातील विविध विद्यापीठातील विविध वरिष्ठ महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांची कोर्ससाठी नोंदणी केलेली आहे. अद्याप नोंदणी न केलेल्या प्राध्यापकांनी संकेतस्थळावर लवकरात लवकर नावनोंदणी करावी. अधिक माहितीसाठी प्रशिक्षण समन्वयक प्रा. डॉ. बालाजी सुरवसे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कामत यांनी केले आहे.

प्रहार
बुधवार, १२ फेब्रुवारी २०२०

## फोंडाघाट महाविद्यालयात फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे आयोजन

फोंडाघाट (वार्ताहर) : येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाट येथे भारत सरकारचे मानव संसाधन विकास मंत्रालय, महाराष्ट्र शासनाचे सिडनहॅम कॉलेज मुंबई, फॅकल्टी डेव्हलपमेंट सेंटर यांच्या सहकार्याने पंडित मदनमोहन मालवीय विकास मिशन ऑफ रिसर्च सेंटर ट्रेनिंग अंतर्गत डेव्हलपमेंट प्रोग्रॅम रिसर्च मेथोडोलॉजी या विषयावर दिनांक २१ फेब्रुवारी ते १ मार्च २०२० या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. यू. जी. सी. च्या १८ जुलै २०१८ रोजीच्या अधिसूचनेनुसार हा कोर्स वरिष्ठ महाविद्यालयातील अधि-व्याख्याता पदोन्नतीसाठी समकक्ष आहे. देशातील विविध विद्यापीठातील विविध वरिष्ठ महाविद्यालयातील अधि-व्याख्यात्यांची कोर्ससाठी नोंदणी केलेली आहे. अद्याप नोंदणी न केलेल्या प्राध्यापकांनी संकेतस्थळावर लवकरात लवकर नावनोंदणी करावी. अधिक माहितीसाठी कोर्स समन्वयक प्रा. डॉ. बालाजी सुरवसे (९८२१२२७३६६) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कामत यांनी केले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांची कार्यपद्धतीची नोंद अवघ्या जगाने घेतली: डॉ. ताडेराव



फोंडाघाट महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना मान्यवर.

▶ फोंडाघाट

छत्रपती शिवाजी महाराजांची कार्यपद्धतीची नोंद अवघ्या जगाने घेतली. अमेरिकेतील विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यपद्धतीवर अभ्यासक्रम नेमला जातो. याचा अर्थ असा की महाराज जागतिक कीर्तीचे नेते होते. जाणते राजे होते. असे प्रतिपादन कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाटचे इतिहास विभाग प्रमुख डॉ.डी.बी.ताडेराव यांनी केले. ते महाविद्यालयात साजरी करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त बोलत होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कामत म्हणाले की महाराज जगाला दिशा दाखवणारे एक व्यक्तिमत्त्व होते. गनिमीकावा ही अनोखी युद्धनीती अवलंबून स्वराज्य निर्माण केले. त्याचबरोबर त्याचा विस्तारही वाढवला. जाणता राजा हा त्यांचा वाखाणण्यासारखा गुण होता. कठोर प्रशासनाबरोबरच प्रेमळ राजाही महाराज होते.

विद्यार्थ्यांच्या मनोगतात प्रतिक बेळणेकर, स्नेहा पुरी यांनी विचार मांडले .तर शिक्षकांच्या मनोगतात प्रा.विनोद पाटील यांनी महाराजांचा एकांगी अभ्यास न करता सर्वांगाने अभ्यास करणे गरजेचे आहे. तरच महाराजांचे खरे कार्य लोकांपर्यंत पोहोचेल असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे आयोजन संस्कृती विभागाच्यावतीने करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिल्पा हुले हिने केले.

तर आभार ऋतिका वालवे हिने मानले व सूत्रसंचालन मंगेश पवार व मानसी वायुळ यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचा शिक्षक वर्ग मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

शनिवार, २२ फेब्रुवारी २०२०
प्रहार

PRINCIPAL
ARTS & COMMERCE COLLE
Phondaghat, Tal.kankavli,Dist.Sindhudu